
विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका



## शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर अभिवादन विशेषांक

ऑगस्ट २०२१


वर्ष पहिले | अंक दुसरा

विज्ञान निर्भयता नीती

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

स्थापना : ९ ऑगस्ट १९८९

माणसांना विवेकी बनविणारे सशक्त संघटन



# शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर

## यांच्या ८ व्या स्मृतिदिनानिमित्त

## विनम्र अभिवादन...


















**डॉ. नरेंद्र दाभोलकर**
संस्थापक कार्याध्यक्ष
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण

विज्ञान निर्भयता नीती

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

(मराठी मासिक)


ऑगस्ट २०२१

वर्ष पहिले | अंक दुसरा



अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक**
नितीन शिंदे

**कार्यकारी संपादक**
उत्तम जोगदंड

**सह संपादक**
एकनाथ पाटील

**सदस्य**
दीपक बाविस्कर
श्यामसुंदर मिरजकर
मांतेश हिरेमठ

**व्यवस्थापक मंडळ**
**व्यवस्थापकीय संपादक**
अवधुत कांबळे

**सदस्य**
तुकाराम शिंदे
राजेंद्र फेगडे
विशाल विमल

**सल्लागार मंडळ**
प्रदीप पाटकर
संध्या नरे-पवार

**कायदेशीर सल्लागार**
ॲड. गोविंद पाटील

**मुखपृष्ठ**
गणेश पोतदार
इस्लामपूर



सदरचे मासिक संपादक नितीन शिवाजीराव शिंदे यांनी संपादित केले आहे आणि प्रकाशक अविनाश रमेश पाटील यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भास्कर-६८, कालिकादेवीनगर, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१ येथून प्रकाशित केले आहे. महा. अंनिससाठी विवेक जागर ट्रस्टच्यावतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर ट्रस्ट सहमत असेलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.



**संपादकीय पत्ता**
संपादक, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, 'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर, जि. सांगली, ४१५४०९

## अनुक्रमणिका


◆ **संपादकीय** |उत्तम जोगदंड | ३

◆ **अभिवादन**

- मर्यादित संसाधनांसह कमाल परिणाम साधणारा नेता : डॉ. नरेंद्र दाभोलकर | सुभाष वारे | ५
- डॉ. नरेंद्र दाभोलकर : आधुनिक महाराष्ट्राचा एक पथदीप | राजाभाऊ शिरगुप्पे | ८
- प्रिय डॉक्टर, कसे आहात? | विनायक सावळे | १५

◆ **आठवणींचे भावविश्व**

- आठवणीतले डॉ. दाभोलकर | माधव बावगे | १९
- विवेकवादी व्यक्तिमत्त्वाची सोबत | नितिन राऊत | २२
- शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना आठवताना | नंदकिशोर तळाशीकर | २७
- शब्दांच्या उपयोजनाचे समग्र भान देणारे डॉ. दाभोलकर | एकनाथ पाटील | ३०
- डॉ. दाभोलकरांनी समितीमध्ये एक-एक अनमोल हिरा निवडला | मनीषा महाजन | ३२

◆ **विचार विश्व**

- अंधश्रद्धामुक्त समाजाचे प्रीॲम्बल | यशवंत मनोहर | ३४

◆ **वर्धापन दिन विशेष**

- महा. अंनिस : नक्षत्रांचं देणं | सुशीला मुंडे | ४३

◆ **संताचिये द्वारी**

- वीर वारीकर संत नामदेव | श्यामसुंदर मिरजकर | ४९

◆ **चिकित्सा**

- सर्प : मित्र मानवाचा | उल्हास ठाकूर | ५३

◆ **कार्याध्यक्ष संवाद**

- संघटित पुरोगामित्त्व वृध्दिंगत करू या ! | अविनाश पाटील | ५६

◆ **प्रकाशन वृत्तांत**

- प्रकाशनाच्या क्षेत्रातले नवे पाऊल | योगेश कुदळे | ५८

◆ **महा. अंनिसची खबरबात** | विशाल विमल | ६०

# शहीद डॉ. दाभोलकरांचे विचार हाच आमच्या कामाचा पायाभूत गाभा...

'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या मासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध साहित्यिक आणि विचारवंत यशवंत मनोहर यांच्या हस्ते दि. ११ जुलै, २०२१ रोजी ऑनलाइन माध्यमाद्वारे प्रसिद्ध झाला. त्याला कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी उदंड प्रतिसाद दिला. झूम मीटिंगची पाचशेची मर्यादा ओलांडून फेसबुक आणि युट्यूबवर श्रोत्यांची लक्षणीय उपस्थिती होती. त्यानंतर वाचकांच्या उत्साहवर्धक प्रतिक्रिया येत होत्या. मासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी लोक आतुरता दाखवत होते. या उपक्रमाला देणगी देण्यास असंख्य हात पुढे येत होते. या अनुभवांनी आम्ही अक्षरशः भारावून गेलो आहोत. मासिकाचा प्रकाशन समारंभ आम्हाला एक वेगळीच ऊर्जा देऊन गेला. वाचकांनीच मासिकाचे 'अंनिप' असे संक्षिप्त स्वरुपात नामकरण देखील केले आहे. भरभरून दिलेल्या या प्रोत्साहनाबद्दल वाचक, हितचिंतक आणि कार्यकर्ते यांचे आम्ही मनःपूर्वक आभारी आहोत. 'अंनिप' ला केवळ आपल्या संघटनेचेच नव्हे, तर एकूणच परिवर्तनवादी चळवळींचे अग्रणी मुखपत्र म्हणून स्थापित करण्याची आणि वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी संपादक मंडळावर आहे. मंडळ ती सक्षमपणे पार पाडेल, याची मी ग्वाही देतो.

ऑगस्ट महिना आम्हा तमाम कार्यकर्त्यांच्या दृष्टीने कमालीचा आस्थेचा महिना आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते स्वातंत्र्य दिनाबरोबरच संघटनेचा स्थापना दिन आणि डॉ. दाभोलकरांचा शहीद दिन म्हणून या महिन्याकडे पाहातात. सन १९८९ मध्ये याच महिन्याच्या नऊ तारखेला डॉ. दाभोलकर यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापन केली आणि आपल्या समाज परिवर्तनाच्या कामाला सुरुवात केली. कुशल नेतृत्वाच्या बळावर फुले-शाहू-आंबेडकर-संत-समाजसुधारक यांच्या विवेकी विचारांचा वारसा घेऊन त्यांनी ही संघटना देशभरातच नव्हे, तर अगदी जगभर नावारूपाला आणली. महाराष्ट्रभर संघटनेच्या शाखांचे मोठे जाळे निर्माण केले. प्रामाणिक, निस्पृह, मेहनती अशा हजारो कार्यकर्त्यांच्या मनात परिवर्तनाचे स्फुल्लिंग चेतवत त्यांना एकत्र आणले. विवेकी समाज निर्माण करण्याच्या मार्गावर त्यांनी टाकलेले हे मोठे पाऊल होते. शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध आंदोलन कसे असावे, याचे उदाहरण त्यांनी संपूर्ण देशाला घालून दिले. महाराष्ट्र राज्याच्या एकसष्ट वर्षांच्या वाटचालीत आपल्या आंदोलनाचा वैशिष्ट्यपूर्ण असा ठसा उमटवत ९ ऑगस्ट ही तारीख सामाजिक परिवर्तनाच्या प्रांतात पुन्हा नव्याने अविस्मरणीय केली.

परंपरावाद्यांच्या, सनातनी आणि बुरसटलेल्या विचारधारांच्या विरोधाला न जुमानता संघटनेला अत्यंत जोमाने पुढे घेऊन जात असतानाच २० ऑगस्ट, २०१३ रोजी डॉ. दाभोलकरांच्यावर गोळ्या झाडून सनातनी प्रवृत्तींनी त्यांची निर्घृण हत्या केली. चळवळीवर हा प्रचंड मोठा आघात होता. लोकांना अंधश्रद्धा आणि अनिष्ट परंपरांच्या जोखडातून मुक्त करून विवेकी समाज निर्माण करण्यासाठीच्या रणांगणात लढणारा योद्धा शहीद झाला. परंतु माणूस मारला तरी विचार संपत नाहीत, हे शहीद डॉ. दाभोलकर यांच्या विचाराने आणि त्यांनी स्थापित केलेल्या कार्यप्रणालीने सिद्ध करून दाखवले. त्यांच्या मृत्यूनंतर सुद्धा चळवळ जोमाने पुढे वाढतच राहिली. अत्यंत उत्साही वाटणाऱ्या ऑगस्ट महिन्याला २०१३ पासून संताप आणि वेदना याची किनार आहे. प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनात या महिन्यात नेहमी संमिश्र भावना दाटलेल्या असतात. आपल्या भावनांना आवर घालत डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या हत्येच्या तपासाबरोबरच खुन्यांना

आणि खुनाच्या सूत्रधारांना अटक व्हावी या  मागणीसाठी आज अखेर कार्यकर्ते संविधानाच्या चौकटीत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करीत आले आहेत. यश मात्र दृष्टीक्षेपात देखील नाही, ही अत्यंत खेदाची बाब आहे. डॉ. दाभोलकरांनी दिलेला विचार हा आमच्या कामाचा आणि संघटनेचा पायाभूत गाभा आहे. तो सोबत घेऊनच पुढे वाटचाल करायची आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांच्या विचारकार्याला  अभिवादन करण्याच्या भावनेने प्रस्तुत 'डॉ. नरेंद्र दाभोलकर विशेषांक' प्रकाशित करीत आहोत.

गेल्या काही वर्षांपासून एकता, एकात्मता, धर्मनिरपेक्षता आणि संविधानाच्या मुळावर देशातील काही प्रतिगामी शक्ती उठलेल्या दिसत आहेत. त्यातच 'कोविड-१९' या महामारीने भर घातलेली आहे. भारताच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक परिस्थितीचे कंबरडे या दुहेरी आघाताने मोडले आहे. अशा परिस्थितीत विविध प्रकारच्या अंधश्रद्धा, अफवा पसरवत, अवैज्ञानिक उपचार पद्धतींचा आणि औषधांचा मारा करत लोकांच्या विचारशक्तीचे अपहरण केले जात आहे. हे वास्तव विचारात घेता परिवर्तनवादी चळवळ आणि महा. अंनिस समोरील आव्हाने वाढत चालली आहेत. ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून मुक्त झाल्याचा आनंद स्वातंत्र्यदिनी साजरा करत असतानाच भारतीय समाज नवनव्या अंधश्रद्धांच्या आणि प्रतिगामी विचारांच्या गुलामगिरीत अधिकाधिक गुरफटत चालला असल्याचे  विदारक दृश्य आहे. याविरुद्ध आजच्या काळातही आपणाला लढायचे आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी दाखवलेला विवेकी मार्ग आणि निर्माण केलेले संघटन याच्या जोरावर आपण हे आव्हान पेलणार आहोत. डॉ. दाभोलकर नेहमी म्हणायचे की, 'आपली लढाई काही दशकांची नव्हे तर ती शतकांची आहे'.  त्यांनी पेरलेल्या विचारांची रूजवणुक आपल्या पुढील पिढ्यांमध्ये करून हा संघर्ष जारी ठेवण्याचा संकल्प स्वातंत्र्यदिन, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा वर्धापनदिन आणि शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतिदिनानिमित्त आपण करूया.

विवेकाचा आवाज, बुलंद करूया!

उत्तम जोगदंड
९९२०१२८६२८

# मर्यादित संसाधनांसह कमाल परिणाम साधणारा नेता : डॉ. नरेंद्र दाभोलकर



सुभाष वारे
९८२२० २०७७३

डॉ. दाभोलकरांची निर्घृण आणि भ्याड हत्या होऊन आठ वर्षे होत आलेत. पण तरीही या घटनेचे गांभीर्य जराही कमी होत नाही. दाभोलकरांच्या हत्येने आपले स्वत:चे, चळवळीचे व समाजाचे किती आणि कशा प्रकारचे नुकसान झाले आहे, हे जास्तच तीव्रपणे जाणवत रहाते. समाजासमोरील, राष्ट्रासमोरील अनेक प्रश्न अधिक गंभीर बनत चाललेत. समस्यांचा गुंता अधिक वाढतोय. पुरोगामी चळवळीसमोरील आव्हानेही त्याच प्रमाणात वाढत असताना, पुढे जाण्याची वाट अधिक धुसर होत असताना, काय करावे व कसे करावे याचा गोंधळ मनात वाढत असताना नेहमीच्या सवयीने जरा डॉ. दाभोलकरांना विचारून बघू या का, काय आणि कसे करावे ते- असे सहजपणे मनात येऊन जाते आणि फोनकडे हात जातो... पण अचानक लक्षात येते की दाभोलकरांना तर संपवलंय विवेकाच्या मारेकऱ्यांनी. आता दाभोलकर नाहीत चर्चेसाठी उपलब्ध. आता आपल्याला सामुहिक चर्चेतून आणि सामुहिक कृतीतूनच वाट काढावी लागणार आहे.

वैयक्तिक जीवनातील आचार-विचाराबाबतचे त्यांचे स्पष्ट विचार आणि त्यासाठीचा तितकाच आग्रह यामुळे त्यांच्या हयातीत त्यांचा वाढदिवस कधी साजरा झाला नाही. इतर अनेक नेत्यांची होते तशी षष्ठ्यब्दीही साजरी झाली नाही. त्यामुळे २६-२७ वर्षे त्यांच्याबरोबरचा संपर्क आणि संवाद असूनही त्यांचे नेमके वय मला कधीच समजले नाही. त्यांची जन्मतारीख सुध्दा त्यांच्या खुनानंतर वर्तमानपत्रवाल्यांनी छापली, तेव्हाच समजली. चळवळीच्या कामातील शिस्त व्यक्तिगत जीवनालाही असल्याने अडुसष्टाव्या वर्षीही त्यांचा उत्साह, चपळपणा तरुणांना लाजविणारा होता.

त्यांच्या खुनानंतर एक कार्यकर्ता म्हणाला होता, दाभोलकर दर सोमवारी- मंगळवारी 'साधना'च्या कामासाठी पुण्याला न चुकता असायचे आणि मंगळवारी सकाळी व्यायामासाठी बाहेर पडायचे म्हणजे पडायचाच, ही शिस्तच त्यांचा घात करून गेली. त्या मंगळवारी थोडा आळस करून ते व्यायामाला बाहेर पडलेच नसते तर... या 'जर-तर'ला आता अर्थ नाही आणि इथे नाही तर आणखी कुठे तरी असे घडले नसते, असे थोडेच आहे? पण एक नक्की- कार्यक्रमासाठी बाहेरगावी पहाटे पाचला निघायचे असेल, तर दाभोलकर पहाटे साडेतीनला उठायचे, पण व्यायाम कधीही चुकवायचे नाहीत; मग आदल्या रात्री कितीही उशिरा घरी आलेले असोत. त्यांची गुणवत्ता ही त्यांच्या अंगभूत प्रतिभेसोबतच या प्रकारची शिस्त, चिकाटी आणि मेहनतीतून निर्माण झाली होती. कार्यक्रमाला बसल्यावर कितीही ज्युनिअर कार्यकर्ता बोलत असला, तरी त्यांच्या हातात वही-पेन असणारच आणि त्याच्या बोलण्यात एखादा महत्त्वाचा मुद्दा आला की, तो टिपून घेणार.

प्रत्येक वेळी हा माणूस भेटायचा तेव्हा त्याच्या प्रतिभेची, प्रश्न समजून घेण्याची आणि नावीन्यपूर्ण कार्यक्रम सुचविणाऱ्या कल्पकतेची नवीच उंची समोर यायची. अनेक क्षेत्रांतील त्यांच्या गुणवत्तेचे अशा टोकदारपणे दर्शन व्हायचे की,

अशा वेळी तुम्ही खुज्या मनोवृत्तीने विचार करणारे असाल, तर तुमच्या मनात असूया निर्माण व्हावी आणि तुम्ही उमद्या स्वभावाचे असाल, तर 'गड्या, आपल्यालाही यांच्यासारखं जमायला हवं,' अशी सकारात्मक इर्ष्या मनात निर्माण व्हावी. पुरोगामी, समाजवादी चळवळीजवळ साधनांची वानवा ही नेहमीचीच. डॉ. दाभोलकर अडुसष्टाव्या वर्षीही शक्य तेवढा प्रवास एस.टी. बसने, रेल्वेने करायचे. शहरातल्या शहरातही शक्य तिथे पायी फिरायचे.
कार्यक्रम/उपक्रमांचे आयोजन करताना कमीत कमी संसाधनांच्या आधारे जास्तीत जास्त परिणामकारकता साध्य करण्याची त्यांची हातोटी हे त्यांचे खास वैशिष्ट्य. या त्यांच्या प्रभावी संघटनकौशल्याचा अनुभव सामाजिक कृतज्ञता निधीच्या उभारणीच्या वेळी सर्वांनी घेतला. सामाजिक कृतज्ञता निधी उभारणीसाठीचे योगदान, बाबा आढाव, श्रीराम लागू, निळू फुले, सदाशिव अमरापूरकर आणि अशा सर्वांचेच. पण 'लग्नाची बेडी' नाटकाच्या प्रयोगांचे महाराष्ट्रभरातील दौऱ्याचे नियोजन असो की, 'एक उपवास कृतज्ञतेचा' या अभिनव उपक्रमातून महाराष्ट्रभरातील विद्यार्थ्यांकडून निधी जमा करण्याचे नियोजन असो; डॉ. दाभोलकरांनी घेतलेली मेहनत आणि केलेले तपशीलवार व काटेकोर नियोजन आजही सर्वांच्या लक्षात आहे.

डॉ. दाभोलकर हे राष्ट्रीय पातळीवरचे कबड्डीपटू, व्यवसायाने डॉक्टर. सुरुवातीच्या काळात समाजवादी युवक दल या ॲक्शन ग्रुपच्या माध्यमातून त्यांची वैचारिक बैठक पक्की होत गेली. १९८५ च्या आसपास अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीशी त्यांनी नातं जोडलं. त्याच काळात विषमता निर्मूलन चळवळीतून कल्पना पुढे आलेल्या 'सामाजिक कृतज्ञता निधी'ची धुरा त्यांनी खांद्यावर घेतली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामाची व्यापकता ही हळूहळू विकसित होत गेलेली आहे आणि डॉ. दाभोलकरांच्या व्यक्तिमत्त्वाची प्रगल्भताही त्या निमित्ताने महाराष्ट्रासमोर येत राहिली. त्यातूनच सानेगुरुजींनी सुरू केलेल्या आणि समाजवादी विचारांची भक्कम परंपरा असलेल्या साधना साप्ताहिकाचे संपादकपद त्यांच्याकडे चालत आले. साधनाची जबाबदारी त्यांनी स्विकारल्यावर 'साधना'ची पाने वाढली, तितक्याच गतीने आतल्या मजकुराची गुणवत्ताही वाढली.

पुरोगामी समाजपरिवर्तनाच्या दिशेने समाजाची वाटचाल व्हायची असेल, तर समाजातील निरर्थक कर्मकांड व अनिष्ट प्रथांना आव्हान द्यावे लागणार. या कर्मकांड आणि प्रथांना जर धर्मश्रद्धेचा आधार आहे असे हितसंबंधी लोक मांडत असतील, तर मग अशा मतलबी धर्मकल्पनेची चिकित्साही आवश्यक बनते. अशी वाटचाल अंनिसला करावी लागली. दुसऱ्या बाजूला जात या संकल्पनेला कुठलाही वैज्ञानिक आधार नसल्याने जात हीच सर्वांत मोठी अंधश्रद्धा आहे, असे मानून जाती-अंताचा लढाही अग्रभागी आणावा लागतो. त्यासाठीच त्यांच्या सार्वजनिक जीवनाच्या अगदी शेवटी-शेवटी डॉ. दाभोलकर हे 'जातपंचायतीला मूठमाती द्या' या अभियानात सक्रिय झाले होते. दाभोलकर काम करत होते त्या वेगवेगळ्या संस्था, संघटना पुरोगामी समाजपरिवर्तनासाठीचा एक-एक विषय हाताळत होत्या.

दाभोलकर स्वत: मात्र त्यातून एकत्रितपणे एका समग्र अशा व्यवस्था-परिवर्तनाचा विचार पेरत होते. अतिशय आक्रमकपणे आणि जोरजोरात बोलणारे किंवा मधे मधे टाळ्याखाऊ वाक्ये पेरणारे वक्ते आपल्या आजूबाजूला बरेच दिसतात. डॉ. नरेंद्र दाभोलकर हे त्या पठडीतले वक्ते नव्हते. ते अतिशय शांतपणे आणि मुद्देसूदपणे बोलायचे. त्यातून समोरच्याच्या मनातील विचार प्रक्रियेला चालना मिळायची. त्यांच्या बोलण्यात कुणावरही व्यक्तीगत टीका नसायची. कुणाची निंदानालस्ती

तर कधीच नाही. तरीही डॉ. नरेंद्र दाभोलकरांना संपवलेच पाहिजे असे त्यांच्या खुन्यांच्या सूत्रधारांना का वाटले असावे? शांततेतली ताकद हे त्यापाठीमागचे कारण स्पष्ट आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या संवादशैलीची परिणामकारकता जबरदस्त होती. संबंधित विषयाबाबतच्या श्रोत्यांच्या मनातील केवळ शंका कुशंकाच नव्हे तर भीतीसुध्दा घालवत. गैरसमज दूर करत त्यांचे संभाषण त्याच्या मनातील चिकित्सक प्रवृत्तीला जागे करायचे आणि मग श्रोत्यांच्या मनात विवेकी विचारांचा जागर सुरु व्हायचा जो त्यांना स्वप्रेरणेने विवेकाच्या रस्त्यावर पुढे पुढे चालायला मदत करायचा. दाभोलकर अनेक विषयांशी आणि संस्थांशी संबंधित काम करायचे. पण स्वाभाविक आहे की, अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कामाबरोबर त्यांची ठोस बांधिलकी होती. हे काम तसे संवेदनशील काम. लोकांच्या भावना आणि अस्मितासुध्दा या विषयात गुंतलेल्या असतात. अंधश्रध्दा निर्मूलनाचा विषय एका टप्प्यावर धर्मविषयक परंपरांच्या चिकीत्सेकडे जातोच. मानवी जीवनाबद्दलची अनिश्चितता आणि असुरक्षितता माणसाला सतत भयभित करत असते, चिंतेत टाकत असते. या भितीचा पध्दतशीरपणे लाभ उठविणारी यंत्रणा त्या त्या धर्मातील पूरोहितशाहीच्या रुपाने कार्यरत असते. पुरोहितशाहीला धर्माचा चिरंतन भाग असलेल्या नैतिक शिकवणूकीशी देणेघेणे नसते. स्वतःच्या उपजिविकेचे साधन म्हणून रुजवलेल्या कर्मकांडाशी त्यांची अधिक बांधीलकी असते. लोकांच्या मनात विवेकी विचारांची पेरणी सुरु झाली की, समाजमनावरील निरर्थक कर्मकांडाचा पगडा हळूहळू दूर होऊ शकतो. म्हणूनच दाभोलकरांची शांत आणि संयत संवादशैली धर्माच्या ठेकेदारांना अडचणीची ठरली असणार. एवढी प्रचंड क्षमता आणि गुणवत्ता असूनही कार्यकर्त्यांशी बोलताना-वागताना हा माणूस अंगभूतपणे लोकशाहीवादी होता. आपला मुद्दा समोरच्याच्या गळी उतरविण्यासाठी ते आर्जवी पद्धतीचाच वापर करायचे. त्यांना कधी चिडचीड करताना, रागावताना कोणी पाहिलेच नाही. स्वत:च्या क्षमतेवर प्रचंड विश्वास असलेल्या माणसाला रागवावेही लागत नाही आणि चिडचिडही करावी लागत नाही. आपल्यासोबत चार पावले चालणाऱ्या कार्यकर्त्याचाही ते तेवढाच सन्मान करीत. कारण चार पावलं चालू शकणारे आणखी दहा कार्यकर्ते जमवून मोठं काम पार पाडण्याची हिंमत त्यांच्यात होती.

अशा लाख मोलाच्या माणसाची भ्याडपणे हत्या केली गेली. धर्मांधांनी डाव साधला. केवळ मतांच्या राजकारणाचा विचार करून सर्व काही करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी ते जाईपर्यंत त्यांची उपेक्षा केली, हा सल मनात सतत राहील. लढाई मोठी आहे याचे भान आहेच. गौतम बुद्धांपासून सुरू झालेल्या या लढाईत संत तुकारामांसहित अनेकांचे बळी गेले आहेत. लढाई अवघड असली, तरी पुरोगामी विचार पुढे सरकतो आहे याची अनेक उदाहरणे दाभोलकर स्वतःच द्यायचे. ती सकारात्मकता जपत परिवर्तनाची गती वाढवावी लागेल. दाभोलकरांनी त्यांचे काम केले, आता आपली पाळी आहे. शिस्त आणि मेहनतीच्या आधारे स्वत:च्या अंगभूत क्षमतांचा कमाल पातळीपर्यंत विस्तार आपल्यापैकी प्रत्येकाला करावा लागेल. एकमेकांचे हात सतत एकत्र गुंफलेले असतील हे पहावे लागेल. परस्परपूरकता वाढवावी लागेल. सामूहिक कर्तृत्वामधून विवेकाचा आवाज बुलंद करावा लागेल. परिस्थितीने आपल्यावर टाकलेली जबाबदारी प्रामाणिकपणे निभवण्याचा निर्धार हे नरेंद्र दाभोलकरांना आठव्या स्मृतीदिनी सच्चे अभिवादन ठरेल.

■ ■ ■

# डॉ. नरेंद्र दाभोलकर : आधुनिक महाराष्ट्राचा एक पथदीप



राजाभाऊ शिरगुप्पे
९४२३२ ८७३२०

नशीब, भविष्य आदी गोष्टीवर माझा विश्वास नाही किंवा अशा गोष्टींनी आपले जगणे निश्चित केले जाते, हे मान्य न होण्याइतका मी वैज्ञानिक दृष्टीकोनाने प्रभावित आहे. परंतु आयुष्यात अनेक शक्यतांपैकी एखादीच शक्यता आपल्या वाटेला येते. हवे तर पारंपारीक भाषेत त्याला आपण अपघात म्हणूया म्हणजे; आपले जन्माला येणे ही नैसर्गिक गोष्ट असली तरी, विशिष्ट प्रकारच्या परिस्थितीचा लाभ होणे याला केवळ योगायोग, केवळ अपघातच म्हणता येईल. कारण अनंत शक्यतांपैकी ती एक प्रत्यक्षात आलेली शक्यता असते. माझ्याबाबतीत असे अनेक सुंदर अपघात झालेले आहेत. माझे कुटुंब परंपरेने वारकरी होते. माझे वडील तत्वज्ञानाचे प्राध्यापक होते. पुरोगामी भूमिका असलेल्या प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते होते, साहित्यप्रेमी होते. अनेक साहित्यिक, समाजकारणी महानुभवांचे जवळचे मित्र होते. या साऱ्याचा फायदा माझ्या घडण्याला, जगण्याला झाला. एरव्ही दूरचे आकाशात चमकणारे तारे वाटले असते, अशा व्यक्तिमत्वांचा सहवास आणि प्रेम मला आपसूकच आणि सहजगत्या मिळत गेले. त्या तेजस्वी ताऱ्यांपैकी एक तारा म्हणजे, डॉ. नरेंद्र दाभोलकर होय. १९७० नंतरचा महाराष्ट्र घडवण्यात ज्यांचा महत्वाचा वाटा आहे, त्यापैकी एक महत्वाचा शिल्पकार म्हणून डॉक्टरांची वर्तमानाला आणि भविष्यात इतिहासालाही निश्चितच नोंद घ्यावी लागेल.

माझ्यासाठी आणखी एक सुंदर अपघात म्हणजे, माझे कुमार तरूण वय हे निपाणी सारख्या कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमेवर असलेल्या गावात गेले, जे कानडी मराठी-संस्कृतिचा एक सुरेख समन्वय असलेले गाव आहे. पण गावातील सामाजिक परिस्थिती मात्र गरीब आणि श्रीमंत यातील थेट दरी दाखवणारी होती. श्रमिक आणि मालक हा वर्गीय भेद अंगावर येण्याइतका ठळक होता. सगळयात महत्वाचे म्हणजे, या श्रमिक वर्गातील स्त्रियांचे प्राबल्य जाणवणारे होते. एरवीही या पुरूषप्रधान व्यवस्थेत स्त्रियांचे होणारे शोषण आणि त्यांची दुरावस्था भयावह आहे. परंतु इथे मला स्त्रियांच्या बाबतीतील वर्गीय, लैंगिक आणि जातीयसुध्दा दुय्यमावस्था जीवघेणी कळून आली. योग्य वातावरणात जन्माला येऊन वाढण्याची संधी मिळाल्यामुळे हे आजुबाजूचे समाजवास्तव नेमकेपणाने व वस्तुनिष्ठपणे मला समजावून घेता आले. या समाजवास्तवाबरोबरच, सामाजिक शोषणाच्या बळी ठरलेल्या वर्गाच्या मनातील अंधश्रध्दा आणि वास्तवांचे दैववादी आकलन स्पष्टपणे दिसून येत होते. पण आर्थिक विषमता नष्ट झाली तरी, बाकीचे अज्ञानमूलक, सांस्कृतिक प्रश्न आपोआपच नष्ट होतील, असे एक भाबडे राजकीय व सामाजिक भान मनात तयार झाले होते.

मला वाटतं साधारण १९८० चा काळ असावा. निपाणीच्या बिडी-कामगार महिला भगिनींनी, आपल्या संघर्षातून निपाणीचे नांव एक पुरोगामी चळवळीचे केंद्र म्हणून संपूर्ण भारतातच नव्हे तर जगभर दुमदुमवले होते. त्यामुळे केवळ भारत भरातलेच नव्हे तर जगभरचे पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, चित्रपटकर्ते, लेखक, कवी या राष्ट्रीय

महामार्गावरच्या छोट्याशा गावात आपली पायधूळ झाडू लागले होते. त्यावेळी महाराष्ट्रातील लोकविज्ञान संघटनेने बेळगाव ते पुणे अशी एक लांब पल्ल्याची विज्ञान यात्रा काढली होती. तिला राष्ट्रसेवा दलाने साथ दिली होती.

शेतीतील विविध प्रयोगांपासून आधुनिक जगातील अंतराळ प्रयोगापर्यंत, अनेक प्रदर्शने व प्रात्यक्षिके त्या यात्रेत होती. गावोगावचे सामाजिक कार्यकर्ते, ठिकठिकाणी या यात्रेचे आयोजन व संयोजन करत होते. आम्हीही निपाणीमध्ये आमचे गुरू आणि तिथल्या कामगार चळवळीतील मुख्य नेते प्रा. सुभाष जोशी यांच्या नेतृत्वाखाली या यात्रेचे निपाणीमध्ये स्वागत व आयोजन केले होते. पण या यात्रेचे मुख्य आकर्षण जनतेसाठी ठरले होते ते केरळचे बी. प्रेमानंद. केरळमध्ये त्यांनी चालवलेली बुवा, मठाधिशांविरुद्ध त्यांच्या चमत्कारांचा पर्दाफाश करणारी अंधश्रध्दा निर्मूलन करणारी चळवळ खूप चर्चेत होती.

निपाणीत जेव्हा आम्ही त्यांचे प्रयोग पाहिले त्यावेळी खूपच भारावून गेलो कारण, त्याआधी हे चमत्कार आम्ही केवळ आणि केवळ धार्मिक भावनेतून आणि दैवीचमत्कार म्हणूनच पहात होतो. त्यामागचे कुटील राजकारण आणि अर्थकारण आमच्या आता लक्षात आले. पण यावेळी आम्हा विद्यार्थ्यांच, एका तिशी पेस्तीशीतल्या लगबग करणाऱ्या तरूणाने विशेष लक्ष वेधून घेतले होते. हा तरूण अगदी खुर्च्या मांडण्यापासून ते रस्त्यावर पडलेल्या कागदांचे कपटे उचलण्याचे कामही करत होता, बी प्रेमानंदाना सहाय्यक म्हणून. त्यांचा तो कुणीतरी कार्यकर्ता असावा, असा आमचा विद्यार्थी म्हणून समज झाला. नंतर कळले की, तो तरुण स्वत: एक डॉक्टर आहे त्यांचा व्यवसायही खूप चांगला चालला आहे आणि तरीही एक स्वयंसेवक म्हणून तो या यात्रेच्या नियोजनात कृतिशील होता. नंतर कळले की, त्या तरूणाचे नाव डॉ. नरेंद्र दाभोलकर आहे. या व्यक्तीशी, नंतर आपले खूपच जिवाभावाचे मैत्र होणार आहे, असे त्यावेळी वाटले नव्हते.

पुढे अनेक प्रसंगातून डॉक्टरांचे नाव वाचायला मिळायचे, ऐकू यायचे. आमच्यासारख्या विद्यार्थी कार्यकर्त्यांना सातारा हे चळवळीचं विद्यापीठ वाटायचं. डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. भारत पाटणकर, डॉ. बाबुराव गुरव, लक्ष्मण माने, किशोर बेडकिहाळ, विजय मांडके आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर आदी नावे सातत्याने ऐकू यायची. समाजवादी युवक दल, समता दल, छात्र भारती वगैरे संघटनांच्या नावांची पत्रके अमच्यापर्यन्त पोहोचायची. आमच्या दृष्टीने त्यावेळी सातारा म्हणजे एक अप्रूप होतं. आम्ही कधी कधी पाडगावकरांच्या वात्रटिकेच्या सुरात निरोगी चेष्टेने म्हणायचो, 'शहर जेथे, सर्व पुढारी!' सातारा शहरामध्ये या तरुणांनी केलेला शंकराचार्यांशी वाद-विवाद त्यावेळी महाराष्ट्रभर गाजला होता.

महाराष्ट्रात स्वातंत्र्योत्तर आणि जवळपास स्वातंत्र्यानंतर जन्मलेली एक पिढी तरुण होत होती. आजूबाजूच्या परिस्थितीकडे उघड्या डोळ्यांनी गंभीरपणे आणि साशंकतेनेही पाहत होती. परदेशीयांपासून स्वतंत्र होताना त्यावेळच्या तरुणाईने स्वातंत्र्य आणि स्वराज्याची जी स्वप्न पाहिली होती आणि रंगविली होती, ती प्रत्यक्षात कशी काळवंडलेली आहेत याचा अनुभव घेत होती. गांधीजींच्या पावित्र्य आणि शिलाधार आधारित, रामराज्याच्या स्वप्नांची त्यांचेच वारस कशी धूळधाण उडवत आहेत, हे निरखीत होते. त्यातुनच १९७३-७४ च्या दरम्यान जयप्रकाशजींच्या नेतृत्वाखाली गांधींजींचेच सत्याग्रहाचे हत्यार घेऊन गांधींजींच्याच गुजरातमध्ये तरुण विद्यार्थ्यांनी नवनिर्माण आंदोलनाचे शिंग फुंकले आणि बघता बघता भारतव्यापी झाले. महाराष्ट्र तर

शिवरायांपासून सततच अशा नवनिर्माणासाठी लढाईला सज्ज. संपूर्ण महाराष्ट्रातून वेगवेगळ्या ठिकाणाहून परिवर्तनासाठी गांधीवादी, समाजवादी, मार्क्सवादी अशा विविध विचारांची कंकणे बांधून तरुण मोठ्या संख्येने प्रस्थापितांच्या विरोधात संघर्षासाठी उतरले. डॉ. दाभोलकर हे अशाच धगधगत्या तरुणांमधून तयार झालेले व्यक्तिमत्व. राष्ट्र सेवा दल, समाजवादी युवक दल, समता दल, छात्र भारती अशा विविध पण समविचारी संघटनेतून तयार झालेला तरुण. आधी उल्लेखलेल्या विज्ञान यात्रेतून डॉ. दाभोलकरांचा विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन अधिक सजग झाला. प्रबोधनाशिवाय जागृती नाही, जागृतीशिवाय एकी म्हणजे संघटन नाही, संघटनेशिवाय संघर्ष नाही आणि संघर्षाशिवाय परिवर्तन नाही, याचे त्यांना नेमके भान आले. त्यातूनच परिवर्तनाचे एक बलशाली हत्यार म्हणून ते अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या संघटनात्मक कामाकडे वळले. खरे तर आखिल भारतीयत्वाचे बिरुद घेऊन एक संघटना या कामी आधीच महाराष्ट्रात कार्यरत होती. डॉक्टरही काही काळ त्या संघटनेकडे आकर्षित झाले होते. पण अल्पावधीतच त्या संघटनेच्या नेतृत्वाचे खुजेपण आणि दूरदृष्टीचा अभाव त्यांच्या लक्षात आला. मग तिथेच त्या नेतृत्वाशी संघर्ष करून आपला वेळ वाया घालवण्याऐवजी त्यांनी स्वतंत्र मार्ग चोखाळला आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती जन्माला आली.

ही संघटना डॉक्टरांनी स्पर्धेच्या हेतूने नक्कीच निर्माण केली नव्हती, किंबहुना स्पर्धा करणे किंवा स्वअस्तित्वासाठी कुरघोडी करणे हे त्यांच्या व्यक्तिमत्वातच नव्हते, याची साक्ष त्यांच्या विद्यार्थी दशेपासून दिसते. ते उत्तम कबड्डीपटू होते आणि अल्पावधीतच ते भारतीय पातळीवरचे खेळाडू बनले. भारतातर्फे त्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर पण खेळायची संधी मिळाली होती, पण त्या वेळच्या भारत-पाक संघर्षामुळे त्यांचा तो योग हुकला. ते उत्कृस्ट कबड्डीपटू होतेच पण आक्रमक खेळाडू नव्हते तर, संघाला विजय मिळवून देण्यासाठी सावधपणा दाखवणारा आणि बेरकेपणाने प्रतिस्पर्ध्याचा कमकुवतपणा निरखणारा आणि केवळ संघ विजयासाठीच खेळणारा असा तो एक निष्ठावान संघ सदस्य होता. शिवाय कबड्डी हा खेळ केवळ शक्ती आणि युक्तीचा नाही तर शास्त्रीयही आहे, याचे विलक्षण भान त्यांना होते. त्यामुळेच वर वर पहिलवानी वाटणाऱ्या या खेळावर ते एक आदर्श शास्त्रीय पुस्तक लिहू शकले. जे मराठीमध्ये आणि कदाचित इतर भाषांमध्येही एकमेव असेल.

मानवी प्रगतीचा मुख्य अडथळा अज्ञान आहे आणि अज्ञान हेच शोषकांचे बलदंड हत्यार आहे, याचे भान येताच डॉक्टरांनी आपल्या इतर सामाजिक चळवळीमधील सहभाग कमी करून आपल्याला सापडलेल्या अशा सत्याच्या प्रकाशात अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीला अक्षरशः झोकून दिले. पण हे झोकून देणे देखील निर्लेप होते. कबड्डी खेळताना जसे संघासाठीच फक्त, तसेच या सामाजिक, राजकीय संघटनेत काम करताना केवळ चळवळीसाठीच, समाजासाठीच फक्त, याबाद्दलची त्यांची धारणा निश्चित होती. संघटना वाढीसाठी सर्वदूर प्रवास आणि संपर्क संघटनेचा आत्मविश्वास आणि प्रभाव वाढविणेसाठी छोटेमोठे संघर्ष आणि या संघर्षांच्या विजयाच्या खात्रीसाठी एकीची मानसिकता. त्यातुन स्वतःच्या ताकदीचे भान वाढविणे अशा कुशल नेतृत्व दृष्टीने त्यांचे काम चाललेले होते.

नाणीजच्या नरेंद्र महाराजाचे पितळ उघडे पाडण्याच्या प्रयत्न त्यासाठी त्या महाराजांने पाळलेल्या गुंडांकडून खाल्लेला मार तसाच प्रकार त्या निर्मला मातेचाही. पण यातून सर्व सामान्य माणसांचा डॉक्टरांवरचा आणि संघटनेवरचा विश्वास बळावत गेला. संघटनेच्या कार्यकर्त्यांचा

भीमदेवी थाटात त्या जोतिषाने तथाकथित जोतिष शास्त्राचे पोवाडे गायले, मग डॉक्टरांनी अतिशय शांत स्वरात सौम्य आणि सुसंस्कृत शब्दात त्यांच्या प्रत्येक मुद्याचे बिनतोड खंडन केले. मी पहात होतो, प्रेक्षक तर मंत्रमुग्ध झालेच होते पण तो नामवंत जोतिषी मात्र आधींचा राणा भीमदेवी थाट विसरून लाल-पिवळा होऊ लागला होता. त्याच्या कपाळाच्या आट्या दाट झाल्या होत्या. त्याला उत्तर द्यायची संधी आल्यावर त्याने आकांडतांडव केले. डॉक्टरांच्या नेमक्या मुद्यांची उत्तरे देण्याऐवजी अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीची टिंगल टवाळी करण्यातच धन्यता मानली. त्याच्या समर्थक श्रोत्यांनाही आपल्या गुरूची उथळता नेमकी ध्यानात आली असावी. त्यानंतरही डॉक्टरांनी अजिबात विचलित न होता त्या जोतिषीबुवांच्या खोडसाळपणाची चिरफाड केली. मला खात्री आहे, की तिथे जमलेले त्याचे समर्थक नंतर त्याचे समर्थक राहिले नसावेत. डॉक्टर अभिनिवेशी नव्हते पण साक्षेपी आणि विवेकशील विचारवंत होते. सुरुवातीला जादूटोणा विरोधी असे संबोधन मिळालेली चळवळ हळूहळू जसा जनसमुदायाचा पाठिंबा मिळू लागला तसे, डॉक्टरांनी आपल्या खऱ्या ध्येयाकडे तिला नेण्यासाठी विविध कार्यक्रम आणि आघाड्या उघडल्या, तेंव्हा त्यांच्या मनातील ती विवेकाची चळवळ म्हणून विराट स्वरूप प्रकट होऊ लागले आणि लोकांच्या अज्ञानावर आधारलेल्या संघटनांचे आणि राजकीय पक्षांचे धाबे दणाणू लागले. त्यातून महाराष्ट्र अंनिसवर कायदेशीर बंदी आणावी यासाठी काही राजकीय पक्षांनी विधानसभेत ठराव आणण्याचा प्रयत्न केला. पण पुरोगामी महाराष्ट्रात त्यांची डाळ शिजू शकली नाही. इतके की तब्बल अठरा वर्षे झगडून अंधश्रध्दा निर्मूलनाचा कायदा संपूर्ण भारतात, महाराष्ट्राच्या विधानसभेत काही मर्यादांनी का होईना संमत करावा लागला. डॉक्टरांची वैज्ञानिक दृष्टीकोनाची निर्मिती म्हणजेच 'विवेकशील आणि तर्कशुध्द' अशा समाजाची गरज नेमकेपणाने ओळखली होती. जो सर्वप्रकारच्या विषमता आणि शोषणांना विराध करेल, असा समाज नव्या पिढीतूनच अधिक सामर्थ्यशीलपणे निर्माण होऊ शकतो, हे नेमकेपणाने ओळखून त्यांना शाळा महाविद्यालयातून विद्यार्थी, शिक्षकांसाठी विवेकवाहिनीचे संघटन सुरू केले. भारतीय समाजातील जातव्यवस्था ही अंधश्रध्दा पोसूनच सांभाळली गेली आहे, कारण जात ही गोष्टच मूळात अवैज्ञानिक अंधश्रध्दा आहे. हे नेमके समाजशास्त्रीय सत्य जाणून त्यांनी जात पंचायतीच्या वर्चस्वातून जातींना मुक्त करण्याची चळवळ अंनिसतर्फे राबविली. कारण जातीच्या नावाखाली जातीतले गुंड लोक संपूर्ण जातीबांधव आपल्या ताबेदारीत कसे राहतील याच प्रयत्नात असतात व त्यासाठी अज्ञानमूलक जातभ्रम पोसत असतात. या जातीव्यवस्थेला निर्णायक धक्का देण्याचे एक महत्वाचे पाऊल डॉक्टरांनी अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीच्या जनाधाराने केले. अंधश्रध्दा मुख्यतः मानवी मन गुलाम ठेवण्यासाठी जाणीवपूर्वक निर्माण केल्या जातात. त्यासाठी देव, धर्म आणि जात या संकल्पनांचा वापर केला जातो. त्यामूळे याच्या हितसंबंधी लोकांना डॉक्टर एक मोठा शत्रू वाटू लागले. त्यातूनच त्यांनी डॉक्टरांच्या अपघाताने ब्राह्मण असल्यामुळे बहुजनांच्या नुकसानासाठीच अशा प्रकारची चळवळ राबवत आहेत, असा कांगावा सुरू केला. पण या चळवळीला बहुजन जातीजमातींचाच प्रचंड पाठिंबा लाभल्याने ही केवळ कशी कोल्हेकुई आहे, हे सिध्द झाले. तीच गोष्ट ब्राह्मण्यवादी संघटनांची. डॉक्टर हे कसे आपले ब्राह्मण्यत्व लपवण्यासाठी, कसे ख्रिश्चन, मुस्लिमांचे पक्षपाती आहेत व हिंदूचे शत्रू आहेत, असा कानठळ्या बसवणारा घोष केला. पण डॉक्टर शांतपणे आपले काम करत राहीले आणि त्यांच्या या पोकळ गोंगाटाला काहीच अर्थ उरला नाही. मांत्रिकांच्या, भगतांच्या

फसवणुकीपासून जनसामान्यांना सावध करण्यासाठी घेतलेल्या कार्यक्रमांपासून, धर्माच्या नावाखाली आपले माणूसपण कसे गोठवून टाकलं जात आहे, याचे विराट जाणीव देणारी आपले मनुष्यत्व जागवणारी आणि एका आदर्श समाजाकडे वाटचाल करण्यासाठी उद्युक्त करणारी चळवळ डॉक्टरांनी पंचवीस वर्षाच्या आपल्या या संघटनेच्या वाटचालीत सक्षमपणे उभी केली. इतकी सक्षमपणे की, सर्वसामान्य माणसाला सुरुवातीला धर्मद्रोही वाटलेला हा माणूस आपला खराखुरा हितचिंतक व मार्गदर्शक वाटू लागला, अगदी गणेश विसर्जनाचे उदाहरण घ्या. प्लॅस्टर ऑफ पॅरीस, विषारी रंग व निर्माल्य प्रवाहित पाण्यात टाकून आपणच आपली नदी गढूळ करून स्वतःचे जैविक नुकसान करून घेत आहोत, याची जाणीव आता सर्वसामान्य माणसाला अगदी खोलवर झाली आहे. सुरुवातीला ही भूमिका घेतल्यावर प्रतिगामी संघटनांनी डॉक्टरांच्या विरूध्द जनमत पेटवण्याचा प्रयत्न केला होता. पण सामान्य जनता फार काळ भ्रमात ठेवता येत नाही व विवेकहिनही राहत नाही हेच डॉक्टरांनी केलेल्या वेळोवेळी केलेल्या विविध आंदोलनातून व लढ्यातून स्पष्ट होते.

डॉक्टर ज्या स्फूर्तिप्रेरणेतून वाढले त्यातले एक नाव म्हणजे 'सानेगुरूजी'. सानेगुरूजींचे मातृहृदयता आणि विज्ञाननिष्ठ, समाजवादी ही प्रमुख वैशिष्ट्ये. त्यातूनच त्यांनी 'कर्तव्य' नावाचे दैनिक व नंतर 'साधना' नावाचे साप्ताहिक सुरू केले. गुरूजींनंतर साप्ताहिक साधना हे समाजवादी विचारांच्या त्यांच्या शिष्य गणामध्ये राहीले. पण त्याच त्या साप्ताहिकाच्या मर्यादाही ठरल्या. खरे तर गुरुजींच्या इच्छेप्रमाणे ते साप्ताहिक समाजाला वर्धिष्णू करणारे, पुरोगामित्व जपणारे, तरूण पिढीचे सशक्त माध्यम व्हावे असे होते. पण आणिबाणीच्या काळातील यदुनाथजी थत्तेंच्या संपादकाचा अपवाद वगळता साधना हे मूळभर वर्तुळात फिरणारे साप्ताहिक राहिले. आज महाराष्ट्रातल्या प्रमुख साप्ताहिकांमध्ये साधनाचे नाव प्रामुख्याने घेतले जाते, इतके साधना लोकप्रिय झाले आहे. शिवाय विविध थरातील व वयातील वाचक गटामध्ये आवर्जून वाचले जाते, याचे मुख्य श्रेय डॉ. दाभोळकरांच्या संपादनाला आणि त्यांनी दिलेल्या साप्ताहिक साधनाच्या नव्या रूपाला आहे. सानेगुरूजींच्या इच्छेप्रमाणे संपादकाची धुरा पत्करल्यावर त्यांनी साधनेला अधिकाधिक, वाचकाभिमुख करण्यासाठी विविध प्रयत्न आणि प्रयोग केले. त्यांनी वेगवेगळ्या स्तरातले आणि महाराष्ट्राच्या विविध भागातल्या कार्यकर्त्यांना वाचकांना लिहिते केले. आज विनोद शिरसाट हे साधनेचे विद्यमान संपादक असले व महाराष्ट्राला एक साक्षेपी संपादक म्हणून ज्ञात झाले असले तरीही, हे माणिक डॉक्टरांनी शोधले आहे, हे विसरून चालणार नाही. डॉ. चळवळीच्या भाषेत रणभूमीवरचे योध्दे होते. सैनिकांना प्रोत्साहित करणारे सेनापती होते. पण त्याही पलीकडे जाऊन आपल्या सोबतच्या सगळ्यांनाच आपल्याइतकेच उंच बनणारे शिल्पकार होते. त्यामुळेच अंनिसच्या वाटचालीत त्यांनी सर्व वयोगटातील आणि लिंगभेदातीत निष्ठावान कार्यकर्ते उभे केले. म्हणूनच आपल्या सोबत त्यांनी चळवळीची धुरा वाहण्यासाठी आपल्याच संस्कारात तयार केलेला अविनाश पाटील सारखा ग्रामीण भागातून आलेल्या तरूणाला आपल्या कार्याचा वारस म्हणून सक्षमपणे उभे केले. तर साधनेचे संपादक पद सांभाळताना विनोदचे नेमकेपण डॉक्टरांनी अचूक ओळखले आणि साधनेच्या युवा संपादकापासून ते कार्यकारी संपादकापर्यंत त्याच्यावर अनेक जबाबदाऱ्या सोपविल्या. त्यातून विनोदने आपले संपादकीय, श्रेष्ठत्व तर सिध्द केलेच, पण डॉक्टरांचा उत्तराधिकारी कोण? हा प्रश्न डॉक्टरांच्या मनातूनही काढून टाकला होता. डॉक्टरांच्या दुर्दैवी हत्येनंतर साधनेचा संपादक म्हणून विनोदने सूत्रे स्वीकारली. डॉक्टरांचे आडाखे व निर्णय किती अचूक असत

आत्मविश्वास वाढला, सदस्यांची संख्या वाढत चालली. गावोगावच्या मांत्रिकांचा आणि भोंदू बाबांच्या तथाकथीत चमत्कारांचा पर्दाफाश अंनिसकडून होऊ लागला आणि दैवत्वाच्या नावाखाली लाचलेली त्यांची हातचलाखी, जादूगिरी सर्वसामान्याला कळू लागली. सगळ्यात महत्वाचे म्हणजे सामान्य माणसांच्या मनात श्रध्दा आणि अंधश्रध्दा यांच्यातील फट रूंदावू लागली. धुळे जिल्ह्यातील आदिवासींच्यामध्ये असलेली डाकीण पध्दतीबद्दल अंधश्रध्दा हे असेच एका निर्णायक जागृतीचे उदाहरण. सूरुवातीला सामाजिक चळवळीतील अनेकांना डॉक्टर आस्थांना हात घालून, आदिवासी संस्कृतिला दुखावत आहेत असेच वाटत होते. पण बेडर कब्बड्डीसारखेच डॉक्टर याही पटात घुसले आणि त्यांनी दाखवून दिले की 'डाकीण' ही प्रथा आदीवासी संस्कृतीचा भाग नाही, तर, त्यांच्या शोषणाचे माध्यम आहे. तीच गोष्ट शनिशिंगणापूरच्या लढ्याची. वरवर पाहता शिंगणापूरमध्ये अंधश्रध्देतून का होईना, पण चोरीसारखे गुन्हे घडत नाहीत, असा प्रवाद निर्माण केला गेला होता. पण वस्तुनिष्ठ विचार न करणारे मन, सहजपणे शोषकांचे गुलाम होऊ शकते. त्यामुळे असे अशक्त मन जोपासणे ही शोषकांची गरज म्हणूनच वरवर चांगली वाटणारी अंधश्रध्दा जोपासली जाते. खरी मानवता आणि खरा सत्शील समाज विवेकी मनच निर्माण करू शकते. हे एक शास्त्रीय सत्य डॉक्टरांनी जाणले होते त्यामुळेच वरवर विपरीत वाटणारा संघर्ष त्यांनी घेतला. आंदोलनाला नावच त्यांनी 'चला चोरी करायला' असे वरवर गमतीदार आणि विक्षिप्त वाटणारे दिलेले होते. पण त्यातून त्यांना संपूर्ण समाजच विवेकशील बनवून चोरीमुक्त करायचा होता हे खरे.

माझे बालपण कोकणातच गेले आहे. कोकणामध्ये घरातून आणि झोपड्यातून जेवढी माणसे राहतात, त्यापेक्षा कितीतरी पटीने तिथल्या झाडा-झाडावर भूते वस्ती करून आहेत, या समजातच तिथली माणसे जगत असतात. डॉक्टरांनी 'शोध भूताचा बोध मनाचा' या आंदोलनातून या कोकणातल्या भूतांची पाठच घेतली. गावागावातील तरूणांना, शाळा शाळातील मुलांना सज्ज करून स्मशानसहली आयोजित केल्या. काहीवेळा तर स्मशानात रात्रीचा मुक्काम करून, स्मशान भोजनही केले आणि सर्वसामान्यांच्या मनातील भूतांना काढता पाय घ्यायला भाग पाडले. डॉक्टरांनी जेंव्हा अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीचे काम सूरू केले, तेंव्हा मी या त्यांच्या चळवळीत सामील झालो होतो. पण गावोगावच्या लुंग्यासुंग्या मांत्रिकांना भगतांना खोटे पाडून का क्रांती होणार आहे? आमूलाग्र समाजपरिवर्तन झाले की, हे शुल्लक प्रश्न आपोआप नष्ट होतील, अशा क्रांतिकारी तत्वज्ञानाने आम्ही भारलो होतो. त्यामुळे डॉक्टरांच्या या जादूच्या प्रयोगात आपल्याला काही रस नाही, अशी टिंगल करत आम्ही बाहेर पडलो होतो. डॉक्टर आपल्या नेहमीच्या स्वभावानुसार शांत राहिले, पण डॉक्टर एक छोटी काडी लावून, शिलगावून एका मोठ्या लढाईची तयारी करत आहेत, हे लक्षात येण्याइतके राजकीय संवेदन आमच्याकडे नव्हते हे खरे. पण डॉक्टर शांतपणे काम करत राहीले. ते करत असताना कुठलाही आकांडतांडव न करणे, उर फाटतोय की काय, असे वाटण्याइतकी दमछाक न करून घेणे. हा डॉक्टरांच्या संयतशील व्यक्तिमत्वाचा आणि नेतृत्वाचा गुण होता. याच गुणामुळेच डॉक्टर समोरची व्यक्ती कितीही आक्रमक असली, तरी शांत राहू शकायचे, शांतपणे प्रतिवाद करायचे. मला आठवते पुण्यात एका लोकप्रिय जोतिष तज्ञाबरोबर त्यांचा जाहीर वाद ठरविला होता. प्रथम त्या जोतिषाने मांडणी करायची नंतर डॉक्टरांनी त्याचे खंडन करायचे, त्यावर त्या जोतिषाने प्रतिवाद करायचा आणि मग डॉक्टरांनी त्याचे खंडन करायचे, असे काहीसे कार्यक्रमाचे स्वरूप ठरविले होते. मोठ्या राणा

तेच त्यातून सिध्द झाले. डॉक्टरांनी संपादक या नात्याने महाराष्ट्रातल्या मान्यवर संपादकांच्या रांगेत अत्यंत महत्वाचे स्थान मिळविले होतेच, पण त्याहीपेक्षा अंधश्रध्दा निर्मूलन चळवळीच्या निमित्ताने जे विपुल लेखन केले (त्यातील अजून अप्रकाशित) व समाजकारण, राजकारण आणि शास्त्रीय दृष्टीकोन याची सांगड किती अतूट आहे याचा पाठच त्यांनी आपल्या लेखनातून कार्यकर्त्यांना समाजचिंतकाना आणि लेखकांना घालून दिला आहे.

विद्यार्थीवयापासून डॉक्टर समाजकारणात आणि परिवर्तनवादी राजकारणात आले. तीन प्रकारच्या घराणेशाही असतात. पहिली घराणेशही ही राजकीय असते जी केवळ राजकीय सत्तेतून मिळणाऱ्या लाभासाठी, सत्ता आपल्याच घरात रहावी म्हणून लायकी नसलेल्या वारसांनाही अपघाताने मिळते. दुसरी घराणेशाही आर्थिक असते. त्याच्यामध्ये आर्थिक ताकद आहे, तोपर्यंत त्याचा लाभ वारसांना मिळतो तिसरी घराणेशाही मात्र सांस्कृतिक असते. ही मात्र अपघातानेच वारस म्हणून पुढे येते, कारण वारस म्हटल्या जाणाऱ्या प्रत्येक वारसामध्ये स्वतःची ती क्षमता असावी लागते. अशी तीनच घराणी सामाजिक पातळीवर मला महाराष्ट्रात दिसतात ते म्हणजे वडोदऱ्याचे आमटे कुटुंब, गडचिरोलीचे बंग कुटुंब आणि साताऱ्याचे दाभोलकर कुटुंब. डॉक्टरांचे ज्येष्ठबंधू दत्तप्रसाद दाभोलकरांनी आपल्या आत्मचरित्रपर लेखात म्हटले आहे की, 'ते एकूण दहा भावंडे पण त्यांची आई गंमतीने म्हणायची की दहा दाभोलकर पण एक नाही दुसऱ्यासारखा.' दाभोलकर कुटुंबाकडे पाहीले की, या साऱ्या कर्तृत्वान भावंडांचे आईने केलेले वर्णन अगदी सार्थ आहे, हे निःसंशय पटावे. डॉ. नरेंद्र दाभोलकर हे आणखीच अनोखे व्यक्तिमत्व. कबड्डी खेळाडूची सांघिक भावना, आक्रमकता आणि प्रसंगी बचावात्मक पवित्रा, या सर्व गुणांचे वैशिष्ट्यपूर्ण एकत्रीकरण डॉक्टरांच्या व्यक्तिमत्वात होते. १९७५ नंतरच्या नवमहाराष्ट्र निर्मितीत सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक पातळीवर स्वतःचे एक दखलयोग्य स्थान निर्माण करून पुढच्या पिढ्यांसाठी 'दीपगृह' झालेले ते एक अद्भूत व्यक्तिमत्व होते.

■ ■ ■



# प्रिय डॉक्टर, कसे आहात?



विनायक सावळे
९४०३२ ५९२२६

प्रिय डॉक्टर,

कसे आहात?

अर्थात आम्हा सगळ्या कार्यकर्त्यांच्या मनात, एक तर सतत मिस करीत असतो आम्ही तुम्हाला. आठवण येत असते तुमची सातत्याने. तुमच्या सोबतचे क्षण, आठवणी यांचं मोहोळ दाटून येतं बऱ्याचदा. तुमचं ते खळखळून हसणं आठवत राहतं. तुमची भाषणे, अनेक कवींच्या तुम्हाला तोंडपाठ असलेल्या स्फूर्तिदायक कवितांची निवेदने डोळ्यांसमोर उभी राहतात आजही, अगदी जशीच्या तशी! राज्य बैठकीत धीरगंभीरपणे केलेली चर्चा आठवत राहते, संघर्षाच्या क्षणी तुम्ही कसे शांत राहिलात अनेकदा, हे स्मरत राहतं. इतक्या व्यस्ततेत किती लिखाण केलंत तुम्ही, याचा अभिमान वाटत राहतो. तुमचा साधेपणा नजरेसमोर तरंगत राहतो.

बैठकीत मधेच डोळ्यावरचा चष्मा एका हाताने काढून घेऊन दोन्ही तळहाताने काही क्षण डोळे बंद करून परत डोळ्यांवर चष्मा लावून कामाला लागण्याची तुमची लकब स्मरते. सोबतच तुमच्याशी केलेले संवाद, घातलेले वाद आठवतात. या वादातही तुम्ही किती शांत होता, ऐकत होतात हेदेखील स्मरतं. या आठवणींच्या रूपांत सतत सोबत असता तुम्ही आमच्या.

पण हे आठवत राहणं, विविध भावनांचे तरंग उठणं, हे आता अधिक घडतंय डॉक्टर आणि त्याला पार्श्वभूमी पण तशीच आहे. ज्यांच्यावर तुम्ही विश्वास टाकला, त्या विश्वस्त संस्थेनेच संघटनेला अंधारात ठेवत स्वतंत्र नवी संघटना उभी करण्याचा घाट घातलाय. महाराष्ट्रभर फोडाफोडी करण्याचा प्रयत्न सुरु आहे. आपल्या संवादाच्या प्रयत्नांना लाचारीची उपमा दिली आणि यात आपलेच रक्तसंबंध आघाडीवर आहेत. हे तुम्हाला सांगताना मला खूप हिम्मत करावी लागते आहे डॉक्टर. पण तुमच्याशी मोकळेपणाने नाही बोलायचं तर कुठे बोलायचं? आपल्याला अधिक सजग आणि व्यवहारी रहायला हवं होतं. पण आपण नाही राहू शकलो. तो कष्टाने उभा केलेला पैसा, वार्तापत्र सर्वच हिरावून घेण्यात आलं. मग अशावेळी आपल्याकडे दोनच मार्ग होते. एक तर निराश होऊन थांबायचं आणि दुसरा निराशा झटकत पुन्हा नव्याने उभारी घेण्यासाठी सज्ज व्हायचं.

आपण दुसरा मार्ग निवडला. डॉक्टर, तुम्ही उभे केलेले बहुतांशी कार्यकर्ते आजही संघटनेच्या नव्याने उभारणीच्या कामात जीव ओतून काम करीत आहेत. अनेक मोह दाखवून, खोट्या गोष्टी सांगून त्यांचे मन अस्थिर करण्याचे प्रयत्न केले गेले. पण याही स्थितीत बहुतांशी कार्यकर्त्यांनी संघटनाच सर्वोच्च मानली. हे आपल्या संघटना बांधणीच्या प्रयत्नांचं यशच म्हणावं लागेल. तुम्ही जोडलेल्या सच्चा कार्यकर्त्यांनी संघटनेप्रती आपली बांधिलकी दर्शवली.

आजमितीला विश्वास-अविश्वास, शंका-कुशंका, आरोप-प्रत्यारोप, वाद-विवाद, संवाद असे अनेक टप्पे संघटनेने अनुभवले डॉक्टर. पण आता

हे सर्व आपण मागे टाकले आहे. यात पुन्हा आपण पडू इच्छित नाही. आपण आपला मार्ग निवडला आहे. कोणाशीही स्पर्धा न करता, कोणाबद्दलही राग, द्वेष आणि शत्रूभाव न बाळगता आपण निर्धाराने आपल्या मार्गावर चालण्याचा संकल्प सोडलेला आहे, 'जे येतील त्यांच्यासह, जे येणार नाहीत त्यांच्याशिवाय' संघटना पुढे घेऊन जाण्याचा निर्धार पक्का केला आहे.

डॉक्टर, कोरोनाच्या महामारीने फिरण्याला मर्यादा आल्या आहेत. त्यावरही मात करीत कार्यकर्ते प्रत्यक्ष शाखांवर जाऊन कार्यकर्त्यांशी बोलत आहेत. नव्या तंत्रज्ञानाच्याआधारे ऑनलाईन पद्धतीने अनेक बैठका, संवाद सभा, वेबिनार होत आहेत. ज्याला भरघोस असा प्रतिसाद अखंड महाराष्ट्रातून मिळतो आहे. एका बाजूला दुःखाची, वेदनेची भावना असताना, दुसऱ्या बाजूला नवनिर्माणाचा ध्यास घेऊन अनेक आघाड्यांवर आपले कार्यकर्ते लढत आहेत. याबद्दल तुम्हाला थोडं सांगावं, तुमच्याजवळ मन मोकळं करावं आणि हा नवनिर्माणाचा निर्धार तुमच्या समोर, व्यक्त करावा यासाठीचा हा पत्रप्रपंच.

डॉक्टर, कोरोना महामारीने अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार, व्यवसाय, कुटुंब व्यवस्था अशा अनेक क्षेत्रांवर त्याचे विपरीत परिणाम झाले आहेत. पण त्याचा सर्वाधिक परिणाम लोकांच्या मानसिकतेवर झाला आहे. प्रचंड ताण-तणाव, भीती, दहशत या आजाराने निर्माण केली असताना, आपण 'मानसमैत्र' नावाने एक स्वतंत्र हेल्पलाईन सुरू केली. संघटनेने सुरू केलेल्या या हेल्पलाइनला खूपच छान प्रतिसाद मिळाला. एकशेवीस पेक्षा अधिक कार्यकर्ते यात सहभागी झाले. या सर्व कार्यकर्त्यांना महाराष्ट्रातील नामवंत मानसोपचारतज्ज्ञांनी ऑनलाईन प्रशिक्षण दिले. अनेक प्रकारचे मानसिक आजार, त्या आजारांवर भावनिक प्रथमोपचार करण्याच्या पद्धती, संवादाच्या पद्धती याची तपशीलात माहिती दिली गेली. ज्यामुळं आपण कितीतरी कुटुंबांना मानसिक, भावनिक आधार देऊ शकलो. कितीतरी महिलांच्या वेदनेला वाट मोकळी करून देऊ शकलो, कितीतरी रोजगार गमावलेल्या तरुणांना भावनिक आधार देऊ शकलो. कर्जात बुडालेल्या कितीतरी शेतकऱ्यांना आपण हिम्मत देऊ शकलो. आपल्या एकट्या रायगड जिल्ह्याने अडीच हजार रुग्णांशी संवाद केला. शासनाच्या सहभागाने एक सुंदर यंत्रणा तिथे आपल्या साथींनी उभी केली आहे. किती अभिमानास्पद गोष्ट आहे ही डॉक्टर!

अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर आपण वेबिनार्स घेतले, जसं की, फलज्योतिष, मानसिक आजार, स्त्रियांचे प्रश्न, युवा, लिंगभाव इत्यादी. हे सगळे वेबिनार प्रचंड हिट झाले. प्रेक्षकांनी सगळयाच व्याख्यानमालांना उदंड प्रतिसाद दिला. भाषण सुरू होण्याच्या आधीच प्रेक्षक संख्या फुल झालेली असायची. यातून अनेक कार्यकर्ते आपल्याला मिळाले. त्या मिळालेल्या कार्यकर्त्यांचंदेखील एक सुंदर ऑनलाईन प्रशिक्षण आपण घेतलं. अनेक युवक-युवती आपल्या कामाशी जोडून घेण्यासाठी उत्सुक आहेत. किती आशादायी आणि आनंददायी गोष्ट आहे ना ही डॉक्टर!

डॉक्टर, याच सोबत जातपंचायतीच्या भयानक केसेस ही तशाच सुरु आहेत. त्याचाही लढा निर्धाराने सुरू आहे. जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत देखील गुन्हे दाखल करण्याचे काम सुरूच आहे. भानामतीची प्रकरणे, चमत्कारांचा भांडाफोड करणं देखील सुरू आहे.

फलज्योतिष विषयाने पुन्हा डोकं वर काढलंय. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने हा विषय अभ्यासक्रमासाठी लावण्याचा निर्णय घेतला आहे. बघा आता, एकच विद्यापीठ आता भूगोल पण शिकवणार आणि फलज्योतिष पण शिकवणार. भूगोलाचे शिक्षक विश्वाच्या केंद्रस्थानी सूर्य असून तो तारा आहे, असं शिकवतील आणि त्याच विद्यापीठाचे फलज्योतिषाचे शिक्षक विश्वाच्या केंद्रस्थानी पृथ्वी असून राहू, केतू नावाचे ग्रहही आहेत असं शिकवतील. किती भयानक विसंगती ठरणार आहे ही. शिक्षणाच्या गाभाघटकात सांगितलेल्या आणि संविधानात कर्तव्य म्हणून सांगितलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या मूल्याला छेद देण्याचं काम, हे इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठ करीत आहे. याला आपण विरोध केला. अगदी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यापासून ते यूजीसीपर्यंत आपण आपला निषेध नोंदविला.

आता मी तुम्हाला दोन खूप आनंदाच्या बातम्या देणार सांगणार आहे, 'युगांडा देशाने नरबळी विरोधी कायदा केला आहे.' त्या दूरवरील आफ्रिका खंडातील या मागासलेल्या देशाने इतका प्रभावी कायदा करण्यासाठी चक्क आपल्या संघटनेशी संपर्क साधला होता. हवी ती सर्व आवश्यक माहिती आपण त्यांना पाठवली होती. त्यांनी आपल्याला तिथं येण्याबाबतचे निमंत्रणही दिले होते, पण आपण जाऊ शकलो नाही. असो, पण नरबळीविरोधी कायदा करण्यासाठी, आपल्याशी इतक्या दुरून संपर्क केला जातो, आपली मदत घेतली जाते. याचबरोबर गेल्याच वर्षी आपल्याला अमेरिकेत 'अविजीत रॉय करेज अवार्ड' या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. किती अभिमानाचा क्षण होता तो? यावरून आपलं काम कसं आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलेलं आहे, याची सुखद जाणीव होते.
आणि आता दुसरी गोष्ट डॉक्टर. आपण आपलं स्वतंत्र मासिक सुरू केलंय, 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या नावाने. आजचा संवाद याच पत्रिकेच्या माध्यमातून होतोय बरं का. ही पत्रिकादेखील आपल्याला सर्वार्थाने उभी करायची आहे डॉक्टर. वाचकप्रिय करण्यासोबत तिला आर्थिक दृष्टीनेही स्वावलंबी करायचं आहे. कार्यकर्त्यांनी त्यासाठी निर्धार केलाय. हा निर्धार आपण गेल्या ११ जुलैला व्यक्त केला. ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. यशवंत मनोहर यांनी या पत्रिकेला सदिच्छा दिल्या. हा कार्यक्रमही एक सुंदर, वैचारिक मेजवानीच ठरला.

सध्या महाराष्ट्रभर संघटना संवाद महोत्सव सुरू आहेत. यात शाखांशी बोलणं, जिल्हा पदाधिकाऱ्यांशी बोलणं, आपल्या राज्य पदाधिकाऱ्यांशी बोलणं, शाखांच्या बैठका, जिल्ह्यांच्या बैठका या स्वरूपाच्या बैठकांची एकापाठोपाठ एक अशी सत्रंच सुरू आहेत. त्यामाध्यमातून, सातत्याने आपल्या कार्यकर्त्यांना नव्या परिस्थितीची जाणीव करून दिली जात आहे. संघटनेचं महत्त्व अधोरेखित केलं जात आहे. तुम्ही म्हणायचे ना डॉक्टर की, ''काही झालं तरी संघटना आपली आई असते, आईला लाथा घालता कामा नये." बस, तुमचा हाच विचार आपण कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवत आहोत.

अजून खूप कामं करायची बाकी आहेत डॉक्टर. पुन्हा नव्याने, सगळ्या अर्थाने उभं राहायचं आहे. तुमच्यात हत्तीच बळ होतं ना, ते आता आम्हाला सामूहिक संघटित शक्तीतून निर्माण करायचं आहे. जेव्हा आम्ही घोषणा देतो 'आम्ही सारे दाभोलकर', तेव्हाच अंगावर रोमांच उभा राहतो, ऊर्जा येते आणि हीच ऊर्जा आज कामाची

प्रेरणा बनली आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार हा ' जीवनधारणा' होता, आता या विचारांच्या संघटनेची पुनर्बांधणी हे 'जीवनध्येय' झाले आहे. तुम्हाला अभिप्रेत असलेली 'विवेक जागर प्रकाशन संस्था' सुद्धा आपल्याला सर्वार्थाने स्थापित करायची आहे. गरजेनुसार अजून काही नव्या रचना आपल्याला उभ्या कराव्या लागतील. त्यासाठीपण आपले प्रयत्न सुरू आहेत.

तुम्ही पण १९८९ साली अशाच शून्यातून सारं उभं केलं डॉक्टर. त्यासाठी तुम्ही जीवाचं रान केलं. अखेरच्या श्वासापर्यंत तुमच्या डोक्यात तेच सुरू असणार, याची खात्री आहे आम्हाला. डॉक्टर, आमच्या डोक्यात पण सध्या एकमेव संघटनाच असते. जागेपणीच काय, अगदी झोपेतही संघटना असते, निर्मितीचा ध्यास असतो. कष्टाने उभारलेलं सर्वस्व हिरावून घेण्याने आम्ही निराश नाही झालो, पण चीड आली, त्या चिडेलाच आम्ही सकारात्मक ऊर्जेत रूपांतरित करून पुन्हा सर्वार्थाने उभे राहण्याचा निर्धार केला आहे. ज्या सुवर्णकाळाचे आम्ही साथीदार आणि साक्षीदार आहोत, ते पुन्हा मिळवण्याचा हा निर्धार आहे. तुम्ही सतत सोबत आहातच डॉक्टर. ही तुमच्या स्मृतींची साथ कायम बळ देत असते. 'आपण पुन्हा उभे राहू नव्याने' बघा तुम्ही...!

लव यू, मिस यू,

'भेटत राहू, बोलत राहू, विवेकाचा आवाज बुलंद करू.'

आपल्या असंख्य कार्यकर्त्यांपैकी एक...

■ ■ ■



# आठवणीतले डॉ. दाभोलकर



माधव बावगे
९४०४८ ७०४३५

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष, शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाला येत्या २० ऑगस्टला आठ वर्ष पूर्ण होत आहेत. पुरोगामित्वाची बढाई मारणाऱ्या महाराष्ट्रात, डॉ. दाभोलकर व कॉ. पानसरे यांच्या सूत्रधारांपर्यंत तपास यंत्रणा अद्यापही पोहोचू शकलेली नाही. सहिष्णुतेचा टेंभा मिरवणाऱ्या केंद्र सरकारने, त्यांच्या सनातनी प्रवृत्तीची पाठराखण करीत हा तपास बासनात गुंडाळून ठेवला आहे, त्याबद्दल त्यांचा जाहीर निषेध नोंदवीत आणि डॉक्टरांच्या आठवणींना उजाळा देत त्यांचे कार्य चिरंतन पुढे नेण्याचा निर्धार करून कार्यकर्ते कार्यरत आहेत.

महा. अंनिसच्या राज्यभरातील शाखांमध्ये, लातूर केंद्र हे कार्यकर्त्यांचे मोहोळ होते आणि आहे. त्यामुळे डॉक्टरांचे लातूरकडे विशेष लक्ष होते. राज्य पातळीवरच्या बहुसंख्य मोहीमा, परिषदा, लातूरला झाल्या. त्या सर्वांसाठी डॉ. दाभोलकर हे लातूरला यायचे. ते कधीही लॉजवर थांबले नाहीत. ते नेहमी माझ्या घरीच मुक्काम करायचे. माझ्या घरी सकाळी आठ वाजता गरम-गरम जेवण तयार असायचे. त्यांना सवय नसतानाही ते जेवायचे आणि माझी पत्नी मंगलला म्हणायचे, 'तुझ्या घरी असलेली आठ वाजता जेवणाची सक्ती ही मला शिक्षा आहे. तरीही मी ती अतिशय आनंदाने दर वेळेला स्वीकारतो.'

दि. ३० सप्टेंबर १९९३ च्या विनाशकारी भूकंपाच्या भयानक आठवणी अजूनही पुसलेल्या नाहीत. सैरभैर मानसिकतेवरील ताण कमी करून लोकांचा आत्मविश्वास जागवण्यासाठी भूकंपग्रस्त भागात महा. अंनिसच्यावतीने ' निर्भय मानस मोहीम', 'भेट भुताची मोहीम' इत्यादी मोहिमा राबविल्या. त्या मोहिमेच्यावेळी डॉ. श्रीराम लागू, निळूभाऊ फुले यांचेसमवेत दोनदा डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी लातूरला भेट दिली. याच दरम्यान, भोंदू मल्लिनाथ महाराजांचा भांडाफोड केल्याने, चिडून जाऊन त्यांच्या समर्थकांनी मोहन माने या कार्यकर्त्यावर भ्याड हल्ला केला. तेव्हा त्या खुनी हल्ल्याचा निषेध म्हणून २ डिसेंबर १९९३ रोजी काढण्यात आलेल्या शांतता फेरीत सहभाग होऊन, शिक्षण पंढरीत बुवाबाजीबाबत डॉ. दाभोलकर यांनी लातूरकरांच्या डोळ्यात अंजन घातले होते.

महाराष्ट्र राज्य शासनाने नागपूर हिवाळी अधिवेशनामध्ये 'जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन अधिनियम २००५' हे विधेयक क्र. ८९ विधानसभेत मंजूर केलेले होते. हा कायदा मंजूर व्हावा, यासाठी सतत अठरा वर्ष पाठपुरावा करून, धरणे, आंदोलने, आमदार, खासदार यांना सह्यांची निवेदने, पत्रे, तारा पाठवल्या गेल्या. डोळ्याला काळ्या पट्ट्या बांधून आत्मक्लेश आंदोलने, स्वतःच्याच थोबाडीत मारो आंदोलन, स्वरक्ताने साह्यांची निवेदने, काळी पत्रिका प्रकाशन, अशा आंदोलनांद्वारे डॉक्टरांनी मागणीचा पाठपुरावा करण्यात सातत्य ठेवल्याने विधासभेत विधेयक मंजूर झाले.

शासनाने जो कायदा संमत केला, त्याला पूरक म्हणून महा. अंनिसने राज्यव्यापी जनजागरण मोहिमेचे उद्घाटन लातूर येथे सिनेअभिनेते

निळूभाऊ फुले यांचे हस्ते केले. यावेळी डॉ. दाभोलकर म्हणाले की, 'हे श्रेय माझे एकट्याचे नाही तर, माझ्या चळवळीतील तमाम कार्यकर्ते व राज्यातील सबंध पुरोगामी विचारांच्या एकत्रित शक्तीचे हे फलित आहे.' या निमित्त समविचारी पक्ष, संस्था, संघटना, साहित्यिक, पत्रकार, प्राध्यापक, वकील, महिला आदी बुद्धिजीवी घटकांतील मान्यवरांनी परिसंवादात या कायद्यास पाठिंबा दिला.

या अधिवेशनात विधानपरिषदेत हा कायदा मंजूर करावा, या मागणीसाठी महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष डॉक्टर नरेंद्र दाभोलकर व बुवाबाजी विरोधी संघर्ष विभागाचा राज्य कार्यवाह म्हणून मी, दस्तुरखुद्द तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या मतदारसंघात लातूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या पुतळ्यासमोर दोन दिवस हितचिंतक व कार्यकत्यांसमवेत राज्यस्तरीय धरणे व सत्याग्रह केला. नागपूर अधिवेशन कमी दिवस चालते. पहिल्या दोन दिवसात हे विधेयक मांडून मंजूर करावे, अशी अपेक्षा होती. पण पहिल्या दोन दिवसात तसे न झाल्याने अधिवेशनाच्या उर्वरित दिवसात हे विधेयक मांडून मंजूर करावे, ही मागणी पुढे रेटत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचे औचित्य साधून डॉ. नरेंद्र दाभोलकर व मी, आम्ही दोघांनी बेमुदत उपोषण करण्याचा निर्धार, या धरणे आंदोलनाच्या वेळी जाहीर केला. याचे कारण असे की, मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी दिलेले आश्वासन पाळावे. त्यांच्या मतदारसंघात उपोषण केल्याने, त्यांच्या मतदारसंघात आंदोलन चालू आहे, त्यामुळे कायदा मंजुरीसाठी सर्वांनी त्यांच्या पाठीशी उभे राहावे, असा आग्रह त्यांना सभागृहात धरता यावा म्हणून.

या अधिवेशनात जादूटोणा विरोधी विधेयक मंजूर करू, असे आश्वासन मुख्यमंत्री विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी दिले होते. मा. बाबा आमटे, सिने-नाट्य अभिनेते डॉ. श्रीराम लागू, सदाशिव अमरापूरकर यांचेसह राज्यातील अनेक मान्यवरांनी लेखी पत्र पाठवून मुख्यमंत्र्यांना विनंती केली होती. सिने अभिनेते निळूभाऊ फुले, कुलगुरू आणि जेष्ठ साहित्यिक डॉ. जनार्दन वाघमारे, भाजपचे खासदार डॉ. गोपाळराव पाटील, प्राचार्य अनिरुद्ध जाधव, ॲड. मनोहरराव गोमारे यांच्यासह अनेक मान्यवरांनी या उपोषण आंदोलनास कृतिशील पाठिंबा दिला. तसेच १५२ पक्ष, संस्था, संघटना यांनीदेखील प्रत्यक्ष उपोषणस्थळी भेट देवून आपला कृतिशील व लेखी पाठिंबा दिला होता. उपोषणाच्या पाचव्या दिवशी स्थानिक संयोजन समितीच्यावतीने जादूटोणा विरोधी कायद्याच्या समर्थनार्थ पाठिंबा म्हणून, जवळपास एक हजाराहून अधिक कार्यकर्ते, विद्यार्थी यांचा शहरातून एक भव्य मोर्चाही काढण्यात आला. या उपोषणादरम्यान पंचवीस हजाराहून अधिक पत्रकेही वाटण्यात आली. उपोषणस्थळी दररोज नवनवीन, अंदाजे तीनशे ते चारशे कार्यकर्ते आणि नागरिक येऊन दिवसभर थांबून पाठिंबा देत होते. उपोषणस्थळी पत्रकार, इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या प्रतिनिधींची, विवेकवाहिनी व कार्यकर्त्यांची लक्षणीय वर्दळ असायची.

या उपोषणादरम्यान, नागपूर विधानभवनातून महाराष्ट्र अंनिसचे राज्याध्यक्ष प्रा. एन. डी. पाटील व अविनाश पाटील यांच्यासह, प्रमुख कार्यकर्ते ठाण मांडून खिंड लढवत होते. वेगवेगळ्या शासन प्रतिनिधींचे, आमदारांचे डॉक्टरांना उपोषणस्थळी फोन येत होते. महाराष्ट्र शासन तेथे शर्थीने प्रयत्न करीत होते, असे वातावरण सबंध देशभर पसरले असतानाही प्रत्यक्षात काही घडत नव्हते.

बेमुदत उपोषणार्थी असलेले डॉ. नरेंद्र

दाभोलकर व मी स्वतः एकही दिवस दवाखान्यात दाखल झालो नाही. आम्हा दोघांचे तीन ते चार किलो वजन घटले होते, प्रकृती नाजूक असतानाही, डॉक्टर दाभोलकर हे पत्रकार व नागरिकांशी संवाद करीत असत. पोलिसांनी त्यांना अनेकदा दवाखान्यात नेण्याची सक्ती केली. मात्र ती न जुमानता, मी स्वतः डॉक्टर आहे, मला माझ्या प्रकृतीची खबरदारी घेता येते, असे ठणकावून सांगून ते नम्रपणे दवाखाना टाळत असत. परंतु माझी प्रकृती एके दिवशी अचानकपणे कमालीची गंभीर झाल्याने, संबंधित पोलिसांनी अगदी मध्यरात्री जबरदस्तीने मला रुग्णालयात दाखल केले. मात्र सकाळी उठून मी पुन्हा उपोषणस्थळी येऊन पूर्ववत, अगदी अखेरपर्यंत उपोषणास बसलो. मात्र आम्हा दोन्ही उपोषणार्थींच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे नित्य शेकडोंनी राबणारे हाडाचे कार्यकर्ते आतून कमालीचे उन्मळून गेले होते.

अधिवेशनाची सांगता झाल्याचे जाहीर झाले. हे विधेयक पारित व्हावे, यासाठी दहा दिवसापासून चालू असलेले आमचे उपोषण थांबवावे व अधिक ताकदीने पुढील काळात पुन्हा जोमाने लढा द्यावा, असा आग्रह साहित्यिक, विचारवंत, चळवळीचे सहकारी, हितचिंतक आणि कार्यकर्त्यांनी धरला. त्यानुसार आम्ही उपोषणकर्त्यांनी दि. १५ डिसेंबर रोजी एक तरुण कार्यकर्ती व एक तरुण कार्यकर्ता यांच्या हस्ते ज्यूस घेऊन शुक्रवारी दुपारी उपोषण सोडले. या अनुषंगाने बोलताना डॉ. दाभोलकर म्हणाले की, 'विधानसभेत मंजूर झालेले विधेयक विधान परिषदेत तब्बल वर्षभरात मंजूर करता येवू नये, ही बाब शासनाचा पराकोटीचा नाकर्तेपणा व असंवेदनशीलता दाखवते.'

या बेमुदत उपोषण सत्याग्रहाचा लेखाजोखा मांडायचाच म्हटला, तर, डॉ. दाभोलकर यांचेकडे पराकोटीची जिद्द, मेहनत व सत्यनिष्ठा होती आणि त्यांच्या जोडीला अत्यंत प्रामाणिक, कणखर व निष्ठावान अशा कार्यकर्त्यांची एक उमदी अभेद्य, खंबीर फळी होती. त्यांचे वा संघटनेचे कसलेही नुकसान झाले नाही. उलट संघटनेची ही मागणी, या बाबत दोन दिवसीय धरणे व दहा दिवस उपोषण असे तब्बल बारा दिवस हे उपोषण आंदोलन सबंध महाराष्ट्रवासीयांच्या नजरेत व ओठावर सहानुभूतीपूर्वक कायमस्वरूपी लक्षात राहिले. तसेच नेतृत्वाचा सामूहिक कस, तर कार्यकर्त्यांचे विशेष असे सहज एकत्रित प्रशिक्षणही झाले. जिद्द व भान परत झळाळून निघाले. या कायद्याच्या मागणीच्या निमित्ताने उभ्या महाराष्ट्रात फार मोठे प्रभावी व कृतिशील जनप्रबोधनही झाले. शिवाय एक नवा वर्ग समितीला जोडला गेला. तसेच गटातटात विभागलेली आंबेडकरी चळवळ या सत्याग्रहामागे एकसंघपणे एकत्रित उभा राहिली. हे एका दृष्टीने या सत्याग्रहाचे फलितच मानता येईल.

■ ■ ■



# विवेकवादी व्यक्तिमत्त्वाची सोबत



नितिन राऊत
९८२२० १०२७०

ही गोष्ट १९८९ सालातील आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर व अंधश्रद्धा निर्मूलन समिती हे नाव ऐकून होतो. परंतू त्यांचे काम कसे चालते? याबद्दल प्रत्यक्ष अनुभव घेतला नव्हता. एकदा आमच्या येथील एका स्थानिक वृत्तपत्रात छोटीशी नेरे पनवेल येथे अंनिसच्या कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिराची बातमी छापून आली होती. ती बातमी वाचून मी शोधत शोधत नेरे येथे पोहोचलो. तेथे डॉ. नरेंद्र दाभोलकर उपस्थित होते. ते स्वतः अनेक विषयांची मांडणी करीत होते. चमत्कार सादरीकरण अलका जोशी, उल्हास ठाकूर वगैरे मंडळी करत होती. तेव्हा तिथे मधल्या गप्पांच्या वेळात असे कळले की, डॉ. दाभोलकर यांनी काही साथींसह स्वतंत्रपणे महाराष्ट्र अंनिसचे काम सुरू केले आहे व ते शाखांची बांधणी करणार आहेत. त्यावेळी नेरे शिबिरातील उल्हास ठाकूर, प्रमोद दळवी ही मंडळी जास्त परिचयाची झाली. त्यांनी माझे नाव व संपर्क विशेष लक्षात ठेवले. या शिबिरानंतर उल्हास, प्रबोध दळवी वगैरे साथींनी मला अलिबागमध्ये अंनिसचे काम शाखा पातळीवर सुरू करावे यासाठी प्रोत्साहन दिले. रायगड जिल्ह्यामध्ये प्रथम पनवेल शाखा स्थापन झाली व लवकरच दुसरी शाखा म्हणजे, अलिबाग शाखा स्थापन झाली. अलिबाग शाखा स्थापनेसाठी मी तेथील प्रा. पुरुषोत्तम गोखले, प्रा. शाम जोगळेकर, मानसोपचार तज्ञ डॉ. अनिल डोंगरे व जे. एस. एम. कॉलेजचे काही प्राध्यापक व इतर साथी यांना सोबत घेऊन अलिबाग शाखेची स्थापना केली व मी पहिला शाखा सचिव झालो. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या सर्व विषयांबद्दल अलिबागमधील मंडळींना फारशी माहिती नव्हती. मी उल्हास ठाकूर व डॉ. दाभोलकर यांच्याशी संपर्क करून अलिबागमध्ये कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर घेण्याचे ठरवले. अलिबाग मध्ये पत्रकार भवन येथे तीन दिवसीय कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून डॉ. नरेंद्र दाभोलकर, प्रा. प. रा. आर्डे व डॉ. विद्याधर बोरकर हे तीन दिवस उपस्थित राहिले. सोबत उल्हास ठाकूर, प्रमोद दळवी, राजू देशपांडे, अलका जोशी, शुभांगी शहा, बिपिन रणदिवे, उज्वला परांजपे वगैरे मंडळीदेखील उपस्थित होती. शिबिराच्या समारोपानंतर पत्रकार भवन, अलिबाग येथे डॉ. दाभोलकर यांचे जाहीर व्याख्यान देखील झाले होते. ती खऱ्या अर्थाने अलिबागमधील महाराष्ट्र अंनिसच्या कामाची सुरुवात होती. या सर्व शिबिराच्या काळात माझी विशेष धावपळ बघून डॉ. दाभोलकर यांचे माझ्याकडे लक्ष आकर्षित झाले होते. संध्याकाळी शिबिर संपल्यावर सर्वजण अलिबागच्या समुद्रकिनारी फेरफटका मारत असू तेव्हा, प्रत्यक्ष माझ्यासोबत डॉ. दाभोलकर चालत होते. मी या विचारांनी कसा प्रभावित झालो? माझी परिस्थिती, वैचारिक जडणघडण याबद्दल ते कुतूहलाने मला प्रश्न विचारत होते. मी माझ्यापरीने त्यांना उत्तरे देत होतो. एवढा मोठा माणूस आपल्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याशी एवढी जवळीक साधतो, विचारपूस करतो या गोष्टीने मी खूपच भारावून गेलो

होतो. यानंतर डॉ. दाभोलकर यांच्याशी पंचवीस वर्षे सतत संपर्क येत राहिला, त्याचीही सुरुवात होती.

'शोध भुताचा, बोध मनाचा' या मोहिमेअंतर्गत, कोकण विभागाच्या मोहिमेचा उद्घाटन समारंभ अलिबाग येथील जे. एस. एम्. कॉलेज येथे झाला. या उद्घाटन कार्यक्रमाच्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून, तेव्हाचे रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश धर्माधिकारी यांना निमंत्रित केले होते. डॉ. दाभोलकर सकाळी लवकर आले होते. सदर कार्यक्रम सुरू होण्यास काही कालावधी बाकी होता तेव्हा, डॉ. दाभोलकर यांना माझ्या स्कूटरवर सोबत घेऊन आम्ही अविनाश धर्माधिकारी यांच्या सरकारी निवासात भेटण्यास गेलो. धर्माधिकारी हे मनमोकळेपणाने गप्पांमधून त्यांच्या आधीच्या कार्यकाळातील राजकीय नेत्यांचा अनुभव सांगत होते. थोड्याच वेळात ते आमच्या सोबत कार्यक्रमस्थळी येणार होते. परंतु त्यांना अचानक मंत्र्यांचा फोन आला व त्यांनी औपचारिक क्षमा मागून त्यांचे कार्यक्रमास येणे रद्द झाल्याचे सांगितले. याच अविनाश धर्माधिकारी यांनी डॉ. दाभोलकर यांच्या निर्घृण खूनानंतर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना मरणोत्तर भारतरत्न सन्मान मिळावा, असे मत टीव्ही चॅनलवरील चर्चेत अनेकवेळा स्पष्ट मांडले होते. पुढे अलिबाग तालुका व संपूर्ण कोकण विभागात 'शोध भुताचा बोध मनाचा' हे अभियान महा. अंनिसने अतिशय यशस्वीपणे राबवले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १४ एप्रिल २००९ रोजी डॉ. दाभोलकर यांना आरसीएफ च्या कुरूळ टाऊनशिप येथील, रात्रीच्या जाहीर व्याख्यानासाठी बोलाविले होते. तेथे त्यांचे व्याख्यान खूप प्रभावी झाले. त्याच ठिकाणी अंनिसची पुस्तके व वार्तापत्राचा स्टॉल लावला होता. पुस्तकांचा भरपूर खप झाला व वार्तापत्राला बरेच वर्गणीदारही मिळाले. मी तेंव्हा महा-अनिस रायगड जिल्हा अध्यक्ष होतो. दुसऱ्या दिवशी आम्ही अलिबाग शाखेचे कार्यकर्ते डॉ. दाभोलकरांना भेटलो. त्यामध्ये जिल्हा कार्याध्यक्ष रोहिदास गायकवाड व अन्य काहीजण होतो. आम्ही सर्वांनी, रायगड जिल्हा शाखेला वीस वर्षे पूर्ण झाली आहेत म्हणून द्विदशकपूर्ती कार्यक्रम आयोजित करावा आणि त्यानिमित्त स्मरणिका काढावी असा विचार मांडला व याबाबत परवानगी मागितली. परंतु, डॉ. दाभोलकर याबाबत आमच्याशी स्पष्ट आश्वासन न देताच गेले. नंतर लगेच आलेल्या राज्य कार्यकारिणी बैठकीमध्ये त्यांनी हा विषय मांडला व त्यावर संघटनात्मक चर्चा झाली. फक्त रायगड जिल्ह्यासाठी ही सवलत का? म्हणून सर्व जिल्ह्यांना एकदाच स्मरणिका काढता येईल, अशा अर्थाचा ठराव मंजूर करण्यात आला. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, 'डॉ. दाभोलकर हे पूर्ण लोकशाहीवादी व संघटनेच्या ध्येय धोरणानुसार काम करणारे होते'. आमच्या विनंतीला मान देऊन लगेच होकार न देता, राज्य कार्यकारिणीमध्ये तो विषय मांडला व आम्हाला स्मरणिका काढण्याची परवानगी दिली. त्यानंतर आम्ही रायगड जिल्ह्याच्या, जिल्हा बैठकीमध्ये याबाबत सखोल चर्चा केली व त्याचे नियोजन केले. या स्मरणिकेचा संपादक म्हणून रायगड जिल्हा साथीनी माझी निवड केली. आम्ही वेगवेगळ्या विषयावरील लेख जमा केले. डॉ. दाभोलकर यांचा लेख त्यामध्ये होता. काही लेख इंग्रजीतूनसुद्धा डॉक्टरांनी मिळवून दिले होते. स्मरणिका आकर्षक झाली होती. या स्मरणिकेचे प्रकाशन व व्दिदशकपूर्तीचा कार्यक्रम या नियोजनासाठी डॉ. दाभोलकरांशी आम्ही सतत संपर्कात असायचो. शेवटी या कार्यक्रमासाठी प्रथितयश मान्यवर मिळावेत असे प्रयत्न झाले. डॉ. दाभोलकर यांच्या प्रयत्नानेच, आताचे खासदार व लोकसत्ताचे संपादक मा. कुमार केतकर प्रमुख पाहुणे म्हणून मिळाले. डॉ. नरेंद्र दाभोलकर स्वतः व्दिदशकपूर्तीच्या कार्यक्रमात पेण

येथे सहभागी झाले. कुमार केतकर व डॉ. दाभोलकर यांची भाषणेदेखील खूप प्रभावी झाली. या स्मरणिकेमधून आम्ही रायगड जिल्ह्याकरिता चांगला निधी जमवला व मध्यवर्तीसाठीसुद्धा डॉ. दाभोलकर यांचे मार्फत चेकद्वारे काही रक्कम पाठवली.

फेब्रुवारी २०१३ मध्ये नेहमीप्रमाणे एकदा रात्री डॉ. दाभोलकर यांचा मला फोन आला. ते म्हणाले, नितीन आता रायगड जिल्हाध्यक्ष पद सोड. त्या पदासाठी हवे तर कृषीवलचे संपादक संजय आवटे यांच्याशी बोलेन. आता तुझ्या घरातील जबाबदाऱ्या कमी झाल्या आहेत, मुलीचे लग्न ठरले आहे. त्यामुळे तू आता व्यवसाय कमी कर किंवा बंद कर. आपण कोकणामध्ये व गोव्यामध्ये संघटनेचे काम जोमाने पुढे नेऊ. त्यासाठी तुला कार्यकारी समितीमध्ये काम करावे लागेल. मी म्हटले, डॉक्टर माझा शुगरचा प्रॉब्लेम आहे. त्यामुळे मला जास्त प्रवास वगैरे झेपणार नाही. मी रायगड जिल्ह्यात काम करतोय, ते ठीक आहे. परंतु ते म्हणाले, ते आपण बघू. पण आपण कोकणात संघटनेचं काम वाढवायला पाहिजे आणि तसेच झाले. जून २०१३ मध्ये आयोजित इस्लामपूर येथील राज्य कार्यकारिणीमध्ये, माझी कार्यकारी समिती सदस्य म्हणून निवड करण्यात आली. मी इस्लामपूरला गेलो होतो. तेथे मला वार्तापत्र शतकवीर म्हणून पुरस्कार डॉ. दाभोलकर, अविनाश पाटील, प्रा. आर्डे यांच्या उपस्थितीत डॉ. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते मिळाला होता. तो माझा राज्य कार्यकारी समितीमध्ये काम करण्याचा प्रारंभ होता.

सन २०१३ मध्ये महा. अंनिसचे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह अभियान सुरू होते. त्याच वर्षी माझी मुलगी नम्रता हिचा आंतरजातीय विवाह ठरला होता. मी डॉ. दाभोलकर यांना फोन केला व हे लग्न परिवर्तनवादी स्वरूपाचे कसे करावे? याबाबत चर्चा केली. लग्न अर्थातच नोंदणी पद्धतीने करावे व स्वागत समारंभामध्ये परिवर्तनाच्या विचारांचा जागर करावा, असा विचार होता. डॉ. दाभोलकर यांनी स्वागत समारंभाच्या मंडपातील स्टेजला परिवर्तनाची सप्तपदी असे नाव सुचवले. या एका सूचनेमुळे मी वेगळ्या पद्धतीने स्वागत समारंभ साजरा करण्यासाठी प्रभावित झालो. त्यासाठी अधून मधून डॉक्टरांशी फोनवर चर्चा होत असे. फेब्रुवारी २०१३ मध्ये अलिबाग येथे महा.अंनिसची राज्य कार्यकारिणी घेण्यात आली होती. वरसोली येथील एका रिसॉर्टमध्ये समुद्रकिनारी व्यवस्था झाली होती. दिवसा संघटनेचे कामकाज करायचे व रात्री इतर समाजातील समविचारी व्यक्तींशी चर्चा, असा कार्यक्रम ठरला होता. रात्रीच्या कार्यक्रमात डॉ. दाभोलकर यांनी अचानक व अनपेक्षितपणे माझ्या मुलीच्या नोंदणी पद्धतीने आंतरजातीय अशा होणाऱ्या विवाहाबद्दल सर्वांशी संवाद साधला. मला माझ्या पत्नीला व व्याह्यांनादेखील विचारमंचावर बोलवून, पुस्तके देऊन सन्मानित केले. प्रत्यक्ष लग्नाच्या रिसेप्शनच्या कार्यक्रमात डॉ. दाभोलकर, अविनाश पाटील, सुशीला मुंडे, परेश शहा, विनायक सावळे व काही साथी सातारा येथील कार्यकारी समितीची चिंतन बैठक आटोपून विवाहाच्या स्वागत समारंभामध्ये सहभागी झाले. मंडपात लावलेले बॅनर्स, पोस्टर्स, स्टेजवर लावलेले नेत्रदान, देहदान यांचे बॅनर, संत, सुधारक, विचारवंत यांचे फोटो असलेल्या या पूर्णतः वेगळ्या पद्धतीने केलेल्या सजावटीचे त्यांनी नीटपणे निरीक्षण केले. त्याच्या नोंदी ते प्रत्यक्ष घेत होते. यावेळी राजकीय मंडळी उपस्थित होती. त्यांमधील माजी आमदार मधुशेठ ठाकूर, पंडितशेठ पाटील अशा मान्यवर मंडळींची मी डॉ. दाभोळकरांशी ओळख करून दिली. हा समारंभ आटोपून ते सहकार्यांसह पुणे येथे गेले व दुसऱ्या दिवशी पुणे येथील एका कार्यकर्त्याच्या सन्मान सोहळ्यात

माझ्या मुलीच्या लग्नाबद्दल खूप भरभरून बोलले. तसेच महा. अंनिसच्या वार्तापत्रात याबद्दल एक लेखदेखील लिहिला. त्यामुळे तो लेख वाचून महाराष्ट्रातील अनेक व्यक्तींचे मला चौकशीसाठी फोन आले होते. विवाह स्वागत सोहळ्यात जमा झालेली रक्कम डॉ. दाभोलकर यांनी आधीच भेट दिलेल्या कलेढोम ता. फलटण जि. सातारा या दुष्काळ छावणीला त्यांनीच सुपूर्द केली. मला कलेढोम दुष्काळ छावणीची पावती देखील मिळाली. त्याचप्रमाणे माझे वडिलांचे मरणोत्तर नेत्रदान झाले, ती आठवण म्हणून, 'नरहरी केशव राऊत' या नावाने संघटनेत पुरस्कार सुरू करावा. जो दरवर्षी सत्यशोधकी पद्धतीने काम करेल अशा जोडप्यास द्यावा, अशी डॉक्टरांची विनंतीवजा सूचना मानून, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, महाराष्ट्र या ट्रस्टकडे रु. ६०,०००/- चा चेक दिला. ज्यातून २०१९ पर्यंत दरवर्षी असा पुरस्कार दिला गेला आहे.

चमत्कार सत्यशोधन यात्रा, जिवंत सर्प प्रबोधन यात्रा, संघटना बांधणी, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरे यासाठी रायगड जिल्हा व अलिबागमध्ये डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे नियमित येणे असे व कार्यकर्ते व समविचारी व्यक्ती, मान्यवर, पत्रकार यांच्या भेटी-गाठी घेत असत. जुलै २०१३ मध्ये डॉ. दाभोलकर महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजमध्ये कोकण विभागीय प्राध्यापकांच्या शिबिरात व्याख्यान देण्यासाठी आले होते. त्यावेळी त्यांचे व्याख्यान अतिशय प्रभावी झाले होते. या व्याख्यानाच्या सुरूवातीला मी व महेंद्र नाईक श्रोत्यांमध्ये बसलो होतो, तर डॉक्टरांनी आम्हा दोघांना त्यांच्यासोबत मंचावर बसवले. त्यांनी माझी सर्वांना ओळख करून दिली की, हे नितीन राऊत, हेसुद्धा आता कोकण विभागात माझ्याप्रमाणेच बिनभांडवली प्रबोधनाचा धंदा करणार आहेत. व्याख्यान झाल्यानंतर रायगड जिल्ह्यातील शाखांना भेट द्यावी, असा पूर्वनियोजित कार्यक्रम ठरलेला होता. तेव्हा व्याख्यानानंतर महा. अंनिस, रायगड जिल्हा अध्यक्ष डॉ. अनिल पाटील, महेंद्र नाईक व मी, डॉ. दाभोलकर यांच्यासोबत प्रथम म्हसळा शाखेला भेट दिली. नंतर तळा कॉलेजमध्ये गेलो. तेथे तळा शाखेचे प्रा. भगवान लोखंडे व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी पूर्वनियोजित असे डॉ. दाभोलकर यांचे व्याख्यान कॉलेजच्या विवेक वाहिनीच्या विद्यार्थ्यांसमोर ठेवले होते. तेथे डॉ. दाभोलकर यांनी खूप मार्मिक असे विचार मांडले. तो दिवस वटपौर्णिमेचा असल्यामुळे स्त्रियांच्या व्रत वैकल्यावर खुमासदार शैलीत त्यांनी विचार मांडले. त्यानंतर तळा येथून माणगाव शाखेला भेट देण्यासाठी गेलो. माणगाव शाखा भेट झाल्यानंतर ते माणगाववरून शॉर्टकटने पुणे येथे साधना कार्यालयात गेले. ही डॉक्टर दाभोलकर यांची रायगड जिल्ह्यातील शेवटची भेट ठरली

अलिबाग येथे राज्य कार्यकारिणी आयोजित केलेली असताना, पहिल्या दिवशी संध्याकाळी अलिबागच्या एका मोकळ्या अशा नाक्यावर आमदार जयंत पाटील, 'कृषीवल'चे संपादक संजय आवटे, अलिबाग नगराध्यक्ष नमिता नाईक व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत जादुटोणा कायद्याच्या मागणीसाठी काळ्या पत्रिकेचे जाहीर प्रकाशन केले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला विधान परिषदेचे आमदार माननीय जयंतराव पाटील यांच्याशी चर्चा करत असताना डॉक्टर मला म्हणाले, नितीन या आमदार साहेबांना फूल तरी दे. तेव्हा आमदार जयंत पाटील म्हणाले, डॉक्टर नको, मला फूल नको. त्यावर डॉ. दाभोलकर मिस्किलपणे म्हणाले, ' अहो आम्हाला कायदा बनवता बनवता एवढे वर्ष 'फूल' बनवलं तर, आता आमच्या कडून फूल तरी घ्या.' या वेळी एकच हशा पिकला होता.

८ ऑगस्ट २०१३ रोजी नाशिक येथे 'जात

पंचायतीला मूठमाती' या कार्यक्रमासाठी मी नाशिकला गेलो होतो. तेथे मूठमाती अभियानाला खूपच जोरकसपणे सुरुवात झाली. त्यात नागनाथ कोतापल्ले व डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची भाषणे विशेष प्रभावी झाली. यावेळी जात पंचायत पीडित कुटुंबांना बोलावले होते. अनेक पीडितांनी विचार-मंचावर येऊन आपल्या दु:खद कहाण्या सांगितल्या. त्यादिवशी संध्याकाळी आम्ही कार्यकारी समितीसाठी डॉ. दाभोलकरांसोबत शाळेच्या दोन रूममध्ये राहिलो होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी, नाशिक येथे कार्यकारी समितीची बैठक झाली. त्यामध्ये जादूटोणाविरोधी कायद्याच्या मागणीसाठी सातारा येथे यशवंतराव चव्हाण यांच्या स्मारकाजवळ एके दिवशी मौन आंदोलन करावं, असा विचार डॉक्टरांनी मांडला. या आंदोलनात कोणीही सोबत मोबाईल ठेवायचा नाही. म्हणजे एक दिवस मोबाईल शिवाय, अशा पद्धतीचे आंदोलन होणार होते. त्यावेळी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण हे असल्यामुळे त्यांना कोणत्याही परिस्थितीत न दुखावता हे आंदोलन आपण पार पाडावे. त्यामुळे येत्या अधिवेशनामध्ये जादूटोणाविरोधी कायदा पास व्हावा, अशी चर्चा कार्यकारी समिती बैठकीत झाली. तसेच, विविध उपक्रमांबाबत देखील चर्चा झाली. त्या दिवसांत वर्तमानपत्रांमध्ये जातपंचायतीच्यासंबंधी बातम्या येत होत्या व डॉ. दाभोलकर यांचा संपर्क क्रमांक त्या बातमीत होता. त्यामुळे रायगड जिल्ह्यातून मुरूड, श्रीवर्धन तालुक्यातून अनेक फोन डॉ. दाभोलकर यांना येत होते. तेव्हा डॉक्टर म्हणत तुमच्या रायगड मधले आमचे साथी इथेच आहेत, मी त्यांनाच फोन देतो. जातपंचायतीचे पीडित माझ्याशी बोलत असत व मी त्या नोंदी टिपून घेत असे. आपल्याला माहितीच आहे की, रायगड जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त जात पंचायतीच्या केसेस नोंदवल्या गेल्या आहेत. त्याच दिवशी डॉ. दाभोलकर नाशिकहून पुण्याला गेले. नंदकिशोर तळाशीलकर व मी पनवेलच्या दिशेने आपआपल्या घरी आलो. ही डॉ. दाभोळकरांची माझ्या आयुष्यातील शेवटची भेट ठरली. कारण त्यानंतर दहा दिवसांच्या फरकाने डॉ. दाभोलकर यांचा २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी पुणे येथे सनातन्यांनी निर्घृण खून केला. त्यादिवशी ही दु:खद बातमी समजताच मी माझ्या पत्नीसह डॉक्टरांच्या अंत्यदर्शनासाठी साधना प्रकाशन कार्यालयात गेलो होतो व त्यांचे अंत्यदर्शन घेऊन दु:खद अंत:करणाने घरी आलो.

२०१२ मध्ये माझे वडील हे जग सोडून गेले व एका वर्षाच्या आत माझे वैचारिक पिता असलेले डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना समाजातील अपप्रवृत्तींनी आमच्यापासून कायमचे दूर केले. आता असा एक दिवससुद्धा जात नाही की, डॉ. दाभोलकर यांची आठवण मन व्याकूळ करत नाही. परंतु त्यांनी दिलेला विवेकाचा मार्ग आयुष्याच्या शेवटपर्यंत न थकता न दमता चालू ठेवण्याचा निर्धार, हीच शहीद पद्मश्री डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना खरी आदरांजली ठरेल!!

■ ■ ■



# शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना आठवताना



नंदकिशोर तळाशीकर
९८६९१ ७००६२

सरकार जादूटोणा विरोधी कायदा पारीत करण्यासाठी विलंब करीत असल्याने डॉक्टर नियमित मुंबईला मंत्रालयात येत, तेंव्हा मी त्यांच्यासोबत असे. मुंबईतील आंदोलने, मीडिया सोबत चर्चा, मान्यवरांच्या गाठीभेटी, जाहिराती, देणग्या इत्यादी कारणांमुळे मला ते सोबतच घेऊन जात असत. माझ्याकडे असलेल्या गाडीमुळे कार्यकर्त्यांना आणि दाभोलकर सरांना घेऊन अनेक ठिकाणी फिरणे सोयीस्कर होत असे. उन्हामुळे माझ्या लाल रंगाच्या गाडीच्या ड्रायव्हर साईडचा रंग भगवा झाला होता. गाडीत आमच्याबरोबर जेष्ठ साथी, कॉम्रेड असायचे. डॉक्टर रंगावरून कोटी करत ' डावे आणि उजवे सोबत घेवूनच मी चळवळीचा विचार पुढे नेत असतो', असं म्हणायचे. साधारणपणे १९९५ च्या आसपास इलेक्ट्रॉनिक मीडीया नुकताच सुरू झाला होता. त्याकाळी ईटीव्ही मराठीचे ऑफिस महालक्ष्मी स्टेशनजवळ होते. एके दिवशी आम्ही ईटीव्ही च्या संपादकाना भेटायला गेलो होतो. संपादक स्वतःच्या खुर्चीवरुन उठले आणि त्यांनी आपली खुर्ची डॉक्टरांना दिली आणि बसण्याची विनंती केली. डॉक्टर हसले आणि 'ही खुर्ची तुझी आहे, तुझा तो मान आहे', असं म्हणत नम्रपणे समोरील खुर्चीवर जाऊन बसले.

कायद्याच्या अनुषंगाने जेंव्हा डॉक्टर मंत्रालयात जात तेंव्हा बहुतेक वेळा मी त्यांच्यासोबतच असायचो. मंत्रालयाच्या कार्यपद्धतीचा पुरेपूर अनुभव त्यांना होता. जादूटोणाविरोधी कायदा सामाजिक न्याय विभागाकडे असल्याने त्या विभागात गेल्यावर तिथले डेस्क अधिकारी कायद्याची फाईल, तिचा प्रवास याबाबत बोलायचे. ती फाईल कुठे फिरली, त्यावरील शेरे याची माहिती डॉक्टर आधीच करुन घेत असत. संबंधित अधिकाऱ्याला, 'असा शेरा आहे, त्याची अशा रीतीने पुर्तता करावी लागेल', असे मार्गदर्शन देखील ते करायचे. मंत्रालयात प्रत्येक मंत्र्यांची वेगवेगळी दालने असतात. सर्वसामान्यांसाठी सुरुवातीच एक दालन, त्यानंतर आतमध्ये बैठकीसाठी एक दालन आणि त्यानंतर मंत्र्यांचे अँटीचेंबर. खास माणसांसाठी! मंत्री खास दालनात जरी बसले असेल, तरी डॉक्टर दरवाजा उघडून आत शिरत असत. मंत्रीही तेवढाच मान त्यांना देत. डॉक्टर संबंधित विषयांची कागदपत्रे, सूचना आणि अंमलबजावणी याबाबत मंत्र्यांशी चर्चा करीत अन मग निघत. सुरुवातीला मंत्रालयातील कार्यपध्दती माझ्यासाठी नवीन होती. मला प्रश्न पडायचा की, डॉ. दाभोलकर डायरेक्ट मंत्र्यांना कसे भेटतात? गर्दी असूनही त्यांचं म्हणणं कसे काय ऐकतात? एकदा मी त्यांनाच प्रश्न केला, 'एवढी गर्दी असतांनासुद्धा आपण आत जाता, मंत्री आपले ऐकतात, हे कसे काय शक्य होते?' तेंव्हा ते हसून म्हणाले, 'अरे ही बाहेर गर्दी आहे ना, त्यातील प्रत्येकजण आपली काही ना काही वैयक्तिक कामे घेऊन आलेले असतात. आपण सामाजिक काम घेऊन आलो आहोत, हे मंत्री महोदय जाणतात आणि त्यात आपल्या चळवळीची मान्यता, ताकद त्यांना माहिती आहे. त्यामुळे ते सहज भेटतात, ऐकतात आणि आपल्याला प्राधान्य देतात.' आम्ही ज्यावेळी मंत्री, अधिकारी, मीडियाला भेटत असू त्यावेळी ते सोबत असलेल्या कार्यकर्त्यांची ओळख करुन देत असत आणि हे कार्यकर्ते माझ्या

संघटनेचे काम बघतात अस आवर्जून सांगत.

जादुटोणाविरोधी कायदा संमत व्हावा म्हणून सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी प्रत्येक उन्हाळी आणि पावसाळी अधिवेशनात राज्यव्यापी आंदोलने होत असत. प्रत्येक वेळचे आंदोलन नाविन्यपूर्ण व्हावे म्हणून ते सतत प्रयत्नशील असत. आंदोलनाच्या तयारीसाठी डॉ. दाभोलकर एक-दोन दिवस आधी येत आणि संबंधित मंत्री, मुख्यमंत्री, विरोधी पक्षनेते यांच्या गाठीभेटी घेत. पत्रकार परिषद आणि पत्रकारांना माहिती दिली जात असे. काही हिंदुत्ववादी, सनातनी पत्रकार, संदर्भहीन, तिरकस, खोचक प्रश्न विचारीत. पण ते त्यांना शांतपणे संयमाने उत्तरं देत. डॉक्टरांसोबत राहून आम्ही इव्हेंट मॅनेजमेंट, टाईम मॅनेजमेंट शिकलो. मुंबईत आंदोलन करायचे असेल, तर पोलीसांना अर्ज करायचा, परवानगी मिळवायची, आंदोलनाला मैदानातील सोयीस्कर जागा निवडणे, मान्यवरांसाठी खुर्च्या, ध्वनी व्यवस्था, सूत्रसंचालन, चळवळीची गाणी म्हणणारे, पत्रकारांना दिली जाणारी निमंत्रणे, कार्यकर्त्यांना चहा-नाष्टा, दुपारचे जेवण, शिष्टमंडळ भेट, प्रेस नोट, इत्यादी गोष्टींचे मायक्रो प्लानिंग आम्ही मुंबईचे कार्यकर्ते करायचो. आपले आंदोलन साधारणपणे १० ते ५ वाजेपर्यंत असायचे. पण डॉक्टर व आम्ही कार्यकर्ते आंदोलन स्थळी सकाळी ७.३० वाजल्यापासून हजर असायचो. मी एकदा सहजच बोललो, डॉक्टर, आम्ही लवकर पुढे जातो, तुम्ही मागून सावकाश या. यावर ते म्हणाले, 'माझे कार्यकर्ते संघटनेसाठी रात्रभर प्रवास करुन येतात. त्याना मी दिसलो की बरे वाटते म्हणून हे मला करायलाच हवे'. बाहेर गावाहून आलेल्या कार्यकर्त्यांबरोबर आम्ही मैदानातच चहा, नाष्टा एकत्र घेत होतो. डॉक्टर कधीही ऑर्डर सोडत नसत. प्रसंगी खुर्च्या मांडणे, बॅनर बांधण्यास मदत करणे इत्यादी सर्व कामात ते हातभार लावीत असत. जेवण, नाष्टा सर्वांना मिळाल्यानंतर लाईन मध्ये राहून शेवटी आमच्या सोबत घेत. जादूटोणा विरोधी कायदा संमत व्हावा, यासाठी केलेली मेहनत आम्ही दिवसरात्र अनुभवली आहे. प्रसंगी विरोध करणाऱ्यांची भेट घेतली आहे. त्यांच्या शंकेचे निरसन केलेले आहे.

एके दिवशी पार्ले कट्ट्यावर डॉक्टरांची मुलाखत ठरली होती. मुलाखत ६ ते ८ पर्यंत होती म्हणून ते पुणे येथून सकाळीच निघाले होते. मंत्रालयात कायद्याचा पाठपुरावा करुन आम्ही मीडिया भेटी करीत पंधरा मिनिटे आधी पार्ले येथे पोहोचलो. डॉक्टरांनी सकाळी तत्कालीन मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण यांची भेट होऊ शकते का, त्याची चौकशी केली. पण ते शक्य झाले नव्हते म्हणून मुख्यमंत्र्यांना चिठ्ठी लिहून त्यांच्या पी.ए.ना दिली होती. त्यांनी फोनवरून रात्री ९ वाजताची भेट वर्षा बंगल्यावर निश्चित केली. मुख्यमंत्री यांच्याकडून ९.३० वाजता भेटीचा निरोप आला. अर्थसंकल्पीय मिटिंग अर्ध्या तासात आटोपतो आणि भेटतो. पण ती मिटिंग लांबत गेली आणि रात्री ११ वाजता आटोपली. तोपर्यंत सर्व हॉटेल्स बंद झाली होती. चहा शिवाय पोटात काही नव्हते. वाटेत एक चायनीज गाडीवाल्याने दिलेला फ्राय राईस उभ्या-उभ्या खाल्ला आणि मध्यरात्री १२.३० वाजता घरी पोहचलो. खाण्याबाबत डॉक्टर कधीही परीपूर्ण असले तरी बाऊ करत नव्हते. शेवटी शेवटी त्यांनी मांसाहार सोडला होता, हे मला माहिती नव्हते. आम्ही सर्व कामे आटोपून घरी आलो. जेवण अर्थात मांसाहारी होते. डॉक्टर हसत मला म्हणाले, ' अरे नंदू मी वयोमानानुसार मांसाहार सोडला आहे', असं म्हणत मासे बाजुला काढले आणि करी, लोणचं सोबत जेवण घेतलं. डॉक्टर नेहमी घरी आले की घरच्यांची आवर्जून, आपुलकीने चौकशी करायचे. अंनिसच्या कामाला मला सोडले म्हणून माझी पत्नी नीलमचे कौतुक करत, छोट्या निधी सोबत लहान होऊन खेळायचे. डॉक्टरांच्या

व्यक्तिमत्वामुळे कट्टर शिवसैनिक असलेल्या माझ्या आतेभाऊ सारंगचे मतपरिवर्तन झाले. एवढंच नाही तर आज तो अंधश्रद्धा निर्मूलनाचे प्रयोग करत समाजप्रबोधन करत आहे.

आमच्या घरी स्वयंपाक करायला येणाऱ्या आजी मालवणी पध्दतीने डॉक्टरांना आंबोळी आणि घवणे देत असत. ते नेहमी आजीची आठवण काढत आणि तिच्या हाताच्या चवीचे कौतुक करत, 'अन्नदाता सुखी भव' अस जाताना आवर्जून उच्चारत. डॉक्टरांच्या सहवासात आणि महाराष्ट्र अंनिसमध्ये येवून हळूहळू मी माझ्यात आणि माझ्या कुटुंबात परिवर्तन घडवत आलो. डॉ. दाभोलकर गेल्यानंतर घरच्यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करायचे ठरवले. एकच फायबरची रंगीत मूर्ती पूजणे, टबात विसर्जन आणि पुन्हा तीच मूर्ती पुढच्या वर्षी, हे आजअखेर चालू आहे. आज मी विवेकवादी, पर्यावरणवादी, निर्व्यसनी आहे याचे सर्व श्रेय डॉक्टर आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला देतो. हा विवेकाचा वारसा मी घेतला आहे, स्वीकारला आहे आणि शेवटपर्यंत विवेकाचा आवाज बुलंद करत राहणार आहे.

■ ■ ■





# शब्दांच्या उपयोजनाचे समग्र भान देणारे डॉ. दाभोलकर



एकनाथ पाटील
९४२१२ ८५०८२

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कामासाठी भरीव योगदान दिलेल्या दोन जुन्या-जाणत्या, क्रियाशील कार्यकर्त्यांना अंनिसच्यावतीने दरवर्षी जाहीर समारंभात जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्याची कल्पना डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या मनात आली. सन २०११ चा तो सुमार असावा. मअंनिसच्या राज्य कार्यकारिणीत निर्णय झाला आणि पुरस्कारासाठीच्या मानपत्र लेखनासह ती तयार करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी संजय बनसोडे या मित्राने कायमस्वरूपी इस्लामपूर शाखेकडे घेतली. पहिल्या वर्षी माझ्या माहितीप्रमाणे कॉ. टी. आर. शिंदे आणि के. डी. खुर्द तर दुसऱ्या वर्षी प्रा. प. रा. आर्डे आणि कुमार मंडपे या जुन्या पिढीतल्या कार्यकर्त्यांना मानपत्र प्रदान करण्यात आली. त्या वर्षापासून पुढे दरवर्षी अगदी नियमितपणे पूर्वकल्पना न देता संजयराव अचानक एक दिवस घरी यायचे. तत्पूर्वी माझ्याशी साधी एका शब्दाची चर्चा झालेली नसायची आणि अगदी किरकोळ माहिती लिहिलेले दोन साधे कागद माझ्या हातावर सोपवून म्हणायचे, 'सर, आपल्याला ही दोन मानपत्रं लिहायची आहेत.' संजयरावांची ही नेहमीची स्टाईल. दोन्ही कागदांवर खच्चून आठ-दहा ओळींचा मजकूर लिहिलेला असायचा आणि म्हणे, 'आपल्याला मानपत्रं लिहायची आहेत.' एकदा कागद माझ्याकडे सोपवले की मग या 'आपल्यालाशी' त्यांचा काही संबंध नसायचा. खरे तर ज्यांना मानपत्र प्रदान करावयाचे असे, ते कार्यकर्ते त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात महाराष्ट्राच्या विविध भागात क्रियाशील असायचे. तरीही त्यांच्या कामाचे, व्यक्तिमत्त्वाचे सगळेच पैलू मला माहीत असण्याचे काही कारण नव्हते. जे कार्यकर्ते आपण जवळून अनुभवलेले बघितलेले नाहीत, यापैकी अनेकांना कधी आपण भेटलेलो नाही, ज्यांच्याशी फारसं कधी बोललेलो नाही अशा माणसांचं मानपत्र लिहायचं म्हणजे माझी पंचायत व्हायची. काहीवेळा लिहितांना एकतर कमालीच्या उदात्तीकरणाचा किंवा मग योग्य न्याय न मिळाल्याचा धोका. त्यामुळे मी आढेवेढे घ्यायचो. हे काम टाळायचा प्रयत्न करायचो. यामागे त्या त्या भागातल्या परिचितांनी ही मानपत्रं लिहावीत अशी माझी भूमिका असायची. पण संजयरावांची खासियत अशी की, ते असे काही खनपटीला बसायचे आणि माझ्यासमोर लिहिण्याशिवाय मग पर्यायच राहायचा नाही.

मला वाटतं, सन २०१३ चा तो जून महिना असावा. बहुदा प्रा. विजयकुमार जोखे आणि अलका चाफेकर या दोन बुजूर्ग कार्यकर्त्यांना जाहीर समारंभात मानपत्रं प्रदान केली जाणार होती. इस्लामपूरातच कार्यक्रमाची तयारी सुरु होती आणि संजयरावनी अशीच एक दिवस घाई गडबडीत पुरस्कार विजेत्यांची अगदी तुटपुंजी माहिती माझ्याकडे सोपवून हात वर केले. पर्याय नव्हता. दोन दिवसात मानपत्रं लिहून मी ती त्यांच्याकडे सोपवली. त्यांनी ती अगदी आकर्षकरित्या सेटिंग करुन घेतली. याच दरम्यान अंनिसच्या राज्य कार्यकारिणीची बैठकही इस्लामपूरात आमच्या कॉलेजमध्ये होती. या निमित्ताने इस्लामपूर शाखेच्यावतीने नगरपालिकेच्या राजारामबापू

नाट्यगृहात डॉ. नरेंद्र दाभोलकर, अच्युत गोडबोले आणि ज्येष्ठ सिनेदिग्दर्शक जब्बार पटेल यांच्या सलग तीन दिवस तीन व्याख्यानांचे आयोजन केले होते. व्याख्यानाच्या शेवटच्या दिवशी जीवनगौरव पुरस्काराची मानपत्रं प्रदान केली जाणार होती. व्याख्यानाचा बहुदा तो पहिलाच दिवस असावा. आम्ही मानपत्रं तयार करुन घेण्याच्या गडबडीत होतो. डॉ. दाभोलकरही व्याख्यानासाठी सभागृहात उपस्थित होते. व्याख्यान सुरु व्हायला अजून बराच अवकाश होता. दाभोलकर सभागृहाच्या पहिल्या रांगेत बसलेले. दरम्यान मानपत्रांचा कच्चा मजकूर त्यांच्या नजरेखालून जावा म्हणून बनसोडेंनी मानपत्रांचे कागद दाभोलकरांकडे दिले. त्यांनी ते वाचून बघितले आणि घडी करुन शर्टच्या वरच्या खिशात ठेवून दिले. थोड्या वेळाने मागे वळून सभागृहात ते कुणाला तरी शोधत असल्यासारखे वाटले. चार रांगा सोडून मी मागेच बसलो होतो. मी दिसताच ते उठून मागे आले. मला हात केला. उठवून प्रेमाने, नेहमीच्या स्टाईलने खांद्यावर हात टाकून मला ते सभागृहाबाहेर घेऊन गेले. मला कळेना, माझ्याकडे असे काय काम असावे? नाट्यगृहाच्या बाहेरच्या पोर्चमध्ये एका बाजूला जाऊन थांबले आणि खिशातले मानपत्रं टाईप कलेले कागद बाहेर काढून मला म्हणाले, 'एकनाथ पाटील, तुम्ही मानपत्रं खूप चांगली लिहिली आहेत. मला ती आवडलीही आहेत. फक्त त्यातलं शेवटचं अर्ध वाक्य वगळण्याची अनुमती द्या.' मी म्हणालो, 'जरुर वगळा. त्यात विचारायचं काय?' तर ते म्हणाले, ' नाही. तो तुमचा अधिकार आहे' मी तसा बुचकळ्यात पडलो होतो. असं कोणतं अर्ध वाक्य होतं की, जे दाभोलकर मला मानपत्रातून वगळायला सांगत होते. म्हणून मानपत्राचे कागद हातात घेऊन ' आपण या मानपत्राचा स्वीकार करावा, ही विनंती' हे मानपत्रातले शेवटचे वाक्य मी अधिक काळजीपूर्वक वाचले आणि माझ्या एकदम लक्षात आले, मानपत्राखाली मअंनिसचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ नेते प्रा. एन.डी.पाटील सरांची स्वाक्षरी होती. ज्यांना मानपत्र प्रदान केले जाणार होते ते कार्यकर्ते बुजुर्ग असले, तरी कामाच्या आणि अनुभवाच्या स्तरावर 'एनडी' सरांच्या तुलनेत खूपच ज्युनिअर होते आणि त्यामुळे मानपत्र स्वीकारण्याविषयी 'एनडी' सरांसारखा चळवळीतला मोठा माणूस त्यांना विनंती करीत आहे, असा संदेश मानपत्रातून जाता कामा नये, असा डॉक्टरांचा आग्रह होता आणि तो योग्य होता. शब्दांच्या उपयोजनाबाबत ते खूपच सजग असल्याचे जाणवले. मी नुसती होकारार्थी मान हलवली. डॉक्टरांनी कागदावर 'ही विनंती' या अर्ध्याच वाक्यावर पेनाने रेष मारली आणि घडी करुन कागद पुन्हा खिशात ठेऊन दिले. खरे तर एवढी ही छोटीशी दुरुस्ती माझ्या अनुमतीशिवाय परस्पर दाभोलकर स्वतःही करु शकले असते. मात्र त्यासाठी आधी त्यांनी माझ्याशी चर्चा केली आणि मगच ती दुरुस्ती केली. मात्र या अगदी छोट्याशा प्रसंगामुळेही सार्वजनिक जीवनात माणसाने शब्दांच्या वापराबाबत किती दक्ष आणि चोखंदळ असायला हवे, प्रथम वाचनात पटकन लक्षात न येणारे शब्दांमागे लपलेले अर्थ कसे नीट ध्यानात घ्यायला हवेत, हा धडा मला दाभोलकरांकडून मिळाला. एकीकडे चांगली मानपत्रं लिहिल्याबद्दल त्यांनी तोंड भरुन माझे कौतुक केले आणि दुसरीकडे शब्दांच्या वापराबाबतचे समग्र भानही दिले.

■ ■ ■



# डॉ. दाभोलकरांनी समितीमध्ये एक-एक अनमोल हिरा निवडला



मनीषा महाजन
९४२२३०८७८०

डॉ. दाभोलकर यांच्यासोबत काम करताना एक विलक्षण आनंद व्हायचा. एवढे हुशार व ख्यातनाम व्यक्ती असूनही त्यांचे साधे राहणे बघून आश्चर्य वाटायचे. तसं डॉक्टरांशी केव्हाही गप्पा मारल्या तरी, त्यांच्या बोलण्यातून नवीन आणि दिशादर्शक अशी वैचारिक मेजवानी मिळत असे.

तसे पाहिले, तर डॉ. दाभोलकर यांचे पहिले व्याख्यान मी माझ्या वयाच्या अठराव्या वर्षी म्हणजेच १९८८ मध्ये लॉ कॉलेजच्या पहिल्या वर्षाला असताना ऐकले होते. तेव्हा त्यांचे विचार खूपच प्रेरणादायी वाटले आणि आपणसुद्धा अशाच विचारांवर आपले जीवन व्यतीत करावे असे वाटले. मुळातच लहानपणापासून मी चिकित्सक वृत्तीची असल्यामुळे, कुठलीही गोष्ट 'आईने सांगितले म्हणून केले', असे कधीच होत नसे. मी नेहमी हे का करायचे? याचे कारण काय? असे प्रतिप्रश्न विचारत होते. त्यातच डॉ. दाभोलकर यांचे व्याख्यान ऐकल्यानंतर खूप सारे प्रश्न आणि त्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्याची जिज्ञासा निर्माण झाली. डॉक्टरांचे व्याख्यान ऐकल्यानंतर वैज्ञानिक दृष्टिकोनाची पायाभरणी झाली, तसेच, सण, वार, समारंभ, उपवास, पूजा, जात अशा अनेक गोष्टींकडे बघण्याचा दृष्टिकोनही पूर्णपणे बदलला. त्याचप्रमाणे, सामाजिक प्रश्नांना भिडले पाहिजे आणि समाजासाठी काहीतरी आपण करू शकू याबद्दल एक निश्चित असे ध्येय आणि जिद्द निर्माण झाली. मी कॉलेज जीवनातच वेगवेगळ्या सामाजिक संघटनांशी व युवा संघटनांशी जोडले गेले. पुण्यामध्ये वेगवेगळ्या व्याख्यानांना, कार्यक्रमांना, मोर्चांना जाऊन चांगले वैचारिक खाद्य मिळत गेले.

कॉलेजचे शिक्षण चालू असताना मी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पाच-सहा बैठकींना हजेरी लावली होती. पण अभ्यासाचा व्याप वाढल्यामुळे समितीच्या कामांमध्ये जास्त वेळ देऊ शकले नाही. कॉलेजचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, वकिली व्यवसायाची सुरुवात केल्यावर, काहीच महिन्यांमध्ये मला माझ्या युवा (DYFI आणि SFI) संघटनेचे कार्यकर्ते ॲड. रमेश महाजन यांनी लग्नासाठी विचारले. घरी आई वडिलांना विचारल्यावर, आईकडून रमेश यांची जात वेगळी असल्यामुळे थोडा विरोध झाला. घरच्यांचा विरोध डावलून १६ मार्च १९९३ रोजी पुण्यामध्ये वकील मित्र-मैत्रिणींच्या मदतीने, बबन कांबळे यांनी सत्यशोधक पद्धतीने आमचे लग्न लावून दिले. आम्ही दोघेही सुशिक्षित असल्याने घरच्यांचा राग लगेच निवळला.

वकिली व्यवसायातल्या तसेच कुटुंबातील जवाबदाऱ्या पार पाडत असताना, पुन्हा संजय बारी यांच्यामुळे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, शाखा पिंपरी-चिंचवडच्या संपर्कात आले. मला एका गोष्टीचा खूप आनंद झाला होता की, मी पुन्हा डॉ. दाभोलकर यांचे व्याख्यान ऐकू शकेन, कारण ते माझ्यासाठी एक रोल मॉडेल होते. जसे-जसे मी समितीचे काम करू लागले तस-तसे मी डॉक्टरांच्या संपर्कात जास्तीत जास्त येऊ लागले. आम्ही पिंपरी चिंचवड शाखेमार्फत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जवळ जवळ वर्षभरातील सगळे उपक्रम घेत असू. जादुटोणा विरोधी कायदा महाराष्ट्र सरकारने पारित करावा यासाठी धरणे, आंदोलने केली त्यावेळी पिंपरी चिंचवड मधील अनेक सामाजिक संघटनांनी

आपल्याला पाठिंबा दिला होता. यातील बहुतांश कार्यक्रमांना डॉक्टर स्वतः हजर असायचे.

आपणच निवडून दिलेले सरकार समाजासाठी अत्यावश्यक असलेला जादुटोणा विरोधी कायदा गेली अनेक वर्ष पाठपुरावा करूनदेखील पारित करीत नाही, म्हणून थोबाडीत मारून घेण्याचे आंदोलन तसेच स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून सरकारला निवेदन देण्याचे उपक्रम डॉक्टरांच्या उपस्थितीत पुण्यामध्ये घेण्यात आले. जादूटोणाविरोधी कायदा महाराष्ट्र सरकारने पारित करावा म्हणून मुंबई येथे आझाद मैदानावर अनेक वेळा आंदोलने, निदर्शने, जेल भरो आंदोलन अशा विविध उपक्रमांच्या माध्यमांतून डॉक्टरांचे व्यक्तिमत्व जवळून पाहता आले.

आपण समितीतर्फे 'जोडीदाराची विवेकी निवड' हा उपक्रम नुकतेच घेऊ लागलो होतो. डॉक्टरांना माहीत होते की, माझा आंतरजातीय प्रेमविवाह आहे. एके दिवशी अचानक सकाळी ८.१५ च्या दरम्यान डॉक्टरांचा फोन आला. म्हणाले, 'मी इथे खंडोबा चौकात आलोय. तुझे घर नेमके कुठे आहे?' मी अवाक झाले की, अचानक डॉक्टर घरी येत आहेत कुठलीही पूर्वसूचना न देता, कारण आदल्या दिवशी डॉक्टर बोलले होते सकाळी माझा ड्रायव्हर येईल; त्याला डोमचे साहित्य दे. पण ते स्वतः येणार ही कल्पना नव्हती. डॉक्टर अचानक घरी आल्यामुळे खूप आनंद झाला. आम्ही चहा नाश्ता केला. त्यांनी आमचे घर बघितले. आम्हा दोघांबद्दल त्यांना खूप कौतुक वाटले. त्यावेळी डॉक्टर मला असे बोलले होते की, अनेक आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना खूप विरोध होतो. पण तुझ्या विवाहाला विशेष विरोध झाला नाही. तसेच तुम्ही दोघेही खूप छान पद्धतीने दोन्ही कुटुंबांना संभाळून घेऊन संसार करत आहात. तर, ही गोष्ट समाजामध्ये पोहोचली पाहिजे की, 'प्रेम विवाह व आंतरजातीय लग्न केलेली जोडपीसुद्धा खूप छान पद्धतीने संसार करु शकतात आणि मी हे स्टेजवर येऊन लोकांना सांगितले पाहिजे.' मुळात मी कधीही भाषण केलेले नसल्यामुळे सुरुवातीला मला खूप भीती वाटत असे, पण डॉक्टरांच्या सपोर्टने मी हळूहळू स्टेजवर बोलायला शिकले. लातूरला जोडीदाराची विवेकी निवड या परिषदेमध्ये मी माझ्या लग्नाची गोष्ट स्टेजवर सांगितली.

जात पंचायतीच्या मनमानीला कारभाराला मूठमाती अभियानातून सामाजिक बहिष्कारविरोधी कायद्याची गरज भासत होती. तेव्हा या अभियानात सतत पीडित व्यक्तींशी कार्यकर्त्यांचा संपर्क येत होता आणि कायद्यामध्ये काय हवे याबद्दल एक स्पष्टता येऊ लागली. त्यातून अविनाश भाई, कृष्णा चांदगुडे, रंजना ताई व इतर अनेक कार्यकर्त्यांच्या अनुभवातून धुळ्याचे ज्येष्ठ विधीज्ञ एन. डी. सूर्यवंशी सर यांच्या मार्गदर्शनाने कायद्याचा मसुदा तयार करताना एक वेगळाच अनुभव आला. आम्ही कायदे वाचतो पण कायदा कसा तयार होतो ह्या प्रक्रियेत आम्ही सगळे समितीचे वकील आणि कार्यकर्ते यांच्या प्रयत्नातून, सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा पारित करून घेऊ शकलो. ही समितीसाठी आणि पूर्ण महाराष्ट्रासाठी एक मोठी उपलब्धी होती. सूर्यवंशी सर आता आपल्यात नाहीत. पण जेव्हा मी त्यांना कायद्याचा कच्चा मसुदा लगेच मीटिंगच्या दुसऱ्या दिवशी दिला तेव्हा त्यांना खूप आनंद झाला आणि त्यांनी त्यावेळी काढलेले उद्गार मला अजूनही आठवते, " डॉ. दाभोलकरांनी समितीमध्ये एक एक अनमोल हिरा ( सर्व उपस्थित कार्यकर्त्यांना उद्देशून) निवडला आहे". आम्हा सर्व तळमळीने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना ही कामाची पावती कुठल्याही पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ आहे. डॉ. दाभोलकर आणि समितीची मी कायम ऋणी असेन.

■ ■ ■



# अंधश्रद्धामुक्त समाजाचे प्रीॲम्बल



यशवंत मनोहर

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीतील सर्वच सैनिक भावंडांनो, तुम्हा सर्वांनाच माझा जयभारत! जयसंविधान! महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या आपल्या मुखपत्राच्या पहिल्या अंकाचे आज दिनांक ३१ जुलै २०२१ रोजी प्रकाशन होत आहे. ही गोष्ट महाराष्ट्राच्या एकूणच परिवर्तनपरंपरेला गौरव वाटावा अशीच आहे. या मुखपत्राच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन मी करावे हा निर्णय ज्या क्षणी आपण घेतला त्या क्षणाला मी अंतःकरणपूर्वक धन्यवाद देतो. हा निर्णय घेऊन आपण सर्व भावंडांनी मला आपल्या बौद्धिक कुटुंबातील एक विश्वासार्ह भाऊ मानले याबद्दल आपणा सर्वांसंबंधीच मी कृतज्ञता व्यक्त करतो. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या या ऐतिहासिक प्रथमांकाचे आपणा सर्वांच्या निष्ठावंत साक्षीने लोकार्पण झाले हे मी सहर्ष घोषित करतो.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या प्रारंभसोहळ्याचे अध्यक्ष बंधू अविनाश पाटील, पत्रिकेचे संपादक नितीन शिंदे, पत्रिकेचे कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड, सहसंपादक एकनाथ पाटील आणि इतरही सर्वच अंधश्रद्धांविरुद्ध झगडणाऱ्या योद्ध्यांच्या साक्षीने पत्रिकेचे प्रकाशन झाले त्याबद्दल आनंद व्यक्त करतो. अंधश्रद्धांचे जाळे सर्व जगभरच पसरले आहे. या अंधश्रद्धांच्या बाधितांचेही क्षेत्र त्यामुळे तिथपर्यंत पसरलेले आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाचे अभियान, त्याचे कार्यक्षेत्र आणि जबाबदारी या अर्थाने अमर्यादच आहे. अंधश्रद्धांचे चेहरे आणि रूपे असंख्यच आहेत. या सर्वच आणि सर्वच क्षेत्रांमधील अंधश्रद्धा नष्ट करणे ही काही सोपी बाब नाही. अंधश्रद्धा निर्मूलनमधील निर्मूलन ही संज्ञाही अत्यंत महत्त्वाची आहे. निर्मूलन करणे म्हणजे डागडुजी करणे वा सुधारणा करणे नव्हे. भिंतीचा रंग बदलण्याइतके हे सोपे नाही. झाडाच्या नको त्या फांद्या तोडण्यासारखेही हे सोपे नाही. तर जुन्या रचनेचा विध्वंस वा पूर्ण नायनाट करून एक पूर्ण नवी रचना प्रत्यक्षात उभी करणे हा निर्मूलनाचा अर्थ आहे. अंधश्रद्धा मुळापासून नष्ट करणे असा त्याचा अर्थ आहे. या अंधश्रद्धा मुळापासून जाळून टाकणे असा त्याचा अर्थ आहे आणि याचाही अर्थ अंधश्रद्धामुक्त समाज निर्माण करणे असा आहे. याचाही अर्थ अंधश्रद्धा ज्या मनांमध्ये मुक्कामी असतात ती मनेच मुळासकट नष्ट करणे आणि कोणतीही अंधश्रद्धा संभवणारच नाही अशी विज्ञानमने, अशी चिकित्सक आणि सर्जनशील मने नव्याने निर्माण करणे हा अंधश्रद्धा निर्मूलनाचा अर्थ आहे. माणसांची मने सूर्य झाली तर अंधार सूर्यापाशी पोचूच शकणार नाही. तसा माणूसही रॅशनल, विवेकवादी आणि विज्ञानशील झाला तर त्याच्याजवळ जाण्याची हिंमत कोणतीही अंधश्रद्धा करणारच नाही. खरे तर हे आहे की अशी मने निर्माण करता आली तर कोणतीही अंधश्रद्धाच मग निर्माण होणार नाही. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या आंदोलनाला असा माणूस आणि असा पूर्ण समाज निर्माण व्हावा असे वाटते. आमूलाग्र नवा समाज, पूर्णतः श्रद्धाविहीन माणूस, अंधश्रद्धाविहीन नवी व्यवस्था आणि सतत विज्ञानशील नवी व्यवस्था निर्माण करण्याचा ध्यास या आंदोलनाने घेतलेला आहे.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या प्रकाशन समारंभाच्या पत्रिकेवर आणि प्रथमांकावरही आपण संस्थेच्या ध्येयप्रतीकाखाली, लोगो खाली 'विज्ञान निर्भयता नीती' हे आपले उद्दिष्ट वाक्य छापले आणि डॉ.नरेंद्र दाभोळकरांचे प्रकाशचित्रही छापले याबद्दल तुम्हा सर्वच भावंडांना मी अंतःकरणापासून धन्यवाद देतो. डॉ.नरेंद्र दाभोळकर हे अंधश्रद्धा निर्मूलन आंदोलनाचे आपले महानायकच आहेत. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ नरेंद्र दाभोळकरमय झाली होती किंवा नरेंद्र दाभोळकर चळवळमय झाले होते. अशी चळवळ म्हणून जगणारी निखळ माणसे फार कमी असतात. मी माझ्या आयुष्यात आपल्या जगण्याचे चळवळीत रूपांतर करणारा एक भला माणूस बघितला. या माणसाचे नाव नरेंद्र दाभोळकर हे होते.

निश्चित वर्ष सांगता येत नाही पण तीस-बत्तीस वर्षापूर्वी मी एका चर्चासत्रासाठी साताऱ्यात गेलो होतो. बाबुराव बागूल होते. बाबा आढाव होते. जनार्दन वाघमारे होते. दया पवार, अर्जुन डांगळे असे अनेक मान्यवर होते. एका बँकेच्या मोठ्या सभागृहात ते चर्चासत्र झाले होते. या चर्चासत्रात दाभोळकरांची पहिली भेट झाली. ही भेट लक्षात राहण्याचे कारण ते मला बहुतेक तेच चालवत असलेल्या शिक्षणसंस्थेत सायंकाळी व्याख्यानासाठी घेऊन गेले. पुढे त्यांच्या अनेक भेटी झाल्या. नागपूरला आले की ते आवर्जून माझ्याकडे येत. चर्चा करीत. नागपुरातील त्यांची दोन-तीन भाषणे तरी माझ्या अध्यक्षतेखाली झाली असतील.

नरेंद्र दाभोळकरांमध्ये एक पूर्ण पारदर्शी माणूस मला दिसला. अंधश्रद्धा निर्मूलनाचे सर्व सिद्धान्तन त्यांच्या प्रज्ञानी रूपाने महाराष्ट्रभर चालत बोलत होते. पूर्ण विश्वास ठेवावा असा नितळपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होता. मला असे वाटते की नरेंद्र दाभोळकर या चळवळीचे घटनाकार आहेत. त्यांची वक्तृत्वशैली मोठी मॅग्नेटिक होती. बोलण्यात जिवंत ओघ होता. त्यांची शैली निराग्रही होती. पण शैलीतून प्रकटत होता तो विचार सत्याग्रहीच होता. अगदी शांतपणे, संयमाने आणि सभ्यपणे ते पुढच्या माणसाच्या काळजाला हात घालत व्यक्त होत असत. नाना प्रसंग, दृष्टान्त सांगत वा नाना युक्तिवाद करीत ते आपले म्हणणे मांडत. त्यांचे वक्तृत्वही सहजसुंदर होते. पुढल्या माणसाच्या मनाची रचना अलगद बदलण्याची क्षमता त्यांच्या आर्जवी आणि वेधक वक्तृत्वात होती. ते माणसावर हल्ला करीत नसत. रोगावर हल्ला करीत असत आणि या हल्ल्यातही अपार कळवळा असे. मला त्यांच्या शैलीत बुद्धाचे अनुसरण दिसत असे. त्यांच्यात एक परिपक्व आणि विचाराच्या शेवटच्या टोकापर्यंत पोचण्याची शिकस्त करणारा माणूस मी बघितला. अशी माणसे आता क्रमाक्रमाने दुर्मीळ होत चाललेली आहेत. डॉ.नरेंद्र दाभोळकर मला कधीच अंतर्विरोधाची शिकार झालेले दिसले नाहीत. त्यांची भूमिका हेच त्यांचे जगणे होते आणि त्यांचे जगणे हेच त्यांची भूमिका झाले होते. तुम्हा आम्हा सर्वांचेच ते रॅशनल चर्चाविश्व होते आणि हे चर्चाविश्व आपल्यासाठी आदर्शच होते. चळवळीत मतभेद संभवू शकतात पण नरेंद्र दाभोळकर तुम्हाआम्हा सर्वच अंधश्रद्धा निर्मूलनवाद्यांसाठी मतभेदातीतच होते असे मला नम्रपणे वाटते. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या प्रकाशनाच्या निमित्ताने मी या माझ्या प्रज्ञावंत मित्राला आणि बौद्धिक बंधूला अंतःकरणापासून अभिवादन करतो.

भावंडांनो, मुखपृष्ठावरचे गणेश पोतदारांचे निर्धारचित्र खूपच छान आहे आणि हा निर्वाणीचा निर्धार मागे असलेल्या अफाट जनसागराचा आहे हेही आपल्याला जाणवते. पहिल्या अंकातील सर्वच मजकूर लक्ष्यवेधी आहे. अंकाची मांडणी वगैरेही देखणी आहे. या देखण्या आणि मूल्यगंभीर अंकासाठी मी तुम्हाला धन्यवादही देतो आणि सदिच्छाही देतो.

भावंडांनो! आपण 'विज्ञान निर्भयता नीती' असे आपल्या चळवळीचे ब्रीदविधान मांडलेले आहे ते मला फार मोलाचे वाटते. हे विधान पहिल्या पातळीवर मनाच्या स्वातंत्र्याचे आहे. मन स्वतंत्र नसेल तर कितीही आव आणला तरी माणसाच्या कृती आणि उक्तीही दास्याच्या पिंजऱ्याबाहेर पडू शकत नाहीत. सर्वच पारतंत्र्यांपासून मुक्त झालेले मानवी मन स्वतंत्र होते. स्वतंत्र मनच स्वतंत्र विचार करू शकते आणि त्या विचाराची मुक्तपणे वा निर्भयपणे अभिव्यक्तीही करू शकते. हा मुळात मानवी सत्त्वाच्या वा मानवी अस्तित्वाच्या स्वातंत्र्याच्या प्रस्थापनेचाच मुद्दा असतो. व्यवस्थेचे धुरीण माणसांना वेगवेगळ्या पिंजऱ्यांमध्ये डांबतात. हे माणसांच्या माणूसपणाचेच निर्मूलन असते. ही सगळी रचनाच सरंजामी आणि भांडवली धुरीणांच्या वर्चस्वाची असते. इतर सर्वांच्या मानवी अस्तित्वाला आग लावल्याशिवाय धुरीणांचे उखळ पांढरेच होत नाही. या सर्व संदर्भबंधात माणसाला सर्वार्थांनी स्वतंत्र करणे हा अंधश्रद्धा निर्मूलनापुढला महत्त्वाचा मुद्दा आहे. तो स्वतंत्र झाला तर निर्भय होईल. निर्भय झाला तर तो प्रश्न विचारील. हस्तक्षेप करील. विघातकाला नकार देईल. असत्याचा प्रतिकार करील.

निर्भयताच माणसाला स्वतंत्र करते आणि हे स्वातंत्र्यच माणसाला निर्भयही करते. हे स्वातंत्र्यच माणसाला एलिनेशनमुक्त माणूस करते. तुम्हा सर्व भावंडांना मी धन्यवाद यासाठी देतो की मानवमुक्तीचे हे विधान तुम्ही या पत्रिकेचे उद्देशविधान केलेले आहे. विज्ञान खुद्द धर्मातीत, ईश्वरातीत, विषमतातीत आणि सकल अंधश्रद्धातीतच आहे. विज्ञान केवळ माणसालाच निर्भय करते असे नाही तर ते माणसाच्या विचाराला, त्याच्या ज्ञानमीमांसेला आणि त्याच्या आविष्काराला‌ही निर्भय करते. विज्ञान ही मानवाला महानायक करणारी नीती आपल्याला देते. विज्ञान स्वतः कोणती नीती सांगत नाही पण त्याच्या प्रकृतीतूनच एक नीती आपल्या मनात निर्माण होते. ही नीती निरंतर पुनर्रचनाशील आहे. विज्ञान ही कुठेही न थांबणारी, शेवटचा कोणताही थांबा मान्य नसलेली, निरंतर नवनवी सत्ये आपल्याला देणारी सत्यशोधक नीतीच आहे. एक शोध लागला की त्या क्षणासाठी तो अंतिमच शोध असतो. पण हा शोध लागला की त्यातील त्रुटी आणि चुका लक्षात घेण्याची प्रक्रिया शास्त्रज्ञाच्या मनात सुरू होते आणि तो शोध उपान्त्य होतो. इथून पुन्हा दुसऱ्या सत्यासाठी प्रवास सुरू होतो. शास्त्रज्ञ स्वतःच अंतिम सत्य असे पुढे पुढे सरकवत राहतो. ही विज्ञानपद्धती कुठेच न थांबणारी आणि सतत नवनवी तथ्ये प्रकाशात आणणारीच असते. म्हणून विज्ञान कधीही मूलतत्त्ववादी होत नाही. माणसाने विज्ञाननिष्ठ व्हायला हवे. याचा अर्थ माणसाने अंतिम सत्य पुढे पुढे सरकवीत अंतिम सत्याकडे जाणारा प्रवास मात्र करीत राहावे असा आहे. विज्ञान ही संवर्धननीती आपल्याला देते. कोणताही धर्म वा कोणत्याही धर्मातील ईश्वर हे स्वातंत्र्य, माणसाला देत नाही. शेवटचे सत्य, शेवटचे ज्ञान माणसाला कधीच प्राप्त होत नाही पण अशा सत्याकडे वा ज्ञानाकडे झपाटल्यागत निघालेली प्रक्रिया मात्र माणसाचे सतत संवर्धन करीत राहते. ही माणसाच्या जीवनाला नवनवे सर्जनशील अर्थ देणारीच नीती आहे.

विज्ञान आणखी एक नीती माणसाला देते. बिग बँगच्या महास्फोटातून विश्व निर्माण झाले. हा दिसणारा सर्व आविष्कार अणूचा आहे. सर्व इलेक्ट्रॉन सारखेच असतात. विश्वात पृथ्वी नावाचा सुंदर ग्रह निर्माण झाला. पाणी, माती यांचे सौंदर्य निर्माण झाले. त्यातून माणूस निर्माण झाला. माणसाचा आणि माणूस म्हणून तुम्हा आम्हा सर्वांचा संबंध त्या महास्फोटाशी आहे. तिथे आपली पहाट उगवलेली आहे. कोणाही ईश्वराने हे विश्व निर्माण केले नाही. ते स्फोटातून निर्माण झाले आणि

पुढे उत्क्रांत होत आहे. या विज्ञानाच्या सर्व प्रक्रियेतून एक महान नीती आपल्यापुढे उभी राहते. आपण अणूचा आविष्कार आहोत. माती आणि पाणी यांच्या संयोगाला आलेला मोहोर आहोत. आपण सर्व समान आहे. इलेक्ट्रॉनसारखे आपण आहोत. आपणा सर्वांमध्ये एकच सत्त्व आहे. इथे कोणता धर्म नाही. ईश्वर नाही. कोणत्या जाती नाहीत. कोणतीही अंधश्रद्धा नाही. विज्ञान आपल्यापुढे ही समतेची, बंधुत्वाची-भगिनीत्वाची नीती उभी करते. ही नीती त्रिविध आहे. ती मानवाच्या बुद्धिस्वातंत्र्याची नीती आहे. ती इहवादी आणि बुद्धिप्रामाण्यवादी नीती आहे आणि ती समतावादीही नीती आहे. ही विषमताविहीन विविधतेची आणि विविधतेतील एकोप्याची नीती आहे. इथे श्रद्धा-अंधश्रद्धांना कुठेही अवकाश नाही.

भावंडांनो, आपण विचार करता यामुळे मला तुम्हा सर्वांचा अपार गौरव वाटतो. विचार करण्यासाठी बुद्धीची गरज असते. अविचार करायची एक अफाट आणि लोकप्रिय इंडस्ट्री आपल्याकडे आहे. अविचार करण्यासाठी बुद्धीची गरज नसते. ज्ञान निर्माण करण्यासाठी मात्र स्वतंत्र मानवी बुद्धीची आणि मानवासंबंधीच्या करुणेची गरज असते. डोके विषमतेकडे गहाण ठेवले, डोक्याला परतंत्र करण्याची ताकद आपण मिळवली की अज्ञान सहज निर्माण करता येते आणि इतरांनी निर्माण केलेल्या अज्ञानाचीही उदंड तरफदारी करता येते. डोक्याला विकृत करण्याचे कौशल्य एकदा प्राप्त झाले की असत्याचे उत्पादनही सहज करता येते. ते आपल्याकडे झाले तसे विक्रमीही असू शकते. सत्याला असत्य, ज्ञानाला अज्ञान आणि विचाराला अविचार म्हणण्याची कुवतही मग अफाटच वाढत जाते. असत्याला सत्य, अज्ञानाला ज्ञान आणि अविचाराला विचार, विषमतेला समता आणि सामाजिक, आर्थिक, मानसिक शोषणाला पवित्र न्याय म्हणून प्रस्थापित करण्याची क्षमताही मग सहजच प्राप्त होते. अंधश्रद्धांनाच मानवोपकारक तत्त्वज्ञान आणि मूलतत्त्ववादालाच अपर्यायी कल्याणप्रकल्प म्हणून प्रस्थापित करायचा हुन्नर विकसित होत राहतो. हा संघर्षच असतो. हाच मानवी जीवनातला पायाभूत संघर्ष असतो. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीपुढले हे मोठे आव्हान आहे.

अनेक लोकांच्या मनात एक पूर्णतः भाबडी समजूत अशी असते की श्रद्धा आणि अंधश्रद्धा या संकल्पना वेगवेगळ्या आहेत. ते श्रद्धांना अंधश्रद्धा मानत नाहीत. याचा अर्थ ते अंधश्रद्धांना अंधश्रद्धा मानत नाहीत असाच आहे. माझी तुझ्यावर अंधश्रद्धा आहे असे कोणीही आपल्या मित्राला, आईला वा बापाला म्हणत नाही. देवावर, दैवी- शक्तीवर, चमत्कारांवर, बाबा-बुवांवर वा सतीमायांवर अंधश्रद्धा आहे असे कोणी म्हणत नाही. त्यांच्या या सर्वच गोष्टींवर श्रद्धा असतात असे हे लोक म्हणतात. श्रद्धा आणि अंधश्रद्धा या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत असे त्यांना उगीचच वा अकारणच वाटत असते. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांचे ते वेगवेगळे वर्ग करतात. स्वतःला अंधश्रद्धावान म्हणवून घेण्यापेक्षा श्रद्धावान म्हणवून घेणे लोकांना आवडते. म्हणजे श्रद्धा डोळस असते आणि ती अंधश्रद्धेपेक्षा वेगळी किंवा स्वीकरणीय असते असे अनेकांना वाटते. म्हणून अंधश्रद्धाळू म्हणून घेण्यापेक्षा त्यांना श्रद्धाळू म्हणून घेणे गौरवाचे वाटत असते. पण अंध हे पूर्वपद नसलेली श्रद्धाही आंधळीच असते. श्रद्धेला तर्क मान्य नसतो आणि अंधश्रद्धेलाही तर्क मान्य नसतो. श्रद्धेलाही चिकित्सा मान्य नसते आणि अंधश्रद्धेलाही चिकित्सा मान्य नसते.

विज्ञानाच्या परीक्षेला श्रद्धाही कधी बसत नाही आणि अंधश्रद्धाही कधी बसत नाही. विज्ञानाच्या परीक्षणनलिकेला श्रद्धाही मान्य नसते आणि अंधश्रद्धाही मान्य नसते. सत्याची प्रस्थापना

करणारे कोणतेही प्रामाण्य श्रद्धेला मान्य नसते आणि अंधश्रद्धेलाही मान्य नसते. बुद्धिप्रामाण्यवाद, इहवाद, पुनर्रचनाशीलता आणि मानवाच्या बुद्धीचे स्वातंत्र्य श्रद्धेलाही मान्य नसते आणि अंधश्रद्धेलाही मान्य नसते.

श्रद्धा आणि अंधश्रद्धा थांबलेल्या जगाचे प्रतिनिधित्व करतात. पुनर्विचार, पुनर्निमिती, स्थित्यंतर वा व्यवस्थांतर अशा कोणत्याही गोष्टी श्रद्धांनाही कबूल नसतात आणि अंधश्रद्धांनाही कबूल नसतात. याप्रकारे श्रद्धा हे अंधश्रद्धा या शब्दाचे संक्षेपीकरण असते.

अंधश्रद्धा हे जागतिकच अरिष्ट आहे. बौद्धिकदृष्ट्या माणसाचे कंगालीकरण झाले की अंधश्रद्धा कृतार्थपणे अशा मनात वास्तव्याला जाते. या संदर्भातले सर्व नियोजन धुरीणांचे वा वर्चस्वी अभिजनांचेच असते. ही सर्वसामान्य माणसांच्या शोषणाचीच लबाड संरचना असते. या संरचनेमागे वर्चस्ववाद्यांचे पिसाट राजकारण असते. हे मूठभर उच्चवर्गाच्या, उच्चजातींच्या हितसंबंधाचेच राजकारण असते. हे या वर्चस्वी अभिजनांच्या हितसंबंधांना पवित्र आणि अंतिम मानणारे दुष्ट राजकारणच असते. हे सर्वसामान्य ठेवल्या गेलेल्या बहुजनांच्या संपूर्ण अहिताचेच राजकारण असते. राजकारणातही हेच राजकारण असते. समाजातही हेच असामाजिक राजकारण असते. राजकारण, साहित्य, सर्व कला, शिक्षण, अर्थव्यवस्था, ज्ञानव्यवस्था या सर्वच यंत्रणा मूठभर अभिजनांच्या हितासाठीच वेठीला धरल्या जातात. त्यासाठी माणसांना सराईत अंधश्रद्ध केले जाते. विवेकबुद्धी आणि माणसे यांच्यात बर्लिनची मजबूत भिंत बांधली जाते. पण बर्लिनच्या भिंतीलाही एक्पायरी डेट असतेच हे या यंत्रणांना कळत नाही, तरी तोवर शोषणयंत्रणा विनाहस्तक्षेप चरत असतात. त्यासाठी अंधश्रद्ध माणसांचे इंधन शोषणव्यवस्था आपल्या अनिर्बंध शोषणासाठी वापरत असते. सभ्य, सरळ आणि स्वतःचे बरे-वाईट काय ते समजण्याची कुवत नसलेल्या माणसांना मूर्ख करता येणे सोपे नसते. त्यासाठी विशेष आणि अमानुष दुष्टपणाच हवा असतो. या दुष्टपणाचा जे मेहनतीने विकास करू शकतात ती वर्चस्वस्थानी असलेली माणसेच सामान्य माणसांच्या सरळ डोक्यांना अंधश्रद्ध करतात. यासाठी दैवाचा हवाला देणारी गेंड्याची कातडी लागते. अभेद्य अज्ञान लागते. बुद्धीच्या चिंध्या करण्याची अफाट दुष्टता लागते. विशेष प्रकारची अमानुषता, अपूर्व असे क्रौर्य आणि अनन्य अशी वर्चस्वाची पिसाट तृष्णा लागते. ही विशेष दुर्गुणवत्ता प्राप्त झाली की माणसांना अंधश्रद्ध करणे सोपे जाते. मग समाजात 'एज ऑफ अंधश्रद्धा' सहज सुरू होते. धर्मपीठे या अंधश्रद्धायुगाची लोकप्रियता वाढविण्याचे कार्य अहर्निश करीत असतात. धर्मपीठे, सर्व प्रकारची समाजमाध्यमे या संदर्भात निष्ठेने कार्य करीत राहतात.

अंधश्रद्धा हे राजकारण आहे. ते शोषकांच्या क्रूर हिताचे राजकारण आहे. यासोबतच अंधश्रद्धा हा विश्वव्यापी व्यवसायही आहे. मंदिरात हजारो कोटी रुपयांची संपत्ती त्यामुळेच जमा होते. कोरोना काळात मंदिरे, चर्चेस, मशिदी या सर्वच गोष्टी बंद होत्या. माणसे आणि वरील सर्वच वास्तूंमधील देवही ही बंदी रोखू शकत नाहीत. कोरोनाही हे कोणी चमत्कारवीर, दैवीशक्तीवाले किंवा खुद्द देवही रोखू शकत नाहीत. या सर्व गोष्टींचा अर्थ श्रद्धाळू वा अंधश्रद्धाळू लोक कसा लावतात ते त्यांनी जाहीर करायला हवे. आजार झाल्यावर मंदिरात जाण्याऐवजी दवाखान्यात वा डॉक्टरांकडे ही माणसे का जातात याचा विचार जरी या माणसांनी केला तरी जगातील नव्व्याण्णव टक्के अंधश्रद्धा नष्ट होतील.

मग मंदिरे वा ही सर्व धर्मस्थळे उघडण्यासाठी आंदोलने केली जातात. ही आंदोलने कोण करतात, कशासाठी करतात? ही सर्वच धार्मिक स्थळे खुली करण्यासाठी

सरकारविरोधात आंदोलने केली जातात. चमत्काराचार्य, देव, दैवीशक्ती सर्व तुमच्याजवळ असताना धर्मस्थळे उघडण्यासाठी त्यांचा उपयोग करण्याऐवजी सरकारविरोधात आंदोलने का केली जातात? लोकांच्या एकत्र येण्यामुळे कोरोनाचा उद्रेक वा कहर होऊ नये म्हणून सरकार ही प्रार्थनास्थळे बंद करते. म्हणजे एकीकडे कोरोना बळावू नये म्हणून प्रयत्न तर दुसरीकडे कोरोना वाढला तरी चालेल, लोक मेले हजारोंच्या संख्येने तरी चालेल पण धर्मस्थळे उघडली जायला हवीत. यासाठी आंदोलन. पण लोकांना त्यांच्या त्यांच्या देवाचे दर्शन घेता यावे यासाठी ही आंदोलने नसतात. मंदिरात देव नसतो. मंदिरात पुजाऱ्याचे पोट असते असे गाडगे बाबा म्हणत ते खोटे नाही. याप्रकारे या आंदोलनांमागे एक ऐतखावू अर्थशास्त्र असते.

कोणतेही उत्पादन न करता इतरांच्या भोळेपणामुळे पैसा लुटण्याची ज्यांना सवय होते ते पुजारी, बाबाबुवा आणि त्यांच्यासाठी काम करणारे त्यांचे राजकारणी धर्मस्थळे उघडी करण्यासाठी आंदोलने करतात. अंधश्रद्धा हे निरुत्पादकांचे ऐतखाऊ अर्थशास्त्र आहे आणि ज्यांच्यातील अंधश्रद्धांमुळे हे चालते त्या गोरगरिबांचे हे विनाशशास्त्र वा त्यांचे ते अनर्थशास्त्र आहे.

हे असे सर्वच या बलाढ्य व्यवसायाचेच राजकारण असते. यालाच अर्थशास्त्रीय राजकारण वा राजकीय अर्थकारण म्हणतात. हे मूलतः अंधश्रद्धांवर फोफावणारे आणि लोकांच्या बौद्धिक हत्या करणारे अर्थकारणही असते आणि राजकारणही असते. धर्माच्या आधारानेच या अंधश्रद्धा निर्माण केल्या जातात पण त्यांचा लाभ ज्यांना मिळतो ते धार्मिकही नसतात आणि नैतिकही नसतात. ते फक्त फायदेकरी असतात वा लाभार्थी असतात. हा या ऐतखाऊ लोकांचा निखळ ऐहिक पातळीवरचा स्वार्थ असतो. त्यामुळे हेही लोक एकाचवेळी त्यांच्या धर्मालाही, त्यांच्या देवालाही आणि सर्वसामान्य अंधश्रद्ध लोकांनाही फसवीत असतात. या सर्वच फसवणुकीसाठी अंधश्रद्धा हे त्यांचे हत्यार असते. यासाठी माणसांना अज्ञानी, अडाणी आणि सहनशील रूपात घडवले जाते. त्यामुळे ही माणसे अंधश्रद्धांच्या विरोधी तक्रार करीत नाहीत. कारण तक्रार करण्यासाठी लागतो तो त्यांचा मेंदूच वर्चस्वी अभिजनांनी गोठवून ठेवलेला असतो. व्यवस्थेची भाटगिरी करणाऱ्या साहित्यिकांनीही तो मेंदू विझवून ठेवलेला असतो. असे केले जाते याचे कारण विचार न करणारी माणसे शोषण करण्यासाठी अत्यंत योग्य आणि सोयीची असतात. म्हणून विचारबंदी, शिक्षणबंदी, स्वातंत्र्यबंदी हाच शोषकांचा आणि मूठभर अभिजनांचा कार्यक्रम असतो. हे शोषकाचे कार्य मोठ्या मंदिरातील पुजारी वा पुरोहितापासून गावातील बाबा, बुवा, बापू, महंत, महाराज, सतीमाया असे सर्वजण राबवित असतात. शोषणसत्तेचा हा जणू प्रशासकीय विभागच असतो. याप्रकारे नाना प्रकारच्या अंधश्रद्धांच्या अफूचे कारखाने शोषणसत्ता तयार करते आणि अंधश्रद्धांचा प्रसार करते. अंधश्रद्धा ही लोकांना झोपवणारी आणि त्या नशेत गुंगवणारी अफूच असते.

या सर्व अंधश्रद्धांची अमानुष सत्ता उद्ध्वस्त करायची असेल तर सद्विवेकाचीच महत्ता वा मानवी जीवनाच्या संदर्भातील त्याचीच उपयुक्तता लोकांपर्यंत पोचवायला हवी. मी विचार करतो म्हणून मी आहे असे रेने देकार्त म्हणतो आणि विचार करतो तो माणूस रॅशनल होतोच. विचार करतो तो माणूस प्रश्न विचारतोच. विचार करतो तो माणूस चिकित्सा करतोच. चांगले काय वा वाईट काय याचा निर्णय तो घेतोच. विचार करतो तो माणूस अविचाराच्या विरुद्ध बंड पुकारतोच. अविचार म्हणजे अतार्किकता आणि अतार्किकता म्हणजे अंधश्रद्धा! विचार करतो तो माणूस इहवादी होतोच. विचार करतो तो माणूस सामाजिक,

आर्थिक अशा सर्वच क्षेत्रांमधील विषमतेच्या विरोधात समतेची भूमिका घेतोच. तो पूर्ण विज्ञाननिष्ठ, समतावादी, सममूल्यवादी आणि समन्यायवादी होतोच. विचार करतो तो माणूस प्रथम अविचारावर, सर्व खोट्या मान्यतांवर आणि लोकप्रिय असत्यांवर निकराचा हल्ला चढवतोच आणि अंधश्रद्धा म्हणजे अविचार, असत्य, निरुत्पादकांचे वर्चस्व आणि अर्थशून्यतेचा सन्मान! विचार करतो तो माणूस वरील सर्वच अंधश्रद्धांना निरर्थक, अमानुषही मानतो, मानवी बुद्धीचा अवमान करणाऱ्याही मानतो आणि अंधश्रद्धांच्या बलाढ्य सत्तेवर सर्व बाजूंनी हल्लाही करतो.

शेवटी भ्रममुक्त, पारतंत्र्यमुक्त म्हणजे अंधश्रद्धामुक्त माणसांचा समाज हेच अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे उद्दिष्ट आहे. तेच तिचे प्रीॲम्बल आहे. आपल्या चळवळीला केवळच अंधश्रद्धा निर्मूलन करायचे नाही तर या अंधश्रद्धांनी विकृत झालेल्या समाजाला पूर्ण विज्ञाननिष्ठ आणि पूर्ण सममूल्यमय समाजाचा पर्यायही जन्माला घालायचा आहे. अशा समाजाच्या निर्मितीचे प्रयत्न भारतातही आणि जगभरातही सुरू आहेत. या सर्वच प्रयत्नांचे कुटुंब आपले कुटुंब आहे. भारतातील श्रमण संस्कृती हे आपले कुटुंब आहे. ती मेहरगड आणि सिंधूसंस्कृतीपासून आपल्या संविधानापर्यंत चालत आलेली आहे. हीच खरी भारतीय संस्कृती आहे. ती मातृप्रधान संस्कृती आहे. आदिसांख्य, आदिमहावीर, लोकायत, बुद्ध हे इ.स.पूर्वकाळातील या भारतीय संस्कृतीचे तत्त्वज्ञानी आहेत. हे निरीश्वरवादी, इहवादी, विज्ञाननिष्ठ आणि सममूल्यवादीच तत्त्वज्ञ आहेत. यापैकी कोणीही धर्म स्थापन केले नाहीत. त्यांच्या नावाने काहींनी पुढे धर्म स्थापन केले. हे सर्व रॅशनल तत्त्वज्ञानी आहेत याचा अर्थ ते सर्व अंधश्रद्धाच्या विरुद्धचे उठाव आहे. हे आपले सर्व तत्त्वज्ञानी केवळ तत्त्वज्ञानी नव्हते तर ते कृतीवीरही होते. ते प्रत्यक्षप्रमाणवादी होते. चिकित्सक होते. बुद्ध तर एहिपस्सिक धम्म असे म्हणाले होते. ते कालामांना म्हणाले होते - कोणीही काही सांगितले तरी विनाहस्तक्षेप स्वीकारू नका. चिकित्सा करा. कोणतेही विचार सद्विवेकाला पटले तरच स्वीकारा. बुद्धांचा प्रतीत्यसमुत्पाद आणि अनित्य (म्हणजे बदल हाच जीवनाचा नियम आहे. सर्वच सतत बदलत असते) हे दोन्ही सिद्धान्त आपल्याला बुद्धीस्वातंत्र्याची महत्ता सांगतात. काळासोबत सतत बदलावे. सद्विवेकासोबत सतत काळाला दिशा देत जगावे. असे बुद्ध सांगतात. त्यामुळे बुद्ध कधीही मूलतत्त्ववादी होत नाहीत. जीवन विनाचिकित्सा स्वीकारू नका असे म्हणणारे बुद्ध आणि ते ज्या श्रमण म्हणजे भारतीय परंपरेचे आहेत ती श्रमणसंस्कृती मूलतः सर्वच अंधश्रद्धांना पूर्ण नाकारणारीच संस्कृती आहे. 'अन्इग्झॅमिन लाइफ इज नॉट वर्थव्हाईल' असे ईश्वर न मानणारा सॉक्रेटिसही म्हणतो. आपण एकटे वा निस्संदर्भ नाही. आपल्या आंदोलनाच्या पाठीशी हे पूर्ण संघर्षशील आंदोलन आहे. ही बाबही आपण लक्षात ठेवायला हवी.

असा पर्याय निर्माण करू इच्छिणाऱ्या विश्वकुटुंबाचे आपण घटक आहोत. मेहरगडच्या श्रमणसंस्कृतीपासून आदिसंख्य, लोकायत, बुद्ध पुढे फुले-बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान अशी आपली बुद्धिवादी परिवर्तनाची भारतीय परंपरा संघर्ष करीतच आलेली आहे. आपली विवेकबुद्धीच आपले प्रश्न सोडवू शकते आणि हे प्रश्न सोडवतानाच ती अधिक प्रज्ञानी होत आहे हे प्रत्येकाला सांगण्याचा वसा आपण पत्करलेला आहे. बुद्धीला विसंगत आणि तर्काला सोडून ते ते बुद्धाचे नव्हे म्हणून इतर गोष्टी यथायोग्य जे जे बुद्धीला व तर्काला धरून असेल आणि सर्वांच्या समान हिताचे असेल ते ते बुद्धवचन मानावे असे (बुद्ध आणि त्याचा धम्म, पृ.२७०) बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. कालामांना बुद्धाने असेच सांगितले होते (उक्त: पृ.२१५-१६) आणि

तुम्हाआम्हासाठी हेच महान प्रमाणशास्त्र आहे. त्यामुळेच आपल्या पायाखाली तडजोडविहीन बुद्धिप्रामाण्यवादाची वाट आहे आणि आपल्या डोळ्यापुढे विज्ञाननिष्ठ मानवतावादाचे सुंदर स्वप्न आहे. हे स्वप्नही आपल्याला साद घालीत आहे आणि आपणही या स्वप्नाच्या दिशेने निर्धाराने चाललो आहोत.

अंधश्रद्धामुक्त समाज प्रत्यक्षात आणण्यासाठी समाजमनात सदविवेकाची लागवड करायला हवी. सर्वांच्या उज्ज्वल मानवी जगण्यासाठी सद्विवेकाची प्रतिष्ठा प्रज्वलित करायला हवी. याचा दुसरा अर्थ लोकांच्या मनातील असद्संस्कारांचे, विघातक समजुतींचे आणि भ्रमांचे मातलेले भयंकर झुडुपीजंगल नष्ट करायला हवे. म्हणजे या मनाची पाटी प्रथम कोरी करावी लागेल. या कोऱ्या पाटीवरच आपल्याला विज्ञानशील मानवतावादी समाज हे शब्द निर्भयपणे लिहिता येतील. खरे म्हणजे धर्मही, ईश्वरही, परलोक, वर्ण, जाती आणि आपले परके या सर्वच गोष्टीही माणसानेच निर्माण केल्या. आणि ही त्यानेच केलेली निर्मिती त्याच्या जीवनातील सलोख्याच्या, सौहार्दाच्या आणि सौंदर्याच्या जिवावर उठली. त्यामुळे माणसालाच अडचणीत आणणाऱ्या, त्यालाच मूलतत्त्ववादात गोठवणाऱ्या या त्याच्याच निर्मितीपासून त्याला सोडवावे लागेल. हे सोपे नाही पण हेच करावे लागेल. शोषक लोक गुलामांच्या गुलामीचा पुरस्कार करतात ही बाब नष्ट करणे फारसे अवघड नसते पण शोषकांच्या लबाड तंत्राला बळी पडून गुलामच जेव्हा गुलामीचे संरक्षक होतात तेव्हा गुलामीनिर्मूलन ही गोष्ट भयंकरच अवघड होऊन बसते. ही गुलामी खरे म्हणजे अंधश्रद्धांचीच असते. या माणसांना असत्यांचा एवढा कैफ चढलेला असतो की ही माणसे सत्य ऐकण्याची, ते सहन करायची वा सत्य स्वीकारण्याची क्षमताच पार विसरून जातात. सत्याचे विस्मरण आणि सत्याचा द्वेष हा आजारच असतो आणि व्यवस्थेने अंधश्रद्धांची इंजेक्शने देऊनच या आजाराला समाजात सुप्रतिष्ठित केलेले असते. त्यासाठी समाजमनात सद्विवेक जागवणे हाच एक उपाय असतो आणि तो दीर्घपल्याचा कार्यक्रमही असतो. विचार करतो तो माणूस हीच माणसाची खरी व्याख्या आहे. तेच माणसाचे अनिवार्य वैशिष्ट्य आहे. ही सद्बुद्धी जर माणसाने गमावली तर त्याच्याजवळ अर्थपूर्ण जगण्यासारखे दुसरे काही उरत नाही. विचार करता येणे हीच माणसाची खरी ताकद आहे. ही आपली ताकद गमावलेला आणि विसरलेला माणूस अंधश्रद्ध होतोच. या अंधश्रद्धा मग माणसाचे मानवी जगणेच मोडीत काढतात. यावर माणसांच्या मनात सद्विवेक जागवणे आणि प्रखर करणे हाच मोठा इलाज आहे.

जन्माने स्वतंत्रच असणाऱ्या माणसाला या अंधश्रद्धा गुलाम करतात. त्याच्या निरुपाधिक माणूसपणाचे अपहरण करतात. अंधश्रद्धा निर्मूलनाचा कार्यक्रम हा या पारतंत्र्याच्या निर्मूलनाचाच कार्यक्रम असतो. जाती-वर्गातीत आणि एकूणच सर्व अंधश्रद्धातीत जीवनाच्या निर्मितीचाच तो कार्यक्रम असतो. अंधश्रद्धा निर्मूलन हा कार्यक्रम एक निरामय, सुसभ्य, मानवी जीवन निर्माण करण्याचा, समाजाला स्वयंपूर्ण आणि स्वयंप्रकाशित करण्याचा आणि परावलंबनातून मुक्त करणाराच कार्यक्रम असतो.

अंधश्रद्धा हे बुद्धिचुकार लोकांचे विश्रामगृहच असते. आळसावर अपार प्रेम करणाऱ्या लोकांचे हे निरर्थक शॉर्टकट आयोजन असते. हे आयोजन त्यांचा त्यांच्या मानवी बुद्धीशी असलेला संपर्कच तोडून टाकते. माणसाच्या वाट्याला मग बुद्धिविहीनच जगणे येते. हा मग माणसानेच स्वतःवर केलेला सर्वश्रेष्ठ अन्याय असतो. हे माणसाने स्वतःच केलेले स्वतःचे झुडुपीकरण असते. अंधश्रद्धा माणसाला विचारच करू देत नाहीत आणि विचार न करणाऱ्या आणि

चिकित्सा न करणाऱ्या माणसाला गुलामी हे सर्वश्रेष्ठ कुरूप पारितोषिक सहजच मिळते.

आज जीवनाच्या सर्वच क्षेत्रात अंधश्रद्धांनी कहर केलेला आहे. ही वेदकाळापासून सुरू झालेली महामारी आहे. आज सर्वात जास्त आनंदी या अंधश्रद्धाच झाल्या आहेत. भोवती सर्वत्र त्यांच्या विजयाचे वातावरण तयार केले गेले आहे. अंधश्रद्धांचे सर्वात जास्त बाधित राजकारणात आहेत. गणपती दूध पितो ते भारतात पहिली सर्जरी इथपासून या अंधश्रद्धांचे नवे पर्व सुरू होते. कोरोनावर उपाय म्हणून यज्ञ, प्रार्थना, टाळ्या-थाळ्या पिटणे, गोमुत्र पिणे अशा हजारो अंधश्रद्धांचा स्फोट या काळात झाला आहे. साहित्याच्या क्षेत्रात साहित्यकृतीचा घाट म्हणजे सौंदर्य इथपासून 'जाती तुटल्या तर देश तुटेल' या महान अंधश्रद्धेपर्यंत मराठी साहित्याने अपूर्व मजल मारलेली आहे आणि या विषमतेच्या समर्थनाला छगन भुजबळांनी समता पुरस्कार देऊन गौरविलेही आहे. हे सर्वच सामान्यांच्या बुद्धीला केवळ दुर्बोध वाटावी अशीच ही अंधश्रद्धा आहे. पाऊस पडावा म्हणून शाळांना राज्यपालांनी प्रार्थना करायला सांगणे आणि महापूर आला म्हणून लोकांनी पूजासत्र सुरू करणे या सर्वच अंधश्रद्धा गंभीर आहेत. धर्म, शिक्षण अशा सर्वच क्षेत्रात अंधश्रद्धाची बलाढ्य. सत्ता प्रस्थापित झाली आहे. असा तपशील अफाटच आहे. तो तुम्हा सर्वांना माहीत आहेच पण जो माणूस सद्विवेकाकडे पाठ फिरवतो तो अंधश्रद्धांच्या महासागरातच उडी घेतो. जे सत्यापासून दूर पळतात त्यांना असत्यांचेच देह प्राप्त होतात. अंधश्रद्धा याप्रकारे माणसांना अज्ञानाच्या, खोटेपणाच्या, भ्रमांच्या आणि असद्च्या अंधारोत्सवात घेऊन जातात. हा तमोत्सव अविवेकाचाच असतो. अंधश्रद्धा माणसांना काळ्या विवरातच घेऊन जातात. आपण काळ्या विवरात वास्तव्याला गेलो आहोत हेही लोकांना त्या कळू देत नाहीत. त्यांनाच आपण पावरफूल अंधश्रद्धा म्हणतो.

अंधश्रद्धा हा माणसाच्या संपूर्ण पारतंत्र्याचा जागतिक शोषणसत्ताकाने जन्माला घातलेला भीषण आदिबंध आहे. स्वतंत्र मानवी बुद्धिवरचाच तो निर्घृण हल्ला आहे. हे जगातील चलाख सत्तापिसाट अभिजनांचे हिंस्र राजकारण आहे. अंधश्रद्धा या सरळ साध्या लोकांना अंध करतात आणि स्वतः मात्र एका कारस्थानी नियोजनाचा भाग असतात.लोकांमध्ये बौद्धिक आंधळेपणा निर्माण करण्यासाठीच वर्चस्ववाद्यांनी निर्माण केलेल्या कपट कारस्थानांनाच अंधश्रद्धा हे नाव शोभून दिसते. या महामारीवर सद्विवेक आणि विज्ञानशीलता हेच औषध आहे. हे प्रभावी औषधच आता मोठ्या प्रमाणात निर्माण व्हायला हवे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती अशाच औषधांची प्रयोगशाळा आहे असे मला वाटते. या प्रयोगशाळेला मी मनापासून सुयश चिंतितो. मी तुम्हा सर्वांसोबत आहेच हे अंधश्रद्धानिर्मूलन समितीच्या सर्व सैनिकांना अभिवचन देतो.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे प्रकाशन झाले हे पुन्हा जाहीर करतो. अविनाश पाटील, नितीन शिंदे, उत्तम जोगदंड आणि इतरही सर्व पदाधिकाऱ्यांना मला या प्रकाशन सोहळ्यात सहभागी करून घेतल्याबद्दल धन्यवाद देतो आणि थांबतो. जयभारत! जयसंविधान!

■ ■ ■

# महा. अंनिस : नक्षत्रांचं देणं



सुशीला मुंडे
९८७०७ ३०३६८

शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोलकर यांनी ९ ऑगस्ट, १९८९ ला मूठभर कार्यकर्त्यांसह महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. नेटकं व कुशल संघटन कौशल्य यांच्या जोरावर आणि विवेकी विचारांच्या आधारावर महाराष्ट्रभर विविध जिल्ह्यात अनेक धडपडे कार्यकर्ते त्यांनी संघटनेच्या माध्यमातून जोडले. याच्या जोडीलाच प्रशिक्षण, संपर्क, भेटीगाठी, लिखित साहित्य यामधून कार्यकर्ते घडवले आणि टिकवून ठेवले. अवघ्या बत्तीस वर्षांच्या दमदार कारकीर्दीत महाराष्ट्र अंनिस हे संघटन डॉ दाभोलकर यांच्या नंतरच्या नेतृत्वाने महाराष्ट्राच्याबाहेर पोहोचवलं आणि बघता बघता ते आता आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा पोहोचलं.

आज, महाराष्ट्रातल्या अगदी दूरवरच्या खेड्यातदेखील अंधश्रद्धा निर्मूलनाच्या संदर्भातील एखादी गोष्ट घडली, तर जवळपासच्या कार्यकर्त्याचा फोन खणखणत राहतो. कधी कधी जवळच्या पोलीस स्टेशनचा फौजदारदेखील कार्यकर्त्याला फोन करतो आणि काय करता येईल? असा प्रश्न करतो. याचाच अर्थ असा आहे की; महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची ही चळवळ जनमानसात रुजलेली आहे, फोफावलेली आहे. सामान्य कार्यकर्त्यांपासून ते प्रशासनातील अधिकार्यांपर्यंत पोहोचली आहे. एवढेच नव्हे तर काही आमदार-खासदारांनाही एखाद्या सामाजिक प्रकरणात कधीकधी चळवळीचा आधार वाटतो. महाराष्ट्रातील सर्वच पुरोगामी चळवळींना भुरळ पाडणारे हे संघटन आहे, यात शंकाच नाही. याचे कारण असे की, संघटनेने नेहमीच लोकांच्या जीवनाशी निगडित असे प्रश्न हाती घेतले, त्यामुळे चळवळ लोकांना जवळची व आपली वाटू लागली.

जेव्हा तुमच्या हातात हा अंक पडेल, तेव्हा आपल्या आजुबाजुला गणेशोत्सवाचे वारे जोरात वाहू लागलेले असतील. अंधश्रद्धा निर्मूलन समिती धर्मचिकित्सा करते, तेव्हा त्याचा अर्थ, धर्मद्रोह असा काही लोकांना वाटतो. या चळवळीचे कार्यकर्ते हे कर्ते-सुधारक असल्यामुळे, हरघडी त्यांचा धर्माशी निगडीत सण उत्सव यांच्याशी संबंध येतो. धर्मचिकित्सा ही चळवळीसाठी अपरिहार्य बाब आहे आणि धाडसाने कार्यकर्ते ती करीतही असतात. चळवळीचा प्रत्येक कार्यकर्ता भारतीय राज्यघटनेतील सुधारणेच्या तत्वांचा म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याचा आग्रह धरत असतो. उदा. प्लास्टर ऑफ पॅरिस पासून बनवलेल्या गणेशाच्या मूर्ती मोठ्या प्रमाणात वाहत्या आणि पिण्यालायक पाण्यात विसर्जित झाल्यास जलप्रदूषणाचा, पर्यावरणाचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. अशावेळी वैज्ञानिक दृष्टिकोन व सुधारणेचे तत्व याचा विचार करून चिकित्सा केली व काही पर्याय सुचवले, तर तो धर्मद्रोह कसा होऊ शकतो? याचे उत्तर आजही तथाकथित धर्म रक्षकांकडून मिळत नाही. मग, पर्यावरण पूरक गणेशोत्सवाची मोहीम असो, कि सण-उत्सवांना कालसुसंगत पर्याय देण्याची मोहीम असो. हे सारे उपक्रम कमालीचे समाजाभिमुख झालेले आहेत आणि बघता बघता ते सर्व शासनाने देखील

स्वीकारलेले आहेत. हा चळवळीचा विजयच आहे.

चळवळीच्या निमित्ताने मी महाराष्ट्रातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये दौरे करत असते. काही ठिकाणी, तर अतिशय दुर्गम भाग असतो. तेव्हा तिथेही मला कार्यकर्त्यांची कृतिशीलता आणि वैचारिक परिपक्वता अनुभवायला मिळते. धर्माच्या नावाने बळकट झालेल्या रूढी,परंपरा, कर्मकांड, व्रतवैकल्य, या पुढील पिढीच्या प्रगतीत आर्थिक अडथळे ठरत असतात आणि एकूणच समूहाला, समाजाला चुकीच्या मार्गाने नेत असतात. कळत नकळत त्याला मान्यताही मिळत जाते. उदाहरण द्यायचे झाले, तर अगदी जवळच्या कुटुंबीयांमध्ये जेव्हा लग्न असते, तेव्हा मुलीला 'कन्यादान' अशा अर्थाने दान केले जाते. एखादी स्त्री विधवा असेल, तर तिला हळदीकुंकवाला  बोलावले जात नाही. अशाप्रकारे,  तो सामूहिक बहिष्कारच असतो. अशावेळी तिच्या संवेदनांचा, भावनांचा कुठेही, कोणीही विचार करीत नाहीत. का? तर परंपरांना असलेली मान्यता. अशावेळी तो छोटासा कार्यकर्ता किंवा कार्यकर्ती ज्या धाडसाने समूहात पुढे जात असतात आणि समाजामध्ये सुधारण्याची एक छोटीशी का होईना लहर उमटवत असतात, ते खूप महत्त्वपूर्ण असते. याचे श्रेय अर्थातच अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चळवळीला आहे. तसेच त्या धाडसी युवांना देखील. समाजव्यवस्थेला मान्य असणाऱ्या रूढी-परंपरांना हळूवार धक्का देण्याचं काम आजची युवा पिढी करीत आहे. उद्याचा भारत हा तरुणांचा भारत असेल तर, अशी ही घडणारी पिढी आणि घडवणारी संघटना हे नक्कीच महाराष्ट्र भूषण असेल. आज संघटनात्मक प्रतिकूल परिस्थितीतही परिवर्तनासाठी, परिस्थितीला तोंड देत उभे राहण्याची हिंमत, कष्ट, तयारी कार्यकर्त्यांमध्ये शिगोशिग भरलेली आहे. त्यामुळे यांचे भविष्यही नेहमी उज्ज्वल असणार आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ बघता बघता धर्मचिकित्सेकडून मानवतावादकडे कधी येऊन ठेपली, हे समजलंच नाही. त्यामुळे  ईश्वरकेंद्री धर्म, मानवकेंद्री बनणे महत्त्वाचे वाटू लागले.

नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध व त्यांचे समूळ उच्चाटन अधिनियम २०१३ हा कायदा पारित करून घेण्यासाठी चळवळीने तब्बल १९९५ ते २०१३ पर्यंतच्या सर्व अधिवेशनात धरणे, आंदोलने, तोंडाला काळे फासणे, थोबाडीत मारून घेणे, उपोषण, रक्ताने हातावर लिहिणे, आत्मक्लेश, व्याख्याने  हे सर्व काही केले. कमालीचे सातत्य आणि चिकाटी याला यश आले. डॉक्टर नेहमी म्हणत, 'कायदा तर होईलच परंतु महाराष्ट्राच्या आधुनिक काळातील प्रबोधनाच्या धुमाळीतील एक महत्वाची झुंज म्हणून आपण अंनिसच्या कार्यकर्त्यांनी  कायदा निर्मितीच्या प्रक्रियेकडे आणि नंतर कायद्याच्या अंमलबजावणीकडे अतिशय अभिमानाने पाहिले पाहिजे'. महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे जिथे जादूटोणाविरोधी कायदा पारित झाला. अर्थात याला दु:खाची एक किनार आहेच. २० डिसेंबर २०१३ रोजी हा कायदा पारित केला गेला, ते पहायला डॉक्टर हयात नव्हते. डॉक्टरांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही, याची प्रचिती कार्यकर्त्यांनी लगेच आणून दिली. आजच्या घडीला जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत, जवळपास चारशे पन्नासहून अधिक प्रकरणे महाराष्ट्रातील सर्वच पोलिस स्टेशनला दाखल झालेली आहेत. काही गुन्ह्यांचे तर निकालही लागले आहेत आणि गुन्हेगांराना शिक्षादेखील झाली आहे. पुरोगामी महाराष्ट्रात हा कायदा शासनाकडून पारित करून घेण्यात डॉक्टरांसह सध्याचे विद्यमान कार्याध्यक्ष

मा. अविनाश पाटील, संघटनेचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. एन. डी. पाटील सर यांचेही मोलाचे योगदान आहे. कायद्याची अंमलबजावणी अधिक नेटकेपणाने आणि प्रभावीपणे व्हावी यासाठी विद्यमान राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील यांच्या पुढाकाराने पंच्याऐंशी दिवसांची संवाद यात्रा, प्रबोधन मोहिमा, कायद्याच्यासंबंधित घटकांचे उदा. पोलीस, पोलीस पाटील, वकील यांचे प्रशिक्षण केले. न्यायालयीन यंत्रणा यांच्याशी सुसंवाद ठेऊन आणि विपुल प्रमाणात कायद्याच्या संदर्भातील साहित्य प्रसारित केले गेले. अर्थात या सर्व प्रयत्नांना अपेक्षित असे यशही मिळाले आणि हे सांगताना खरोखरच डॉक्टर आणि अविनाश पाटील यांच्या दूरदृष्टीचा अभिमान वाटतो आणि महाराष्ट्राला एक अनमोल ठेवा दिल्याची जाणीव देखील होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ स्थापनेपासून ते आत्तापर्यंत सतत प्रवाही आणि उपक्रमशील राहिली आहे. जात एक अंधश्रद्धा आहे असं सातत्याने सांगणाऱ्या डॉक्टरांनी जात पंचायतीला मूठमाती देण्यासाठी काय काय करता येईल याची सूत्रबद्ध, नियोजनबद्ध रूपरेषा आखायला सुरुवात केली. उठता बसता फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव घेणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये समांतर न्यायव्यवस्था राखणारे,अतिशय निष्ठुर, लोभी जात पंचायती व जातपंच आहेत, हे विदारक वास्तव महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने समाजासमोर आणले. यासाठी निमित्त झाले नाशिकच्या प्रमिला कुंभारकर हिच्या मृत्यूचे. दबक्या आवाजातसुद्धा बोलू न शकणारे स्त्री-पुरुष या अन्यायाविरुद्ध बोलण्यासाठी आता पुढे येऊ लागलेत. जात पंचायती संदर्भात पोलिसात गुन्हे दाखल होऊ लागले. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने, चळवळीने एक पाऊल पुढे टाकायला सुरुवात केली. दरम्यान चळवळीचे छत्र हरपले असताना देखील चळवळीचे कार्यकर्ते बिलकुल सैरभैर झाले नाहीत. स्वतःला सावरले आणि डॉक्टरांनी दिलेल्या दिशेने मा. अविनाश पाटील यांच्या नेतृत्वात जात पंचायतीच्या मनमानी विरोधात लढा सुरू झाला. कृष्णा चांदगुडे (नाशिक) यांची जातपंचायत मूठमाती विभागासाठी कार्यवाह म्हणुन नियुक्ती करण्यात आली. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे बहिष्कृत कुटुंबीयांच्या तक्रारींचा ओघ सुरू झाला. कार्यकर्त्यांनी समाजमनामध्ये एक विश्वास स्थापित केला. आजतागायत सोळा जात पंचायती बरखास्त करण्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी बाजी मारली आहे. यामध्ये संगमनेरच्या ॲड.रंजना गवांदे यांचाही पुढाकार महत्वपूर्ण आहे.

महाराष्ट्रात जात प्रश्नावर काम करणाऱ्या कुठल्याही संघटनेला शक्य झालं नाही ते आव्हान चळवळीच्या कार्यकर्त्यांनी अगदी लीलया तडीस नेलं. कारण खरी निर्भयता आणि नैतिकता कार्यकर्त्यांच्या कृतीमध्ये दिसून येऊ लागली. बेकायदेशीर व अन्यायकारक व्यवस्थेविरोधातील हा संघर्ष सोपा नव्हता. मुरलेल्या जात पंचांचा मुजोरीपणा, जातसमूहावर असलेली प्रचंड दहशत, पोलीस आणि प्रशासनाचा कानाडोळा, यामुळे कार्यकर्त्यांची प्रचंड दमछाक होत होती. परंतु, उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही! असा चळवळीच्या कार्यकर्त्यांचा खाक्या. एका बाजूला जात-पंचायतींच्या विरोधात रस्त्यावरचा संघर्ष तर दुसर्या बाजूला नेतृत्वाच्या मंत्रालयात सतत फेऱ्या, संबंधित प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या भेटीगाठी हे चालू होतं. अखेर

सत्याचा विजय होतो, त्याप्रमाणे १३ एप्रिल २०१६ रोजी जातपंचायतींच्या मनमानीला प्रतिबंध करणारा कायदा महाराष्ट्र सरकारला मंजूर करावा लागला. जनहिताचे कायदे शासनाला मंजूर करायला लावणारी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही एक महाराष्ट्रातील मान्यवर चळवळ आहे. सन २०१३ मधला पहिला कायदा आणि अवघ्या तीन वर्षात सामाजिक बहिष्कार विरोधातील दुसरा कायदा, हे साध्य करणं, ही गोष्ट सोपी नाही. खरंच, अभिमान वाटतो या चळवळीत असण्याचा. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ ही नेहमी एक व्यापक आणि वैश्विक विचार करूनच पुढे जात असते.

चळवळीच्या कामाचा झेंडा एव्हाना देशाबाहेर गेलेला आहे. महाराष्ट्रात शासनाकडून २०१३ साली पारित झालेल्या जादूटोणाविरोधी कायद्याची कुणकुण, महत्त्व आणि परिणाम एव्हाना आफ्रिकेमधील युगांडा मध्ये जाऊन पोहोचले होते. कारण युगांडामध्ये आजही नवजात शिशुला बळी देण्याची प्रथा अस्तित्वात आहे. मात्र यावर प्रतिबंध करणारा कुठलाही कायदा नाही किंवा तसा मसुदाही तिथल्या लोकांना ठाऊक नव्हता. महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील, आंतरराष्ट्रीय विभागाचे कार्यवाह प्रा. डॉ. सुदेश घोडेराव, कायदा विभागाच्या सल्लागार ॲड. मनीषा महाजन या सर्वांनी मिळून युगांडा पार्लमेंटमधील खासदारांशी चर्चा केली. २०२० साली युगांडा पार्लमेंटमध्ये मा. बर्नाड अटीकु या खासदाराच्या महत्त्वपूर्ण भूमिकेमुळे आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या अनमोल मार्गदर्शनामुळे एक महत्त्वपूर्ण कायदा पारित झाला. आंतरराष्ट्रीय स्तरावर असा कायदा पारित करण्यात चळवळीला यश तर आलेच शिवाय कर्नाटक राज्यानेदेखील असा कायदा बनवण्यासाठी आपल्या चळवळीचे मार्गदर्शन घेतले. असा कायदा पारित करण्यासाठी छत्तीसगड व इतरही अनेक राज्येदेखील महां. अंनिसच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत. डॉ दाभोलकर यांनी लावलेल्या या वृक्षाची पाळेमुळे महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून अन्य राज्यांतच नव्हे तर देशाच्या सीमा ओलांडून पसरत आहेत. यावरून डॉ. दाभोलकर यांच्या दूरदृष्टीची कल्पना येते.

या कायद्याच्या मंजुरीसाठी आपल्या कार्यकर्त्यांनी दिलेले योगदान हे नक्कीच लाख मोलाचे आहे. समाज परिवर्तनाची ही वीण, अधिकाधिक घट्ट होत असल्याची ही एक खूण आहे. तसेच परिवर्तनासाठी जात-धर्म, उच्च-नीच, स्वदेश-परदेश, गरीब-श्रीमंत या सगळ्या गोष्टींना संघटना थारा देत नसते, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे आणि सनातनी मंडळीला चपराक देखील. महाराष्ट्राच्या, भारताच्या आणि युगांडाच्या सामाजिक विकासात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे योगदान पाहून खरोखर हरखून जायला होतं. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक शाखा शाखांतील कार्यकर्ते कमी-अधीक प्रमाणात जटानिर्मुलनासारखे अवघड काम हिमतीने करतांना दिसतात, तर कित्येक शाखांच्या कार्यकर्त्यांनी बालविवाह रोखण्यातदेखील धडाडी दाखवलेली आहे.

ही वाटचाल अधिक विस्तारत आहे, याचे आणखी एक उदाहरण म्हणजे ' फ्रीडम फ्रॉम रिलिजन फाऊंडेशन' या अमेरिकेतील संस्थेतर्फे दिला जाणारा 'अविजित रॉय करेज अवॉर्ड २०१९' हा ५००० अमेरिकन डॉलर्सचा पुरस्कार महाराष्ट्र

अंधश्रद्धा निर्मूलन समितीला जाहीर झाला. म्हणजेच चळवळीच्या कालसुसंगत कामाला आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता, जनाधार आणि प्रसिद्धी मिळते, याची ही पोचपावती होय. याचा निश्चितच चळवळीतील समस्त कार्यकर्त्यांना अभिमान वाटत असेल. चळवळीच्या इतिहासात मानाचा तुरा रोवणारी आणखीन एक रोमहर्षक घटना म्हणजे कालिदास थिएटर, मुलुंड, मुंबई येथे नऊ, दहा आणि अकरा ऑगस्ट २०१९ रोजी साजरा केलेला विवेकाचा महोत्सव. राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील आणि सर्व सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिदशकपूर्तीच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. अशी परिषद व्हावी ही डॉ.दाभोलकर यांची इच्छा होती. ही घटना नक्कीच संघटनेला बळ, ऊर्जा आणि उत्साह देणारी होती. मानवतावादाची पताका सतत उंच फडकावत ठेवत आहोत, याचा तो एक सबळ पुरावा होता. डॉक्टर गेले आता सगळं संपले, असा कंठशोष करणाऱ्यांना आणि विरोधकांना ही एक सणसणीत चपराक होती. 'तुम्ही काम करत रहा, लोक तुम्हाला स्वीकारतील,' हा डॉक्टरांचा कानमंत्र पुन्हा एकदा सिद्ध झाला (आता दुसर्यांदा सिध्द करायला अखंड महाराष्ट्रातील असंख्य कार्यकर्त्यानी कंबर कसली आहे व त्यासाठी अखंड महाराष्ट्र, चळवळी बरोबर सर्व परीने सहकार्य करीत आहे, हे रोज सिध्द होत आहे). म्हणूनच त्यावेळी लोकांनी भरभरून आर्थिक योगदान दिले आणि कार्यक्रमांना तीनही दिवस उपस्थिती लावली आणि बौद्धिक मेजवानीचा पुरेपूर आनंद घेतला.

मुंबईसारख्या मायानगरीत सलग तीन दिवस असा भरगच्च कार्यक्रम लावून हॉल मिळवणं, शेकडो कार्यकर्त्यांच्या निवासाची सोय करणं तितकं सोपं नव्हतं. परंतु एक शिलेदार लाखमोलाचा या उक्तीप्रमाणे सुधीर निंबाळकर, ठाणे (निधी संकलन विभागाचे सहकार्यवाह) यांनी या जबाबदारीमध्ये सिंहाचा वाटा उचलला आणि बऱ्याच गोष्टी सुलभ करून ठेवल्या. तीस वर्षे जीव तोडून काम करणारे कार्यकर्ते कुठेही कमी पडले नाहीत. कार्यकर्त्यांच्या कामाची व त्यामुळे होणाऱ्या दृश्य स्वरूपातील परिणामांची नोंद जी महाराष्ट्रातील शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक मानसिक घटकांवरदेखील होत आहे. हे सगळं पाहता ' इतिहास साक्ष आहे आमच्या पराक्रमाचा' असे सहज म्हणावेसे वाटते कारण 'ओसाड माळरान आम्ही फुलवित चाललो'.

चळवळीने महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर आपली पाळेमुळे इतकी भक्कम केलेली आहेत की, आज साहित्य, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील भल्याभल्या दिग्गजांना अंनिसच्या मंचावरून विचार मांडणे हे भूषणावह वाटत आहे आणि तशी ते जाहीर कबुलीही देत आहेत. मात्र या स्थितीला येईपर्यंत अनेकांनी आपले रक्त आटवलेले आहे व डॉ. दाभोलकरांनी बलिदान दिले आहे, हेही विसरता कामा नये. अशी अनेक पृथ्वीमोलाची माणसे आजही आपल्या चळवळीत सक्रिय आहेत आणि हेच खरे चळवळीचे आधार आहेत आणि मायबाप देखील आहेत.


या अखंड आणि प्रवाही बत्तीस वर्षांच्या कारकीर्दीत चळवळीने स्वतःला नेहमीच अपडेट ठेवले व प्रवाही ठेवले. मग इंदिरा गांधी मुक्त विद्यापीठाने एम. ए.च्या विद्यार्थ्यांसाठी सुरु केलेलं फलज्योतिष शास्त्र हा विषय असू दे, किंवा कोरोनामुळे विस्कळीत झालेले जनजीवन असुदे.

संघटनेने आपले उपक्रम अगदी चौफेर सुरु ठेवले व कालसुसंगतदेखील. फलज्योतिष हा विषय अभ्यासक्रमात असू नये, तो कालबाह्य आहे आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या कसोट्यांवर सिद्ध न होणारा, धादांत खोटे विचार पसरवणारा व ठराविक मंडळीचे उखळ पांढरे करणारा आहे. सबब हा अभ्यासक्रम रद्द करावा, असे निवेदन राज्यपाल, प्रधानमंत्री, व मनुष्यबळ विकास खाते (HRD) इत्यादींना, जिल्हाधिकारी मार्फत देण्याचा निर्धार केला व तो पुर्णत्वास देखील नेला.

मानवतावाद काय असतो, हे चळवळीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. मार्च २०२० पासून चालू झालेल्या कोव्हिड १९ च्या संक्रमण काळात. सर्वत्र संकट थैमान घालत असताना, घरोघरी नातेवाईकांमध्ये, त्यांचे बळी जात असताना, कार्यकर्ता सैरभैर न होता अनेकांचे सांत्वन करीत होता. त्यांना आर्थिक आणि भावनिक मदत करत होता; तर दुसऱ्या बाजूला संघटनेतील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. प्रदीप जोशी, जळगाव यांनी ठिकठिकाणी कार्यकर्त्यांसाठी ' मानसमित्र प्रशिक्षण' शिबिरे आयोजित केली. अतिशय सखोल प्रशिक्षणामुळे होणाऱ्या आत्महत्या रोखण्यात चळवळीच्या कार्यकर्त्यांना यश आले. याच्यापेक्षा वेगळा मानवतावाद काय असेल? उदार मानवतावादी मूल्ये जपण्यामध्ये अगदी फाटका कार्यकर्ता ते मान्यवर हे एकाच माळेमध्ये आहेत. म्हणूनच समाज आज चळवळीबाबत म्हणतो की, 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ ही जाती धर्मापलीकडील अतिशय पारदर्शी चळवळ आहे.'

आज ही चळवळ खूप मोठ्या प्रमाणात युवा युवतींना खुणावत आहे. शहीद डॉ. दाभोलकर नेहमी युवांसमोरील भाषणात म्हणायचे, 'समाज जेव्हा घडेल तेव्हा घडेल पण तूर्त तुम्ही तर घडा.' साथी, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धापन दिनानिमित्त मी आपणा सर्वांना एक भावनिक आवाहन करत आहे की, या चळवळीला आपण वेळ द्या, श्रम द्या, पैसा द्या आणि या चळवळीचे घटक बना. हीच खरी शहीद डॉक्टर नरेंद्र दाभोलकरांना आदरांजली.

■ ■ ■



**विनम्र अभिवादन...**

'जादूटोणा विरोधी कायदा' आणि
जात पंचायतीच्या समांतर न्याय व्यवस्थेला आळा घालणारा 'सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा' संमत होण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वाटचालीत भरीव योगदान देणारे

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते,
माजी मंत्री **भाई गणपतराव देशमुख**

यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले.

**महा. अंनिसच्यावतीने विनम्र अभिवादन...**

# वीर वारीकर संत नामदेव



श्यामसुंदर मिरजकर
९४२१२ १२३५२

महाराष्ट्र भूमीत प्रवर्तित झालेला वारकरी संप्रदाय म्हणजे प्रगल्भ बंडखोरीचा नवा आयाम! सगळे संत हे या वारकरी पंथाचे शिल्पकार! समाजाच्या बहिष्कृत जात वर्गातून हे संत पुढे आले. स्वतःच्या अलौकिक प्रज्ञेने त्यांनी नवा आचार-विचार दिला. त्याला वास्तव अनुभवाची जोड दिली. जनसामान्यांची दिशाभूल करणारे, शोषण करणारे कर्मकांड, धार्मिक आचार-विचार त्यांनी नाकारले. वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा, ग्रंथप्रामाण्य, शब्दप्रामाण्य जर श्रमजीवी बहुजनांना अज्ञानी अपात्र ठरवून धर्मक्षेत्राच्या बाहेर ठेवत असेल आणि त्यांना त्रैवर्णिकांची सेवा करा, हाच तुमचा विहित धर्म आहे, असे सांगत असेल, तर ते नाकारणेच हिताचे, असा विचार करून स्वतःचा स्वतंत्र उपासना मार्ग निर्माण करणे श्रेयस्कर, असे या संतांनी मानले. त्यातून श्री विठ्ठल हे दैवत, पंढरी हे क्षेत्र, चंद्रभागा हे तीर्थ यांना प्रमाण मानणारे वारकरी घडले. या वारकरी संप्रदायातील आद्य संत म्हणजे संतश्रेष्ठ नामदेव महाराज होय.

वस्तुतः श्री विठ्ठल हा गोपजनांचा देव. पंढरपूरचा प्राचीन उल्लेख इ.स.५१६ च्या ताम्रपटात पांडूरंगपल्ली असा आढळतो. संत नामदेव व संत ज्ञानदेव या दोघांच्या कुटुंबात पूर्वापार श्री विठ्ठलाची उपासना सुरू असल्याचे दिसते. म्हणजेच श्री विठ्ठल आणि पंढरपूर हे विकसित होत चाललेले तीर्थक्षेत्र होते. संतांनी या दैवताच्या उपासनेचा नवा आचारधर्म घडविला. नव्या मिथक कथा रचल्या. देवाचे भक्तवत्सल रूप घडविले. श्री विठ्ठल आणि पंढरी महात्म्य रचले. वारकऱ्यांचे विधिनिषेध ठरविले. त्यातूनच हळूहळू हा संप्रदाय नावारूपास आला. लोकप्रिय झाला.

कोणत्याही धर्मात विशिष्ट काळात नवा संप्रदाय का सुरू होतो? त्यांचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्या विशिष्ट काळात धर्माला आलेली अवकळा. धर्मामध्ये निर्माण झालेले साचलेपण आणि धर्माच्या नावाखाली माजलेली कर्मकांडांची बजबजपुरी. संत नामदेव-ज्ञानदेवांच्या काळात महाराष्ट्रावर रामदेवराय यादवांचे राज्य होते. ते इ. स. १२७१ ते १३१० असे दीर्घकाळ चालले. त्या काळात हिंदू हा शब्दच प्रचलित नव्हता. तो नंतर मुस्लीम राजवटीत रूढ झाला. तर त्या काळातील महाराष्ट्राचा मुख्य धर्म हा वैदिक धर्म होता. त्याला वर्णाश्रमधर्म, ब्राह्मण धर्म, श्रौतस्मार्त धर्म असेही म्हटले जात होते. वेद वाङ्मयाला प्रमाण मानून यज्ञ, व्रत, उद्यापने यांच्या माध्यमातून धर्माचरण होत होते. याकाळी रामदेवराय यादवांच्या दरबारात प्रधान असणाऱ्या हेमाद्री पंडिताने 'चातुर्वर्गचिंतामणी' हा एका वर्षात करावयाची २००० व्रते सांगणारा व्रतकोश रचला. अशाच प्रकारचा 'कृत्य कल्पतरू' हा ग्रंथ भट्ट लक्ष्मीधराने रचला. वैदिक वर्णाश्रम व्यवस्थेचे नियम कडकपणे पाळले जात होतेच. त्यासाठी 'मनुस्मृति' बरोबरच 'याज्ञवल्क्य स्मृती' आणि विज्ञानेश्वराने लिहिलेला 'मिताक्षरा' हा ग्रंथ आधारभूत होता. त्यामुळेच आश्रमव्यवस्थेचा नियम मोडणाऱ्या ज्ञानदेवांच्या माता-पित्यांना देहदंडाची शिक्षा धर्मसभेने दिली होती आणि या कुटुंबाला ब्राह्मण ज्ञातीतून बहिष्कृत करून त्यांचा दर्जा अस्पृश्यांपेक्षा खालचा 'चांडाळ'

असा ठरविला होता.

या पार्श्वभूमीवर पंढरपुरातून नव्या संप्रदायाची सुरुवात संत नामदेवांनी केली. त्यांनी प्रारंभी देव, जग आणि उपासना या बाबतीत वैदिक ब्राह्मण, शास्त्री, पंडित, पुराणिक, हरिदास यांच्याशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला. परंतु कोणीही त्यांचे समाधान करू शकले नाही. (नामदेव गाथा अभंग क्र. १५८४) त्यानंतर त्यांनी स्वतःची स्वतंत्र उपासना पद्धत निर्माण केली. "माझिया मने मज उपदेश केला। तो मज बिंबला हृदयकमळी।।" असे ते एका अभंगात म्हणतात. विठ्ठल मंदिरात तासनतास बसल्यावर त्यांना भावतंद्री लागत होती. ते विठ्ठलाच्या रूप गुणाचे वर्णन करत होते. त्यातून मराठीत प्रथमच अभंग निर्मिती नामदेवांनी केली. त्याला चाल लावून ते गाऊ लागले. मग सामुदायिक भजन सुरू झाले. नंतर अभंगाचा अर्थ स्पष्ट करणारी वारकरी कीर्तनाची पद्धती त्यांनी सुरू केली. हे करताना त्यांना प्रथम पारंपरिक मान्यताना छेद द्यावा लागला. स्त्रीशूद्रातिशूद्रांना नीच, बुद्धिहीन ठरविणारे वेद, स्मृतिग्रंथ यांना बाजूस सारण्याची भूमिका नामदेवादी संतांनी स्वीकारली. वैदिक परंपरेत महत्त्वाचे मानलेले यज्ञ, मंत्र, दान, सोवळेओवळे यांना नाकारणारी त्यांचे महत्त्व कमी करणारी भूमिका नामदेवांनी घेतली. दुसऱ्या बाजूला नामसंकीर्तनाला वेदांचा दर्जा दिला. वर्णजाती श्रेष्ठत्व नाकारून शुद्धाचरण असणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषाला भक्तीचा अधिकार बहाल केला.

**याज्ञिका सबळ अभिमान**

वैदिक परंपरेने यज्ञाला सर्वश्रेष्ठ उपासना ठरविली आहे. परंतु वारकरी संतांनी यज्ञयागादी क्रिया बाजूस सारून त्यांना नामजपाचा पर्याय दिला आहे. संत नामदेवांनी कृष्णलीला वर्णनाच्या काही अभंगात यज्ञाचे वर्णन केले आहे. (ना.गा. अभंग क्रमांक १३०-१३४) या अभंगातून एक कथाकाव्य निर्मिले आहे. वनात यज्ञ करणारे ब्राह्मण प्रत्यक्ष श्रीकृष्णाला भोजन देत नाहीत. परंतु यज्ञात मात्र तूप, धान्य जाळतात. तेथे गेलेले गोपाळ परस्परांशी बोलू शकत नाहीत. कारण ते शूद्र आहेत. "पडे प्रायश्चित्त बोलू नका कोणी। ऐकू नये कानी शब्द यांचा।।" असे ते परस्परांना म्हणतात. हे ब्राह्मण 'स्वर्ग सुखासाठी करिताती यज्ञ। टाकिती अवदान अग्निमुखे।।' असेही वर्णन नामदेव करतात. गंमत म्हणजे याज्ञिक असल्याचा सबळ अभिमान असणाऱ्या ब्राह्मणांवर त्यांच्या पत्नीही विश्वास ठेवत नाहीत. त्या कृष्णाला भजतात, असे संत नामदेवांनी नमूद केले आहे. म्हणजेच नामदेवांनी रंगविलेला कृष्ण हा यज्ञविरोधी आहे. पुढे गोवर्धन पूजेच्या प्रसंगात हा कृष्ण 'तुझा मोडीला म्या यज्ञ।" असे इंद्राला उद्देशून म्हणताना दिसून येतो. संत नामदेवांचे याज्ञिक ब्राह्मणांविषयीचे असणारे अनुभवसिद्ध मत त्यांच्या अभंगातून आले आहे. ते म्हणतात,

'यज्ञादिक कर्म करुनि ब्राह्मण। दंभ आचरण दावी लोका।

लोकांसी दाविती मीच कर्मनिष्ठ। अभिमान खोटा वागविती। (१७९२)

या अभिमानी याज्ञिकांना दंभ सोडून नामस्मरणाने वैष्णव होण्याचे आवाहनही नामदेव करतात. कारण 'यजन याजनें जीवाते दंडताती सदा' (१३६१) असा नामदेवांचा अनुभव आहे. म्हणूनच ते म्हणतात,

न लगे करावे यज्ञयाग। न लगे आणिक मंत्रलाग।

एक सेविलिया पांडुरंग। अनंत तीर्थे घडतील।।

(१९५१)

दुर्दुराचे परी जिव्हा वटवटी।

वैदिक परंपरेत मंत्रपठनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण वैदिकांच्या

मते, सर्व जग हे देवांच्या अधीन आहे. देव मंत्राच्या अधीन आहेत. मंत्र ब्राह्मणांच्या अधीन आहेत. म्हणून ब्राह्मण हेच माझे दैवत आहे, असे इतर लोकांनी म्हणावे. परंतु वारकरी संत याही गोष्टीला नाकारतात. वारकरी संतांनी मंत्र ज्या भाषेत आहेत, ती संस्कृत भाषाच नाकारली आणि स्वतःचा भक्तिविचार लोकभाषेत म्हणजेच मराठीत सांगितला. इतकेच नव्हे, तर सर्वजनसुलभ असा 'रामकृष्णहरी' हा ओंकार रहित नामघोष मंत्राला पर्याय म्हणून दिला. बऱ्याच वेळेला मंत्रोच्चार करणाऱ्या पुरोहिताला आपण जे म्हणतो आहोत, त्याचा अर्थही कळत नाही. त्यामुळे ते बोलणे व्यर्थ असते, असे नामदेव म्हणतात. म्हणूनच त्यांनी या मंत्र पठनाची तुलना बेडकाच्या डराव डराव ओरडण्याशी केली आहे. "दुर्दुराचे परी जिव्हा वटवटी। सांडोनि हरिगोष्टी आणिक सांगे।।" (१६८३) असे त्यांचे मत आहे.

'चावळी वटवट बोलणे बासर।

हे तंव अवघे चार मर्कटांचे।। (३१८)

असे त्यांचे प्रतिपादन आहे. कारण 'मंत्रतंत्र दीक्षा सांगतील लक्ष। परी राम प्रत्यक्ष न करी केव्हा।।' असा त्यांचा अनुभव आहे. म्हणूनच

"नामा परता मंत्र नाही वो आणिक।

सांगती ते मूर्ख ज्ञान हीन।।' (३१८)

असा त्यांचा उपदेश आहे. म्हणजेच पावित्र्याचे अवडंबर माजवून म्हटल्या गेलेल्या संस्कृत मंत्रांपेक्षा आणि मंत्राचा अधिकार असणाऱ्या द्विजांपेक्षा आर्त भक्तिभावाने केलेले नामस्मरण श्रेष्ठ, असे नामदेव म्हणतात.

### काय वाणू गुण भिकारपणाची

वैदिक परंपरेनुसार दान स्वीकारणे हा ब्राह्मणांचा विशेषाधिकार आहे आणि त्यांना दान देणे हे इतरांचे विशेष कर्तव्य आहे. त्यामुळेच आजही सगळ्या मंदिरातील पुरोहित दक्षिणेचा आग्रह धरताना दिसतात. प्रत्येक व्रताच्या उद्यापनाच्या वेळी विविध वस्तू दान म्हणून ब्राह्मणाला द्याव्यात, असे म्हटले जाते. वेगवेगळे पर्वकाळ, ग्रहणकाळ आणि पिडाकाळ ही तर दान दक्षिणा उपटण्याची पर्वणीच होय. खरे तर इथूनच भाविकांचे शोषण सुरू होते. जर सर्व भक्तांनी मंदिरांना आणि भट पुरोहितांना दान देणे बंद केले, तर खूप मोठ्या अंधश्रद्धा संपुष्टात येतील. देवाच्या नावावर चालणारी फसवणूक संपेल. या संदर्भात संत नामदेवांची भूमिका काय होती, हे आपण समजून घेऊ. एका अभंगात संत नामदेव म्हणतात,

काय आम्हापाशी आहे धन वित्त।

दान तें उचित देऊ काय।।

देतां घेतां आम्हा पुरे पुरे झाले।

संगती त्यागिले भिवोनिया।

काय वाणूं गुण भिकारपणाची।

होसी पंढरीची नामनौका।

नामा म्हणे पुढें दाखवी मारग।

आम्ही तुज मागें येऊ सुखे।। (१६२९)

या अभंगाचा सरळ भावार्थ असा आहे की, आमच्या जवळ कितीसे धन-वित्त आहे? त्यामुळे उचित दान आम्ही कसे देणार? असे दान देऊन देऊन आम्हाला पुरे पुरे झाले आहे. त्यामुळे घाबरून आम्ही अशांची संगतच सोडली आहे. त्यांच्या भिकारपणाचे गुण किती वर्णन करू! त्यामुळेच आम्ही पंढरीची नामरूपी नौका या भवसंकटातून तरून जाण्यासाठी धरली आहे. ती पुढे मार्ग दाखवेल आणि आम्ही तिच्या मागे सुखाने येऊ.

'पद तीर्थ दान हे सर्व कुवाडें।' असेच नामदेवांचे मत आहे. कारण जेव्हा कोणी दानधर्म करत असेल तेव्हा 'धावतात तेव्हा विप्र सगळिक। एकावर एक पडताती!' असेही त्यांचे निरीक्षण आहे. त्यामुळेच त्यांनी आपल्या वारकरी बांधवांना,

कीर्तन-प्रवचनकारांना असा उपदेश केला आहे की,

नाम विक्रयो न करावा। दान प्रतिग्रहो न घ्यावा।
कष्टें करुनी मेळवावा। तोची घास आपुला।।

आद्य वारकरी कीर्तनकार संतश्रेष्ठ नामदेवांनी सांगितलेला हा उपदेश आजचे बुवा, महाराज अनुसरतील काय? खरेतर नामदेवांचा भक्तिमार्ग हा डोळस श्रद्धेतून आलेला आहे. या भक्तिमार्गात श्री विठ्ठल हा माय-बाप, सखा आहे. या विठ्ठलाला भेटण्यासाठी कोणा मध्यस्थाची, कोणत्याही विशेष मंत्राची, दान-दक्षिणेची गरज नाही. सासरी नांदणारी लेक अनिवार ओढीने माहेरी जाते, तसेच या वारकऱ्यांचे पंढरीकडे धावणे आहे. इथे सोवळे-ओवळे नाही, योग तप नाही, शरीराला कष्ट देणे नाही. आहे ती फक्त भावसमृद्धता! मन निर्मळ करणे, आचरण शुद्ध करणे आणि भक्ताच्या भेटीसाठी आसुसलेल्या विठ्ठलाला कडकडून आलिंगन देणे. इतकेच करायचे आहे. म्हणूनच 'ब्राह्मण हो शूद्र वैश्य नारी नर। सर्वांशी आधार नाम सत्य।।' असे म्हणत नामदेव सर्वांना साद घालत आहेत. एक संयमित बंडखोरी करत आहेत. पंढरपूरपासून पंजाबपर्यंत सर्वत्र एक नवा आचारधर्म देत आहेत. हे करताना त्यांनाही त्यांच्या काळात त्रास, अपमान आणि अवहेलनेला सामोरे जावे लागले. तरीही या थोर राष्ट्रीय संताचा प्रभाव गेली साडेसातशे वर्षे भारतवर्षावर अखंडितपणे वाढतोच आहे.

■ ■ ■



# सर्प : मित्र मानवाचा



उल्हास ठाकूर
९८२१२ ६०१४५

श्रावण शुध्द पंचमीला, नागपंचमी हा सण भारतभर साजरा केला जातो. वर्षभरातल्या सण उत्सवांच्या निमित्ताने गाय, बैल, कोकिळा इत्यादि प्राणी/पक्षी यांचे पूजन केलं जाते, त्याचप्रमाणे नागपंचमीच्या निमित्ताने नागांचं पूजन करणे ही फार प्राचीन परंपरा आहे.

सापांना कोण ओळखत नाही? भीती, घृणा, मृत्यू आणि पूजा या चार शब्दांची सांगड म्हणजेच साप. भीतीची जागा नागपूजेने घेतली, त्यामुळे सापाची मूर्ती करून त्याची पूजा प्रचलित झाली. त्याचबरोबर आजी आजोबांनी सांगितलेल्या अद्भुत, रम्य गोष्टींनी आपल्या मनाचा ताबा घेतला. वास्तविक त्या गोष्टी म्हणजे काल्पनिक घटना, ज्यात अतिशयोक्ती होती. पूर्व पारंपारिक घर करून बसलेल्या गोष्टींना सहज स्वीकारुनही, पूजेचा साप तुमचा शत्रु ठरतो आणि दिसताच काठ्या, दगड वगैरे घेवून आपण मारायला धावतो.

जगात सापांच्या अडीच हजारांवर जाती आढळतात. भारतात यापैकी फक्त तीनशे पंचवीस जाती सापडतात. यापैकी पंचावन्न जातीचे साप 'विषारी' असतात. परंतु यातील मनुष्यवस्तीच्या आसपास आढळणार्या, चारच प्रमुख विषारी सापांचे विष माणसाला अपायकारक ठरू शकते. या चार जाती म्हणजे नाग, फुरसे, घोणस, आणि मण्यार. याचाच अर्थ उरलेले सर्व साप निरूपद्रवी आहेत. सापांच्या जातींमध्ये लांबी व आकारमान यात खूपच विविधता आढळते. सर्वसाधारणपणे सांगायचे तर, नर सापांची शेपूट त्यांच्या एकूण लांबीच्या मानाने मोठी असते. मात्र मादी सापांची लांबी नर सापांहून अधिक असली तरी त्यांचे शेपूट आखुड असते. आपल्या देशात सापडणारा सर्वांत लहान बिनविषारी साप म्हणजे 'वाळा'. याची लांबी केवळ ५-६ इंचांपर्यंत असते आणि सर्वांत लांब बिनविषारी साप म्हणजे, ' अजगर'. आपल्या देशात सापडणारा सर्वांत लांब विषारी साप म्हणजे ' नागराज'. अठरा फुटांपर्यंत लांबीचे नागराज मिळाल्याच्या नोंदी सापडतात. सर्वांत लहान विषारी साप म्हणजे 'फुरसे` याची लांबी दीड फुटांपर्यत असते.

मनुष्याप्रमाणे सापांनासुद्धा इंद्रिये असतात. ही सगळी त्याच्या लांबलचक शरीरात एकामागोमाग बसवलेली असतात. सापाचे विषारी दात, ठराविक दिवसानंतर पडतात. मात्र एकदा दात पडले म्हणजे साप कायमचा निरूपद्रवी होतो असे नाही. काही दिवसात त्याला नवीन दात येतात. विषारी सापांमध्ये, ही क्रिया अखंड चालूच असते. आपल्याला ज्याप्रमाणे पापण्या असतात. त्याप्रमाणे सापाला नसतात. याऐवजी त्यांच्या डोळयांवर, संपूर्ण डोळा झाकेल असे पारदर्शक आवरण असते. तसेच त्यांना इतर प्राण्यांप्रमाणे बाहय कर्ण नसतात. सापाना श्रवणसंस्थाच नसल्याने साप हवेतून निर्माण होणारे आवाज ऐकू शकत नाहीत. मात्र जमिनीची कंपने (उदा. माणसाच्या पावलांचा आवाज) सापांना पन्नास फुटांवरूनही जाणवतात. सापाची वैशिष्ट्यपूर्ण जीभ मात्र त्याला खूपच उपयोगी पडते. वासाच्या बाबतीत सापाची जिभ अत्यंत संवेदनक्षम असते. तिच्या पुढच्या टोकाचे दोन भाग झालेले असतात.

नाक जे गंधकण गोळा करू शकत नाही, ते जीभ गोळा करून तोंडामध्ये विशिष्ट गंधवाहक ग्रंथीमध्ये (जॅकॉब्सन्स ऑर्गन) जमा करते. याप्रकारे सापाला गंधज्ञान होते. तसेच सापाच्या तोंडाच्या, वरच्या जबड्याला असलेल्या एका खाचेमुळे तोंड न उघडताही त्याची जीभ बाहेर येवू शकते.

सापाला 'घर्मग्रंथी' नसतात. शरीरातील निरूपयोगी द्रव्ये बाहेर टाकण्याचा एक मार्ग म्हणजे घाम! त्याला घाम येत नसल्याने ती द्रव्ये कातीच्या वाटे बाहेर टाकावी लागतात. तसेच वाढत्या वयाबरोबरही त्याला कात टाकावी लागते. लहान (बालसर्प) साप पंधरा दिवसात कात टाकतो. नंतर वाढत्या वयाबरोबर कात टाकण्याचा काल वाढत जातो. कित्येक वेळा वय, आरोग्य व हवामान यावरही कात टाकण्याचे प्रमाण व काल कमी जास्त असतो. कात व्यवस्थित टाकली न गेल्यामुळे बरेचदा साप मरतातही. कात टाकल्यानंतर साप तरतरीत, सुंदर व सतेज दिसतो.

साप थंड रक्ताचा प्राणी आहे. त्याच्या शरीराचे तापमान भोवतालच्या वातावरणावर अवलंबून असते. प्रत्येक सापाची तापमान सहन करण्याची शक्ती वेगवेगळी असते. वातावरणातील तापमान त्याला ज्यावेळी असह्य होते त्यावेळी तो गारव्यासाठी सावलीत, बिळात, झाडा-झुडपात, पाण्यात जाऊन राहतो. जमिनीवरील साप चांगले पोहू शकतात आणि झाडांवर चढू शकतात. गोडया पाण्यातील सर्व साप बिनविषारी असून समुद्रातील सर्व साप मात्र विषारी आहेत. परंतु समुद्र सापांना जमिनीवर सरपटता येत नाही. थोडयाच वेळात ते तडफडून मरतात. गुळगुळीत जागेपेक्षा खडबडीत जागेवर सापांच्या हालचाली जलद होतात. साप मांसाहारी असून तो उंदीर, बेडूक, पाली, सरडे, पक्षी, किटक, मासे हे त्यांचे अन्न आहे. आपली शिकार ते जिवंत पकडतात व संपूर्ण गिळतात. काही साप जसे भुजंग (King Cobra) हे इतर साप खाऊन राहतात. अजगर मोठया प्राण्यांवर आपली उपजिवीका चालवतात. उदा. कोंबडया, ससे, डुक्कर, बकरी वगैरे.

सापांना हात-पाय नाहीत, त्यामुळे ते त्यांची शिकार तोंडाने पकडतात. विषारी साप आपल्या विषारी दाताने विष भक्षाच्या शरीरात सोडतात. ते भक्ष मेल्यानंतर किंवा गलितगात्र झाल्यानंतर खाण्यास सुरूवात करतात. बिनविषारी साप, आपल्या शरीराने त्याला लपेटून, आवळून, गुदमरून टाकतात आणि भक्ष मेल्यानंतर खातात. त्यांची कातडी बरीच ताणली जाते. सापाचा जबडा स्नायूंनी बांधलेला असल्यामुळे, त्यांना आपल्या शरीरापेक्षा मोठे भक्ष सहज गिळता येते. त्यांचे दात आतल्या बाजूला वळलेले असतात. त्यामुळे तोंडातून शिकार पळून जावू शकत नाही. सापांना एकाकी जीवन जगणे आवडते. परंतु मीलनाच्या काळात ते एकत्र येतात. मिलन काळात एक दुसऱ्यांना आकर्षून घेण्यासाठी त्यांच्या अंगातून काही स्त्राव येत असतो.

सापाची मादी बहूत करून अंडी घालते. परंतु घोणस, हरणटोळ, समुद्रसाप इ. साप हे पिल्लांना जन्म देतात. अंडी ही सहसा खाच खळग्यात घातली जातात. अंड्यांचा रंग पांढूरका असून ती मऊ, लांबट व कातडयासारखी असतात. बालसर्प अंड्याचे कवच एका खास दाताने (Egg Tooth) फोडुन बाहेर येतो आणि थोड्याच वेळात तो दात पडून जातो. सापांमध्ये बिळ करून राहणारे, जमिनीवर राहणारे, झाडावर राहणारे, गोडया पाण्यात राहणारे असे मुख्य प्रकार आहेत. साप मारणार्यास याची कल्पनाही नसते.

- साप हा निरूपद्रवी, असहाय असा प्राणी आहे.
- कुठलाही साप विनाकारण, कुणावरही हल्ला करत नाही. साप डूख धरत नाही आणि त्यांना कानही नसतात.
- सापाचे विष मंत्रतंत्राने उतरत नाही.

- भीतीदायक वाटणारा प्रत्येक साप, माणूस समोर आल्यावर पळून जाण्याचा प्रयत्न करतो. ६८ टक्के साप बिनविषारी असतात.
- उंदीर, घुशींच्या संख्येवर ताबा ठेवून ते मानवावर उपकार करतात. साप मारणे हा कायद्याने गुन्हा आहे.

**सर्पदंश टाळण्यासाठीच्या उपाययोजना**

- आपल्या घराबाहेरील भिंती किंवा कुंपणाच्या भिंतीला भोकं पडली असतील किंवा तडे गेले असतील तर त्वरीत बुजवावेत.
- घराजवळ पालापाचोळा, केरकचरा साठू देवू नये. खिडक्या, दारे किंवा घरास लागून वेल किंवा फांद्या असल्यास त्या दुर करा.
- कोठीची खोली तर उंदरांचे नंदनवन आणि उंदीर हे सापांचे आवडते खाद्य. तरी कोठीच्या खोलीत उंदीर जाणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- रात्री बाहेर फिरतांना टॉर्चचा वापर करावा.
- सरपण व गोवर्या घरालगत न ठेवता काही अंतरावर उंचावर ठेवाव्यात.
- उथळ पाण्यात सापाचा वावर असल्याने गुरे, कपडे, भांडी धुतांना काळजीपूर्वक जागेची पाहणी करावी.
- आपण आणि साप समोरासमोर आल्यास घाबरून न जाता स्तब्ध उभे राहून आपल्या जवळील रूमाल अथवा आजूबाजूच्या झाडांचे पान तोंडावर फेकल्यास साप त्या वस्तुकडे आकर्षिला जातो व तेवढया वेळात तुम्ही निघून जावू शकता.

**सर्पदंशावर उपचार**

भारतात दरवर्षी सुमारे अडीच लाख लोकांना सर्पदंश होतात. साधारणपणे सत्तर हजार लोक सर्पदंशाने मृत्यूमुखी पडतात. महाराष्ट्रात दरवर्षी किमान पंधरा हजार लोकांना सर्पदंश होतात. सुमारे दोन ते तीन हजार लोक सर्पदंशाने मृत्युमुखी पडतात. विषारी सापाचा दंश झाल्यास; योग्य तो वैद्यकीय उपचार वेळेत न करता, मांत्रिक, भगत यांचा आसरा घेत, मंत्रतंत्र, झाडपाल्याचे औषध इ. अशास्त्रीय उपचार केल्यामुळे माणूस दगावतो.

**सर्पदंश झाल्यास...**

- सर्पदंश झालेल्या व्यक्तीचा भीतीने तोल जातो. अशा व्यक्तीस उबदार ठेवावे व मानसिक आधार देणे. सर्पदंश झालेल्या व्यक्तीस, श्रम (बोलणे, चालणे) न होवू देता त्यास पडून राहण्यास सांगावे.
- सर्पदंश झालेला अवयव स्थिर करून हृदयाच्या पातळीपेक्षा खालच्या पातळीवर ठेवावे.
- केवळ नाग किवा मण्यार चावले असल्यास आवळपट्टी बांधावी. इतर सापांचा दंश झाला असेल तर मात्र आवळपट्टीचा वापर करू नये. आवळपट्टीसाठी रूमाल किंवा दोरी वापरावी. आवळपट्टी करकचून न बांधता अवयव व पट्टी यामध्ये, एक बोटभर अंतर ठेवून बांधावी. सरकारी दवाखान्यापर्यंत नेतांना आवळपट्टी प्रत्येक दहा मिनीटानंतर एक मिनीट सैल करून परत बांधावी.
- सर्पदंश झालेल्या व्यक्तीस लवकरात लवकर जवळच्या सरकारी रुग्णालयात घेऊन जाणे.
- चावलेला साप मारून दवाखान्यात नेवू नका. कारण बऱ्याच डॉक्टरांना सापांची ओळख नसते. सर्पदंशावर 'प्रति सर्पविष`(Anti-Venom) हे एकमेव औषध आहे.

सापाबद्दल शास्त्रीय माहितीचा अभाव, अंधश्रद्धा, भीती, यामुळे आपण त्यांची हत्या करून निसर्ग व्यवस्थेतील या उपयुक्त प्राण्यांची संख्या कमी करत आहोत. येत्या नागपंचमीला जीवंत नागाची पूजा करणार नाही व साप दिसल्यावर तो मारणार नाही, असा संकल्प आपण सर्वांनी करू या. लक्षात ठेवा, 'साप हे शत्रु नव्हेत, तर मित्र आहेत.'

■ ■ ■

# संघटित पुरोगामित्त्व वृध्दिंगत करू या !



अविनाश पाटील
राज्य कार्याध्यक्ष, महा. अंनिस

ऑगस्ट महिना म्हटला की, आनंद आणि दु:ख या दोन्ही भावनांना अधिक तीव्रतेने सामोरे जावे लागते. ९ ऑगस्ट हा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा वर्धापनदिन आहे, तर २० ऑगस्ट हा अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीच्या संघटित कामाचे अध्वर्यू शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा स्मृतिदिन आहे. महाराष्ट्र अंनिस ३२ वर्षांची होत आहे, आणि डॉक्टरांच्या आठव्या स्मृतिदिनाला दु:खद भावनांनी, पण तितक्याच जोरदारपणे सामोरे जावे लागत आहे. डॉक्टरांच्या खांद्याला खांदा लावून संघटनेचे कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी काम केले, संघटित कामातून संघटना उभी राहिली. त्याच संघटनेच्या एका नेत्याचा झालेला खून, ही कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या मनाला झालेली भळभळती जखम ऑगस्ट महिन्यात अधिक ताजी होते. धर्मांध संघटनांशी संबंधित असलेल्या ६ ते ७ आरोपींना खूनप्रकरणी अटक झालेली आहे. मात्र अद्याप तपास यंत्रणा ह्या खुनाच्या सुत्रधारांपर्यंत पोहोचू शकलेल्या नाही आणि एकूणच तपासात म्हणावी तशी आशादायक प्रगतीदेखील झालेली नाही. खुन्यांचा तपास लागावा म्हणून तपास यंत्रणेवर दाबव आणण्यासाठी संघटना म्हणून हरतऱ्हेचे प्रयत्न आपण केले. गल्ली ते दिल्लीपर्यन्त भेटीगाठी घेण्यापासून ते आंदोलनाचे मार्ग हाताळले. लोकप्रक्षोभ उभा राहिला. तपासात राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे. तपास यंत्रणा सुस्त आहेत. नेते मस्त आहेत आणि न्यायालये व्यस्त आहेत. एक मात्र खरे आहे की, डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे, प्रा. डॉ एम एम कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या खूनांमध्ये समान धागा असल्याचे आणि या खुनांशी संबंधित असलेले मारेकरी; कोणत्या धर्मांध संघटनेशी संबंधित आहेत, हे लोकांच्या मनात स्पष्ट झालेले आहे.

गेली आठ वर्षे कार्यकर्ते, पदाधिकारी, समविचारी कार्यकर्ते, हितचिंतक, सजग नागरिक विवेकाने आणि संघटितपणे महाराष्ट्र अंनिसचे कार्य पुढे घेऊन जात आहेत. डॉक्टरांच्या खुनानंतर संघटना कशी चालणार असा सवाल अनेकांकडून उपस्थित होत होता. परंतु संघटनांतर्गत रचनेत २००९ पासूनच आमुलाग्र बदल करून पदे आणि कामाच्या जबाबदाऱ्या निश्चित करून संघटितपणे काम सुरु होते. त्यामुळे डॉक्टरांच्या खुनानंतर संघटनेच्या कामाची घडी विस्कटली नाही, तर मनात वेदना घेऊन कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी अधिक तडफेने काम केले. संघटनेच्या कामाचा विस्तार झाला, नियमित उपक्रमांत खंड पडला नाही. जादूटोणाविरोधी व सामाजिक बहिष्कारविरोधी कायदे मंजूर करून घेण्यात संघटनेला यश मिळाले. या कायद्यान्वये कार्यकर्त्यांनी शेकडो गुन्हे दाखल करून घेतले आणि लोकांची शोषणातून मुक्तता केली. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरदेखील अंनिसच्या कामाची दखल घेतली गेली. अनेकांनी त्यांच्या राज्यात-देशात कामासाठी अंनिसची मदत मागितली.

डॉक्टरांचा स्मृतिदिन हा २०१८ पासून ऑल इंडिया सायन्स पिपल्स नेटवर्क (AIPSN) व महाराष्ट्र अंनिस यांच्यासह देशातील विविध विज्ञानवादी संस्था-संघटनांच्या सहभागाने 'राष्ट्रीय वैज्ञानिक दृष्टिकोन दिन' आयोजित करण्यास सुरुवात केली. खरे तर आपल्या संघटनेच्या पंचसूत्रीतील दुसरे सूत्र असे आहे की, 'वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विचार, प्रसार, प्रचार आणि अंगिकार करणे' आणि या सूत्राधारे आपण ३२ वर्षे काम करीत आहोतच.

या पुढील काळात संघटितपणे काम

करताना समितीच्या पंचसूत्रीसह संविधानिक मूल्ये, त्याबद्दलचे दृष्टिकोन जनमानसात रुजविण्याची अधिक गरज आहे. आपण केवळ सेवा देणारे संघटनात्मक काम करत नाही, तर आपले काम हे दृष्टिकोन देणारे आहे. व्यक्तीपासून ते समष्टीपर्यंतच्या परिवर्तनामध्ये दृष्टिकोन हा महत्वाचा घटक मानला जातो. समाजशास्त्रीय अभ्यासांपासून ते अलीकडच्या मानसशास्त्रीय अभ्यासांमध्ये दृष्टिकोन विकास हा महत्वाचा भाग मानलेला आहे. त्यामुळे जनमानसाचा दृष्टिकोन अधिक विवेकी, प्रगल्भ होईल, यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे.

भारतीय स्वातंत्र्याचा यंदा १५ ऑगस्टला अमृतमहोत्सवी वर्धापनदिन आपण साजरा करत आहोत. पण आपण महाराष्ट्र अंनिस म्हणून ठोस भूमिका घेऊन यानिमित्ताने काम करण्याची गरज आहे. 'स्वातंत्र्य' हे जे भारतीय स्वातंत्र्याशी जोडलेले आणि संविधानात नमूद केलेले मूल्ये आहे, त्यासंबंधी जनमानसात काम करू या. स्वातंत्र्य या मूल्याची-तत्वाची स्पष्टता करून देण्यापासून ते त्या संबंधीचा दृष्टिकोन रुजविण्यासाठी वर्षभर मोहीम राबविली पाहिजे. या मोहिमेत या मूल्याचे महत्व, जीव सृष्टीच्या जीवनातील या मूल्याची आवश्यकता, या मूल्याचे आजवरचे मानवी विकासातील योगदान, त्याची फलश्रुती, आजच्या परिप्रेक्षात या मूल्याची होत असणारी गळचेपी आणि कालसुसंगत गरज अधोरेखित केली पाहिजे. हे सर्व करत असताना स्वातंत्र्य या मूल्याकडे एकटे पाहून चालणार नाही, तर भारतीय राज्यघटनेला अभिप्रेत असणारे 'स्वातंत्र्य, समता, बंधुता' या गोल्डन ट्री अँगलकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की, 'स्वातंत्र्य, समता व बंधुता या उदात्त जीवनमूल्यांची फारकत करता कामा नये. समता नसेल, तर मूठभर लोक इतरांवर सत्ता गाजवतील. समता असेल व स्वातंत्र्य नसेल, तर व्यक्तीची उपक्रमशीलता नष्ट होईल; आणि बंधुभाव नसेल, तर दुहीमुळे स्वातंत्र्य व समता धोक्यात येईल.' डॉ. बाबासाहेबांचा हा इशारा लक्षात घेऊन काम करावे लागणार आहे.

महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांमधून पदाधिकाऱ्यांची निवड ही लोकशाही पद्धतीने होते. सर्वांच्या सहमतीने निर्णय होऊन काम पुढे जात राहिले आहे. अलीकडच्या काही वर्षांपासून तर अधिक विकेंद्रित, पण संघटित पद्धतीने काम सुरू आहे. संघटीतपणे काम करून ते पुढे नेणे हा संघटित पुरोगामीत्वाचा भाग आहे. केंद्रात पद्धतीने केलेले पुरोगामी काम व्यक्तिकेंद्री राहते आणि त्यातून भक्तिमार्ग तयार होण्याचा धोका आजवर कधी खंडित झालेला नाही. त्यामुळे केंद्रित पद्धतीने केलेले पुरोगामी काम हे फार काळ ठसा उमटू शकत नाही. त्यामुळे संघटितपणे काम करून त्याचा वस्तुपाठ निर्माण करण्याची गरज आहे. यापुढे लोकशाहीवादी, संघटित, विकेंद्रित पद्धत आणि सहमतीने धोरण ही कार्यपद्धती कायम ठेवून ती वर्धिष्णू आणि वृद्धिंगत करू या. संघटनेच्या पंचसूत्रीतील पाचव्या सूत्रानुसार पुढील काळात व्यापक परिवर्तनवादी कामाशी आपली नाळ अधिक घट्ट करू या. कामातून विवेकाचा आवाज बुलंद करू या. यातूनच मानवाच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग सुकर होणार आहे.

सतत संवाद करत राहू या. संवादी राहू या. महापुराच्या आपत्तीचा सामना करण्याचे बळ लोकांमध्ये निर्माण व्हावे. महाराष्ट्र अंनिसच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त 'लढेंगे-जितेंगे' असा आशावाद व्यक्त करतो. भारताच्या अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या सदिच्छा देतो आणि डॉक्टरांच्या स्मृतिदिनानिमित्त दु:ख भावना मनात असल्या तरी त्यांना अभिवादन करून संघटित काम वृद्धिंगत करण्याचे सर्वांना अश्वाशित करतो.

फुले शाहू आंबडेकर, आम्ही सारे दाभोलकर !

जय भारत !

(लेखक, महाराष्ट्र अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष आहेत)

■ ■ ■

# प्रकाशनाच्या क्षेत्रातले नवे पाऊल



योगेश कुदळे
९८५०१ २२७१३

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने नव्याने सुरू केलेल्या 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या ई-मासिकाच्या पहिल्या अंकाचे ऑनलाईन प्रकाशन ११ जुलै २०२१ रोजी झाले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. यशवंत मनोहर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र अंनिसचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील होते. यावेळी मासिकाचे संपादक डॉ. नितीन शिंदे, कार्यकारी संपादक उत्तम जोगदंड यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. दीपक बाविस्कर तर डॉ. मांतेश हिरेमठ यांनी सुत्रसंचालन केले. राजेंद्र फेगडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन व्यवस्थापकीय संपादक अवधूत कांबळे यांनी केले. ऑनलाईन कार्यक्रमाला झूम अँप, फेसबुक आदी ठिकाणी पाचशेपेक्षा अधिक कार्यकर्ते, हितचिंतक, नागरिक यांनी हजेरी लावली होती.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका या मासिकाचे सहसंपादक एकनाथ पाटील, संपादन समिती सदस्य श्यामसुंदर मिरजकर, तुकाराम शिंदे, सल्लागार मंडळातील सदस्य प्रदीप पाटकर, संध्या नरे पवार, कायदेशीर सल्लागार अँड. गोविंद पाटील, मुखपृष्ठकार गणेश पोतदार त्यांना साहाय्य करणारे त्र्यंबकेश्वर मिरजकर यांनी प्रयत्नपूर्वक अत्यंत आकर्षक, वाचनीय आणि दर्जेदार ९४ पानी अंक तयार केला. मासिकामध्ये हरिदास तम्मेवार, प्रमोद गंगणमाले, सुशीला मुंडे, रंजना गवांदे, दर्शना पवार, कृष्णा चांदगुडे, नंदकिशोर तळाशीकर, माधव बावगे, ठकसेन गोराणे, मच्छिन्द्रनाथ मुंडे, सुयश तोष्णीवाल, सुदेश घोडेवार, सुरेखा भापकर, विनायक सावळे, विशाल विमल, कल्पना बोंबे, संदेश बालगुडे, एकनाथ पाटील आदींनी लेखन केले आहे. अंक प्रकाशित झाल्यावर संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक, सजग नागरिक, वाचक यांनी मोठ्या प्रमाणात अंकाची ई-कॉपी फॉरवर्ड केली. त्या व्यतिरिक्त अनेकांनी ई-कॉपीची मागणी केली. अंक वाचून अनेकांनी उत्स्फूर्त बोलक्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. छापील अंकाचे वाचक वर्गणीदार होण्यासाठी अनेकांनी विचारणा केली आहे. तसेच अनेकांनी अंकासाठी देणगी देखील दिली आहे.

**वाचकांच्या प्रतिक्रीया**

- आज 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका,' या मुखपत्राचे प्रकाशन करत आपण पुन्हा नव्याने एक पाऊल टाकत आहोत. आपल्या मुखपत्राचा अधिक वेगाने प्रसार होण्यासाठी वर्गणीदार आणि जाहिरातदार वाढवावेत हीच सदिच्छा

  • प्रभाकर नाईक, रायगड

- 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेने' संघटनेला ऊर्जा दिली, ताकद दिली, बळ दिलं. निर्धाराने सर्वार्थाने लवकरच उभे राहू या. आम्ही काय करायचं, सांगा फक्त !

  • विनायक सावळे, शहादा

- 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका', वाचायला घेतलं आहे. वाचून पूर्ण झालं नाही. जेवढं वाचलं आहे ते अत्यंत योग्य आणि मुद्देसूद मांडणी केलेलं असल्याने प्रभावी झालेलं आहे. शिंदे सरांचा, 'एक उपवास संकष्टीचा' हा लेख वाचला आणि

तो सद्यस्थितीत चपखल लागू होतो. डोळ्यात अंजन घालणारे प्रभावी लेख असल्या कारणाने ही 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' खऱ्या अर्थाने क्रांती घडविण्यास कारण ठरेल यात शंका नाही.

- विनायक पाटील, कामेरी

- ' अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या' प्रकाशन समारंभाच्याकार्यक्रमाने गेले वर्षभर आलेली उदासीनता, फ्रस्ट्रेशन पळून गेलं आणि नवा उत्साह आला.

- सुशीला मुंडे, डोंबिवली

- 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेच्या' निर्मितीसाठी झटलेल्या सगळ्यांना, मनापासून सलाम. आजचा प्रकाशनाचा सोहळा पार पडत असताना अनेकांना गेल्या काही वर्षातील जे सोसलेले, झेललेले ताण, वेदना आहेत त्या आठवत असतील अथवा नसतीलही. पण नवीन मुखपत्र उभं राहताना प्रचंड समाधान नक्की वाटत असेल. अनेकांच्या डोळ्यांत पाणी असेल. नव्या जोमाने ताठ मानेने उभे राहतोय. अभिमान वाटतोय याचा. संपादक मंडळाला पुढील वाटचालीसाठी भरपूर अपेक्षांसह खूप खूप सदिच्छा.

- आरती नाईक, पनवेल

- ' अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, ' क्रांतिकारक आणि समाजोपयोगी आहे.

- महादेव भोकरे

- आपल्या विचारांचे स्वतंत्र असं लिखित विचारपीठ म्हणजेच आपले महा. अंनिसचे हे मासिक. आपल्या विचारांचे, आपल्या माणसांचे, आपल्या हक्काचे, डॉ.दाभोलकर यांच्या विचारपथावर चालणारे आपले मासिक, 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका,' लवकरच छापील स्वरूपात आपल्या हाती येवो.

- संदेश बालगुडे

- साथी, आज अंनिपत्रिकेच्या निमित्ताने आपण एक नवीन पाऊल अत्यंत निर्धाराने टाकत आहोत. सर्व वेदना, निराशा मागे टाकत संवादाचे हे अधिकृत मुखपत्र सर्वार्थाने सशक्त करण्यासाठी, आपण कटिबद्ध होऊया, विवेकाचा आवाज बुलंद करूया!

- परेश शहा

- अंनिपचा प्रकाशन कार्यक्रम खूपच सुंदर आणि एका उंचीवर गेला. तसेच ज्ञान, प्रज्ञा व बौध्दिक मेजवानी दिली. मनोहर सरांच्या अभिव्यक्तीतून बहर येत आहे. सरांचे विचार ऐकण्याचा योग म्हणजे दुग्धशर्करा योग होय. अभिव्यक्ती प्रक्रिया आणि संयम खूपच सुसंस्कृत.

- शिवव्याख्याते नरेंद्र नाईक, हिंगोली

- डॉ. यशवंत मनोहर सरांना ऐकून अंगावर शहारे येत होते.

- दीपक खंडागळे

- ' अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेला' आमच्या भरभरून शुभेच्छा. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडेल.

- उज्वला सुतार

- कार्यकर्त्यांचे, विचारकर्त्यांचे बळ वाढविणारे मासिक, 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका'.

- अरुण घोडेराव

- 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचं' मासिक, जाती-स्त्री दास्यांतक समतेच्या चळवळीचे मूखपत्र व्हावे, ही इच्छा.

- कॉ. किशोर ढमाले

- मा. मनोहर सरांचे आजचे व्याख्यान म्हणजे महा. अंनिसच्या सर्व कार्यकर्त्यांना नवसंजीवनी देणारे व खुप प्रबोधन करणारे आहे.

- बलदेव वसईकर, नंदुरबार



विशाल विमल
७२७६५ ५९३१८

## कोरोनायोद्ध्यांना चहा-नाष्टा वाटप

**लातुर :** ऊन, थंडी आणि पावसात रस्त्यावर उभे राहून जनतेची सेवा करणारे फ्रंटलाईन कर्मचारी अर्थात पोलिस कर्मचारी. हे पोलीस कर्मचारी अहोरात्र रस्त्यावर उभे राहून जनतेची सेवा करीत असतात. कोरोनाच्या कडक लॉकडाऊनमुळे दुकाने, हॉटेल बंद आहेत. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना चहा, पाणी किंवा इतर सुविधा उपलब्ध होणे देखील मुश्किल होते. लातुरमधील काही सामाजिक संघटना व सामाजिक कार्यकर्ते यांनी ईदच्या सणानिमित्ताने, पोलिसांना शिरखुर्मा आणि गुलगुले वाटप करून त्यांच्यासोबत सण साजरा केला व सामाजिक बांधिलकी जोपासली. महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्या रुक्साना मुल्ला, माधव बावगे, अनिल दरेकर, ऋषीकेश दरेकर, वैशालीताई यादव लोंढे, इम्रान सय्यद, अरमान सय्यद, कबीर सय्यद, अजय सुर्यवंशी आदी कार्यकर्ते या उपक्रमात सहभागी होते. तसेच वीस ते पंचवीस दिवस ऋषीकेश दरेकर, वैशाली यादव लोंढे, ॲड. सर्फराज पठाण, जफर मोहम्मद, शिवशंकर सूफळकर, प्रमोद वरपे, सुरज पाटील, शुभम आव्हाड, महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांना चहा व पाणी वाटप करत होते.

## जादूटोणा प्रकाराची भीती अंनिसने दूर केली

**नाशिक :** येथील पंचवटीमधील अमरधाम परिसरात एक विचित्र प्रकार घडत असल्याचे समोर आले. येथे स्मशानालगत असलेल्या बाभळीच्या झाडाला खिळे ठोकून, त्यावर काळी बाहुली, लिंबू, कोहळा, नारळ, उडीद, बिबा, मजकूर लिहिलेला कागद आणि व्यक्तींचे फोटो लटकवून पूजाअर्चा केल्याचे समोर आले. असे प्रकार अमावस्या-पौर्णिमेच्या दिवशी जास्त होत असल्याचे निदर्शनास आले. रहदारीच्या रस्त्यालगत हे झाड असल्याने



लोकांमध्ये भीती पसरली होती. संबंधित जादूटोण्याचा प्रकार फक्त लोकांना लुबाडण्यासाठी करण्यात आल्याचे सांगत, अंधश्रद्धा निर्मूलन समितीने त्याचा पर्दाफाश केला. झाडावर लटकविलेल्या अंधश्रद्धायुक्त वस्तू, मजकूर लिहिलेले कागद, फोटो कार्यकर्त्यांनी काढून जप्त केले. घरगुती इच्छा, अपेक्षा, संताप व्यक्त करणारा मजकूर, त्या कागदावर लिहिलेला होता. मजकूर लिहिलेली वहीची पाने, त्यावरील अक्षरे एकसारखीच दिसत होती. बहुतेक मजकूर हा प्रादेशिक आणि उर्दू भाषेत होता. जादूटोणा, करणी, दूर करण्यासाठी परिसरातीलच एखादी व्यक्ती, असे प्रकार करण्यास लोकांना प्रवृत्त करत असावी, असे कार्यकर्त्यांचे म्हणणे पडले. पोलिसांनी अशा भोंदूला शोधून त्यावर जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करावा, अशी मागणी डॉ. टी. आर. गोराणे, सुदेश

घोडेराव, कृष्णा चांदगुडे, राजेंद्र फेगडे, महेंद्र दातरंगे यांनी केली.

## वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार व्हावा : डॉ. शमसुद्दीन तांबोळी

**नाशिक :** महाराष्ट्र अंनिसची नाशिक जिल्हा शाखा प्रत्येक महिन्याच्या २० तारखेला डॉ. नरेंद्र दाभोलकर विवेक व्याख्यानमाला आयोजित करते. २० जुलै रोजी एक्क्याण्णवावे व्याख्यान, मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शमसुद्दीन तांबोळी यांनी दिले. 'सण-उत्सव समाजाभिमुख करण्याची विवेकवादी भूमिका', या विषयावर डॉ. तांबोळी यांनी विचार व्यक्त केले. ते म्हणाले की, प्रथा-परंपरेमधून अंधश्रद्धा निर्माण झाली आहे. अंधश्रद्धेविरुद्ध महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने वैज्ञानिक पर्याय दिले आहेत. अंधश्रद्धा या विकास आणि प्रगतीशीलतेला अडथळा ठरत असून, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार झाला पाहिजे. तसेच गणेशोत्सवात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने मोठे काम केले आहे. शैक्षणिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाला पुढे आणणे महत्त्वाचे आहे. आपण धार्मिक ध्रुवीकरणाने वेढले गेलो आहोत, असे डॉ. तांबोळी यांनी सांगितले. श्यामला चव्हाण, अमित जोजारे, विराज देवांग, डॉ. ठकसेन गोराणे, अरुण घोडेराव, नितीन मते आदी संयोजनात सहभागी होते.

## जादूटोणा विरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल

**पुणे :** बाणेर येथील कथित गुरू, ज्योतिषी रघुनाथ येमुल यांच्यावर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शिवाजीनगर पुणे शाखेच्या मागणीनुसार, जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. रघुनाथ येमुल यांनी सांगितल्यानुसार संबंधित पीडित महिलेवर कुटुंबीय नातेवाईक यांनी जादूटोणा केला होता. तसेच कुटुंबीय नातेवाईक यांनी त्या महिलेला शारीरिक, मानसिक त्रास, शिवीगाळ, अश्लील भाषेचा वापर करून आर्थिक पिळवणूक केली होती. त्यामुळे येमुल यांच्यासह नऊ आरोपींच्या विरोधात पुण्यातील चतुःशृंगी पोलीस ठाण्यात हुंडा प्रतिबंधक कायदा, भारतीय दंड विधान संहिता, कलम ४९८ अ आदी कलमाद्वारे गुन्हा दाखल होऊन त्यांना अटक झाली होती. या प्रकरणात जादूटोणा प्रकार झाल्याचे महाराष्ट्र अंनिसने निदर्शनास आणून दिले होते. महाराष्ट्र अंनिसच्या शिवाजीनगर पुणे शाखेने, संबंधित आरोपींवर जादूटोणाविरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली होती. चतुःशृंगी पोलिसांनी संबंधित आरोपींवर जादूटोणाविरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

महाराष्ट्र अंनिसच्या शिवाजीनगर पुणे शाखेचे कार्यकर्ते विशाल विमल, सचिन नेलेकर, प्रवीण खुंटे, संदीप कांबळे, लालचंद कुवार, सम्यक वि. म., वनिता फाळके, रविकिरण काटकर आदी कार्यकर्त्यांनी पोलिसांनी गुन्हा दाखल केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. पोलिसांनी कठोरपणे तपास करून आरोपींना शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न करावेत. तथाकथित गुरूने याही अगोदर अनेकांना अशाप्रकारे अंधश्रद्धेचे प्रकार करून फसविले असणार आहे, त्यामुळे पोलिसांनी प्रसारमाध्यमांद्वारे फसवणूक झालेल्या लोकांना संबंधित गुरू विरोधात तक्रार देण्यासाठी आवाहन करावे, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

## वडाचे झाड लावून वटपौर्णिमा साजरी

**लातुर :** महाराष्ट्र अंनिसची लातूर शाखा आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या एमएसडब्ल्यू उपकेंद्राच्या वतीने, कष्टकरी महिलांच्या हस्ते वडाच्या झाडाचे वृक्षारोपण करून वटपौर्णिमा साजरी केली. लातुर महानगरपालिकेच्या संत गाडगेबाबा केंद्र, सुका

कचरा संकलन व वर्गीकरण केंद्र येथे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी महा.अंनिसचे राज्य प्रधान सचिव माधव बावगे व नगरसेविका रागिणी यादव यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. सदरील



कार्यक्रमास महा.अंनिस जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर, महिला विभाग राज्य सहकार्यवाह रुक्साना मुल्ला, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्राच्या प्रा. विद्या हातोलकर, निसर्ग प्रतिष्ठानचे ऋषिकेश दरेकर, वसंतराव काळे, द्रोपदी कांबळे, विशाल सोनवणे, अमोल गरगटे, कुणाल कांबळे आणि अनेक कष्टकरी महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यंकटेश हंगरगे यानी केले. तर सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थीनी धनश्री साळुंखे यांनी सहकार्य केले. आभार रणजित आचार्य यांनी मानले.

## दारूबंदी कायम ठेवण्याच्या मागणीसाठी राज्यपालांची भेट

**मुंबई :** चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठवण्याचा निर्णय स्थगित करणे, राज्याच्या व्यसनमुक्ती धोरणाची (२०११) अंमलबजावणी करण्याची मागणी, व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचाच्या शिष्टमंडळाने महामहीम राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे २२ जुलै रोजी केली आहे. या अगोदर या मागणीसाठी शंभरपेक्षा अधिक संघटनांनी एकत्र येत ५ जुलै रोजी मुंबईतील आझाद मैदानावर व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचाच्या नेतृत्वाखाली धरणे आणि निदर्शन आंदोलन केले होते. या आंदोलनात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते सहभागी होते. पुन्हा २२ जुलै रोजी शिष्टमंडळाने कोश्यारी यांची भेट घेतली. कोश्यारी यांनी मागणीबाबत आस्थेवाईकपणे विचारपूस करत, ते स्वत: दारुबंदी, व्यसनमुक्तीच्या बाजूने असल्याचे शिष्टमंडळाला सांगितले. महाराष्ट्र शासनाला चंद्रपूर जिल्ह्यातील दारुबंदी उठविण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याबाबतचे पत्र देणार असल्याचे कोश्यारी यांनी शिष्टमंडळाला आश्वासन दिले आहे. तसेच व्यसनमुक्ती प्रचार- प्रसार- बंदी-उपचार यासाठी काम करणा-यांना शासनाने पाठिंबा द्यावा आणि मदत करण्याविषयीचे आश्वासनही राज्यपालांनी दिले. मंचातर्फे मागणी करण्यात आलेल्या रमानाथ झा समितीचा अहवाल जनतेसाठी खुला करुन देण्याबाबतचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी मंचाचे राज्य निमंत्रक आणि महाराष्ट्र अंनिसचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील, राज्य निमंत्रक वर्षा विद्या विलास, सामाजिक कार्यकर्त्या वसुधा सरदार, ॲड. रंजना गवांदे, चंद्रपूर येथील गुरुदेव सेवा मंडळाचे सुबोधदादा उपस्थित होते.

चंद्रपूर जिल्ह्यात सहा वर्षांपासून सुरू असलेली दारूबंदी २७ मे रोजी राज्य सरकारने उठविली आहे. तत्कालीन भाजपच्या नेतृत्वाखालील युती सरकारने दारुबंदी लागू केली होती. मात्र सध्या सत्तेवर असलेल्या महाविकास आघाडी सरकारातील मंत्री, नामदार विजय वडेट्टीवार यांच्या अट्टाहासी भूमिकेमुळे चंद्रपुर



जिल्ह्यातील दारुबंदी हटविण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळाने घेतला आहे. चंद्रपूर

जिल्ह्यातील दारूबंदी हटविताना सरकारने संतापजनक व खेदजनक कारणे दाखवली आहेत, याबाबतही व्यसनमुक्त महाराष्ट्र समन्वय मंचातर्फे महामहीम राज्यपाल यांच्याशी सविस्तर चर्चा केली. आझाद मैदानावर ५ जुलै रोजी झालेल्या आंदोलनावेळी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रविण दरेकर यांनी आंदोलकांची भेट घेतली होती. संबंधित प्रश्न विधान परिषदेत मांडणार असल्याचे आश्वासन त्यांनी आंदोलकांना दिले आहे.

## बहुचर्चित आंतरधर्मीय विवाह संपन्न

**नाशिक :** येथील रसिका आडगावकर आणि असिफ खान यांच्या आंतरधर्मीय विवाहाची गेल्या महिन्यात प्रसारमाध्यमांत उलटसुलट चर्चा झाली. होऊ घातलेल्या या आंतरधर्मीय विवाहाला मुलगा-मुलगी, कुटुंबीय, नातेवाईक यांचा कोणताही विरोध नसताना, काही त्रयस्थ लोकांनी या लग्नाला विरोध करण्याचा प्रयत्न केला. समाजातील छुप्या पद्धतीने कार्यरत असलेल्या जात पंचांनी या विवाहाला विरोध दर्शविला होता. मुलीच्या पालकांवर दबाव आणून, विवाह रद्द करीत असल्याचे पत्र लिहून घेतले. त्यामुळे वाद निर्माण झाला होता. मात्र अनेक पुरोगामी संघटनांनी या विवाहाला पाठींबा



दर्शविला. नामदार बच्चू कडू आणि महाराष्ट्र अंनिसचे नाशिक येथील कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी कुटुंबियांची भेट घेऊन या विवाहाला पाठींबा देण्याची भूमिका घेतली. मुलीच्या पालकांवर दबाव आणणाऱ्या संबंधित जातीच्या जातपंचांच्या विरोधात सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्यांतर्गत कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र अंनिसचे पदाधिकारी डॉ. ठकसेन गोराणे, प्रा. डॉ. सुदेश घोडेराव, कृष्णा चांदगुडे, राजेंद्र फेगडे, प्रा. सुशीलकुमार इंदवे, ॲड. समीर शिंदे, महेंद्र दातरंगे, नितीन बागूल आदी कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी नाशिक पोलीस आयुक्तांकडे तक्रार केली होती. इतके टोकाचे प्रसंग घडूनही कोणत्याही दबावाला बळी न पडता हा विवाह सोहळा २२ जुलै रोजी नाशिक येथील हॉटेल एस. एस. के. येथे अगदी मोजक्या लोकांमध्ये हा पार पडला. हिंदु व मुस्लिम दोन्ही पद्धतीने हा विवाह झाला. या विवाह सोहळ्यात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, राष्ट्र सेवा दल व छात्रभारती यांचे कार्यकर्ते पाठिंब्यासाठी हजर होते. मुलाचे मामा म्हणून अंनिसचे पदाधिकारी कृष्णा चांदगुडे यांनी विधी पार पाडले. यावेळी महाराष्ट्र अंनिसचे सरचिटणीस डॉ. ठाकसेन गोराणे उपस्थित होते. संविधानाला अभिप्रेत असणारी ही कृती असल्याचे समाधान कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र अंनिसच्या जात पंचायत मूठमाती अभियानाचे कार्यवाह कृष्णा चांदगुडे म्हणाले की, “या लग्नास मुलीच्या जात पंचायतने प्रखर विरोध केला होता. विवाहाचे पौरोहित्य करणाऱ्या पुरोहितावर सामाजिक बहिष्कार टाकण्याची धमकी दिली होती. असे करणे म्हणजे जात पंचायतच्या सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याचा भंग आहे. हे लक्षात आणून दिल्यानंतर विरोध मावळला व विवाह सोहळा शांतपणे उत्साहात पार पडला "

## शिवाजीनगर पुणे शाखा उत्साहात सुरू

**पुणे :** महाराष्ट्र अंनिसची शिवाजीनगर पुणे, या नावाने पुण्यात नव्याने शाखा सुरू झाली आहे. नवे-जुने असे सर्व कार्यकर्ते एकत्र येत त्यांनी ही शाखा सुरू केली. तरुणाई या शाखेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी झाली आहे. आतापर्यंत पुण्यातील पन्नासहून अधिक कार्यकर्ते सक्रिय काम

करण्यासाठी या शाखेशी जोडले गेले आहेत. या शाखेची पहिली मीटिंग ४ जुलै २०२१ रोजी झूम ॲपद्वारे ऑनलाईन झाली. या मीटिंगमध्ये सर्व उपस्थितांना बोलण्याची संधी मिळाली. सर्वांनी काम करण्याची गरज व्यक्त करून जबाबदाऱ्या घेतल्या. सर्वांनी कोरोनाउत्तर काळात जोमाने काम करण्याचा उत्साहवर्धक संकल्प व्यक्त केला. महा.अंनिसचे प्रधान सचिव संजय बनसोडे, सरचिटणीस विनायक सावळे यांनी उत्साहवर्धक संवाद साधला. विशाल विमल यांनी मीटिंगचे सुत्रसंचलन संयोजन केले. सम्यक वि. म. यांनी प्रास्ताविक केले. ॲड. परिक्रमा खोत यांनी आभार व्यक्त केले. रोहित घोगरे, रविराज थोरात यांनी तांत्रिक व्यवस्था पाहिली. वनिता फाळके, संदीप कांबळे, सम्यक वि. म., विशाल विमल यांनी शाखेला देणगी दिली. सदाशिव फाळके, पुष्पा क्षीरसागर, संदीप कांबळे, सचिन नेलेकर, रविकिरण काटकर, विनोद खरटमल, अश्विनी कोळेकर, अल्ताफहुसेन नबाब, मयूर पटारे, रुपेश जगताप, ओंकार नीता, भीमराव वाघमारे, आदित्य मोरे, लालचंद कुवार हेही पुढे काम कसे विस्तारित करायचे याबद्दल बोलले. शाखेच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र अंनिसच्या विभागीय, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, पुण्यातील ज्योतिषी रघुनाथ येमुल यांच्यावर जादूटोणाविरोधी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यासाठी पाठपुरावा, व्याख्यानमाला, अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका आदी उपक्रमात सहभाग घेतला.

## अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे शहादा शाखेत प्रकाशन

**शहादा :** महाराष्ट्र अंनिसच्या अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे शहादा शाखेतील मान्यवर पदाधिकाऱ्यांच्या हस्ते स्थानिक पातळीवर देखील प्रकाशन करण्यात आले. यावेळी जिल्हा अध्यक्ष हैदरकाका नूरानी, माजी जिल्हा अध्यक्ष शशांक कुलकर्णी, शाखा अध्यक्ष डॉ. बी. डी. पटेल, जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, राज्य सरचिटणीस विनायक सावळे, शाखा कार्याध्यक्ष संतोष महाजन, शाखा उपाध्यक्ष संगीता पाटील यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. पुन्हा प्रयत्न, कष्ट करून पत्रिकेची सर्वार्थाने उभारणी करण्याचा संकल्प



यानिमित्ताने कार्यकर्त्यांनी केला.

## ईदनिमित्त रक्तदान शिबिरांचे आयोजन

कोरोना काळात मोठ्या प्रमाणावर रुग्णांना रक्ताची गरज निर्माण झाली आहे. रक्तपेढ्यांकडे असणारे संकलित रक्त कमी पडले आहे, त्यामुळे सरकारी पातळीवरून देखील रक्तसंकलन शिबिरांचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याला प्रतिसाद देत, अनेक संस्था, संघटना कार्यकर्त्यांनी अशी शिबिरे आयोजित केली. महाराष्ट्र अंनिसनेदेखील कोरोना काळात अशी शिबीरे घेतली. बकरी ईदनिमित्त महाराष्ट्र अंनिसने, मुस्लिम सत्यशोधक मंडळ आणि समविचारी संघटनांच्या साथीने रक्तदान शिबिर घेतले. बकरी ईदला कालसुसंगत पर्याय देणे आणि कोरोना काळातील रक्ताची अधिकची गरज लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी शिबिरे आयोजित केली.

**लातूर :** महा. अंनिसच्या लातूर शाखेने रक्तदान करून ईद साजरी केली. ईद हा सण कुर्बानी देऊन साजरा न करता, आपण रक्तदान करून साजरा करावा, असा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी महाराष्ट्र अंनिसच्या महिला विभागाच्या राज्य सहकार्यवाह रूकसाना मुल्ला, मिश्र विवाह विभाग



कार्यवाह रणजित आचार्य, देवराज लंगोटे यांनी रक्तदान केले. यावेळी राज्य प्रधान सचिव माधव बावगे, जिल्हा कार्याध्यक्ष अनिल दरेकर, अरमान सय्यद, माऊली ब्लड बँकेचे व्यवस्थापक डॉ. सितम सोनवणे, स्टाफ शिवानी गायकवाड, श्रीता गायकवाड आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर :** महाराष्ट्र अंनिस कोल्हापूर जिल्हा आणि मुस्लिम सत्यशोधक मंडळाने रक्तसंकलन शिबिर घेतले. धर्माने सांगितलेल्या मानवी मूल्यांमध्ये त्याग महत्वाचे मूल्य आहे. इस्लाम धर्मातही इच्छा, ध्येय सिद्ध करण्यासाठी "कुर्बानी"



किंवा सर्वस्वाचा त्याग करण्याची शिकवण आहे. हा त्याग आणि बलिदानाचे प्रतीक म्हणून "ईद - उल - अजहा" (बकरी ईद) हा सण इस्लाम धर्मियांमध्ये साजरा केला जातो. यानिमित्ताने बकऱ्याची कुर्बानी देण्याची प्रथाही पाळली जाते. आजच्या सामाजिक परिस्थितीचा विचार करता सर्व धर्मियांनी आपले सण अधिकाधिक समाजाभिमुख आणि मानवतावादी करणे हेच धर्माचे उन्नयन आहे. हाच विचार समोर ठेऊन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि मुस्लीम सत्यशोधक मंडळाने बकरी ईदनिमित्त पशुची कुर्बानी देण्याच्या प्रथेमध्ये काळानुरूप बदल व्हावा व या प्रथेला पर्याय म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन केले. छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय (सी.पी.आर.) कोल्हापूर, येथील रक्तपेढीत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र अंनिसचे राज्य सरचिटणीस कृष्णात स्वाती, जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. अरुण शिंदे, कॉ. दिलदार मुजावर, गौतम कांबळे, महेश कांबळे, रोहन चोडणकर, भारतजीवन प्रभूखोत, राजवैभव शोभा रामचंद्र, यशवंती शिंदे, रविंद्र वाळवेकर आणि निशांत सुनंदा विश्वास कार्यकर्ते उपस्थित होते.

**पनवेल :** महाराष्ट्र अंनिसच्या पनवेल शाखेच्या पुढाकाराने व राष्ट्र सेवा दल, हुसेनी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ईदनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. रक्तदान हे सर्व जाती धर्मापलीकडे माणसाला माणसाशी जोडते. त्यामुळे रक्तदान करुन बकरी ईद साजरी करण्याचे



आवाहन यावेळी करण्यात आले. त्या आवाहनाला प्रतिसाद देत भर पावसात अनेकांनी घराबाहेर पडून रक्तदान केले. ''बकरी ईदनिमित्त पशूची कुर्बानी देण्याच्या प्रथेमध्ये कालानुरूप बदल व्हावा व या प्रथेला पर्याय देत रक्तदान करुन ईद साजरी करण्याचा मानवतावादी दृष्टिकोन आनंद देणारा आहे'', असे मत राष्ट्र सेवा दलाचे राष्ट्र कार्यवाह अल्लाउद्दीन शेख यांनी यावेळी मांडले. युसूफ मेहेर अली सेंटरचे संतोष ठाकूर यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत रक्तदान केले. महाराष्ट्र अंनिस रायगड जिल्ह्याचे पदाधिकारी मनोहर तांडेल,

प्रभाकर नाईक आणि पनवेल शाखेतील कार्यकर्त्यांनी यावेळी रक्तदान केले. शिबिराची सोशल मीडियावरील पोस्ट वाचून काही नवीन साथी रक्तदानासाठी उपस्थित राहिले. यावेळी रक्तदान शिबिरात सहभागी झालेल्या प्रत्येकाला जादुटोणा विरोधी कायदा पत्रिका देण्यात आली. तसेच सर्वांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. यानिमित्ताने एकाच वेळी २५ जणांनी रक्तदान केले.

**नंदुरबार :** महाराष्ट्र अंनिसच्या नंदुरबार शाखेच्यावतीने रक्तदान सप्ताह आयोजित केला. रक्तदान शिबिरात सुरुवातीला फिरोजभाई खान व



दिपक चौधरी यांनी रक्तदान करून शिबिराचे उदघाटन केले. याप्रसंगी महा.अंनिसचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ.अर्जुन लालचंदानी, शाखा उपाध्यक्ष शांतीलाल शिंदे, आत्माराम शिरसाठ, चंद्रमणी बरडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते. सूर्यकांत आगळे, वसंत वळवी यांनी संयोजन केले.

**सातारा :** कराड येथे मुस्लीम सत्यशोधक मंडळ संचलित हमीद दलवाई स्टडी सर्कल, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि संविधान प्रचारक यांचेवतीने बकरी ईद निमित्त रक्तदान शिबिर आयोजित केले होते. या शिबिरामध्ये अमर तांबोळी, जमीर तांबोळी, रफिक शिकलगार, आनंदा थोरात, पंकज कांबळे, अझरूद्दीन पटेल, दीपक गुमते, प्रशांत आवले आदींनी रक्तदान केले. आय्याज शिकलगार (संभाजी ब्रिगेड), उमेश भोंगाळे यांनी शिबिरास सदिच्छा भेट दिली. दै. ऐक्यचे पत्रकार आणि ज्ञानदीप राष्ट्रीय सामाजिक व शैक्षणिक विकास संस्थाचे आनंदा थोरात यांनी शिबिरासाठी आपल्या संस्थेची जागा उपलब्ध करून दिली. तसेच उपस्थितांच्या चहाची सोय आणि शिबिर स्थळी लागणारे बॅनर उपलब्ध करून दिले. शिबिर पार पाडण्यासाठी महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते आणि मंडळाचे पदाधिकारी अझरूद्दीन



पटेल, अमर तांबोळी, जमीर तांबोळी यांनी मेहनत घेतली.

**जळगाव :** महाराष्ट्र अंनिसच्या भडगाव शाखेचे कार्याध्यक्ष फिरोज शेख यांनी बकरी ईद निमित्त, जळगाव येथिल इंडियन रेडक्रॉस सोसायटी येथे



रक्तदान केले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डी. एस. कट्यारे उपस्थित होते. अंनिसच्यावतीने बकरी ईदनिमित्त रक्तदान करून आपला सण साजरा करावा, असे आवाहन गेल्या अनेक वर्षांपासून फिरोज शेख करीत आहे.

## फलज्योतिष अभ्यासक्रम रद्द करण्याची मागणी

**सोलापूर:** इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने फलज्योतिष विषयाचा पदव्युत्तर पदवी (एम. ए.) अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. तो

अभ्यासक्रम रद्द करावा, या मागणीसाठी महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रपतींना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन पाठविले आहे. निवेदनात म्हटले आहे की, एखाद्या विषयाला 'शास्त्र' म्हणून मान्यता देण्यासाठी तो विषय निरीक्षण, तर्क, संरचना, प्रश्न, सामान्यीकरण, अनुमान, प्रचिती, प्रयोग अशा वैज्ञानिक कसोट्यांवर टिकले पाहिजे, ही पूर्वअट आहे. मात्र फलज्योतिष हे, 'निरीक्षण' या पहिल्या निकषावरच फोल ठरते. असं असताना, हा अशास्त्रीय व कालबाह्य झालेला विषय उच्च शिक्षणात समाविष्ट करण्याचा विद्यापीठाने घेतलेला निर्णय हा भारतीय संविधानातील 'वैज्ञानिक दृष्टिकोन' ह्या मूल्याशी पूर्णपणे विसंगत आहे, असे महाराष्ट्र अंनिसचे ठाम मत आहे. अशास्त्रीय बाबींनी खच्चून भरलेल्या या विषयाबाबत संबंधित फलज्योतिषी किंवा त्याचा दावेदार असणारी व्यक्ती यांना महाराष्ट्र अंनिसने मागील पंचवीस वर्षांपासून सदर विषय 'शास्त्र' असल्याचे सिद्ध करण्यासाठी २१ लाख रुपयांचे जाहीर आव्हान दिलेले आहे. मात्र एकही ज्योतिषी किंवा फलज्योतिषी, अंनिसचे हे आव्हान अद्याप पेलू शकलेले नाहीत. खरंतर या निमित्ताने महाराष्ट्र अंनिसच्यावतीने आम्ही, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाला हे आव्हान स्वीकारण्याचे नम्र आवाहन करीत आहोत. भविष्यात कोरोनासारख्या जीवघेण्या संकटांना समाज समर्थपणे तोंड देऊ शकेल, असे समाजोपयोगी संशोधन करणारे सक्षम, गुणवत्ताधारक संशोधक विद्यार्थी विद्यापीठातून तयार होणे, अत्यावश्यक आणि अपेक्षितही आहे. त्यामुळे इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने फलज्योतिष विषयाचा अभ्यासक्रम सुरु करण्याचा, नुकताच घेतलेला निर्णय रद्दबातल करावा. महाराष्ट्र अंनिसच्या सोलापूर जिल्हा शाखेच्यावतीने असे निवेदन, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना दिले. यावेळी राज्य कार्यवाह ॲड. गोविंद पाटील, सरचिटणीस सुधाकर काशीद, जिल्हा कार्याध्यक्ष धर्मराज चवरे, कायदा सल्लागार ॲड. राजेंद्र फताटे, सचिव संजय भोसले, कार्याध्यक्ष रमेश आदलिंगे उपस्थित होते.

**जळगाव :** महाराष्ट्र अंनिसच्या जळगाव जिल्हा शाखेच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना हे निवेदन



देण्यात आले. हे निवेदन उपजिल्हाधिकारी राहुल पाटील यांनी स्वीकारले. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. दिगंबर कट्यारे, ॲड. भरत गुजर व विश्वजीत चौधरी उपस्थित होते.

**नाशिक :** इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाने 'फलज्योतिष' अभ्यासक्रम सुरू केला आहे. हा निर्णय राज्य घटनेतील वैज्ञानिक दृष्टिकोन व सुधारणावाद या कर्तव्यांशी विसंगत आहे, त्यामुळे फलज्योतिष अभ्यासक्रम रद्द करावा यासाठीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सरचिटणीस डॉ. ठकसेन गोराणे, महेंद्र दातरंगे उपस्थित होते.

**लातूर :** महा.अंनिस, लातूरच्यावतीने मा. उपजिल्हाधिकारी यांना ज्योतिष्य विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करू नये याविषयी निवेदन देण्यात आले. यावेळी, राज्य प्रधान सचिव माधव बावगे, महिला विभाग राज्यकार्यवाह रूक्साना मुल्ला, जिल्हा प्रधान सचिव बाबा हलकुडे, सुधीर भोसले, शहर कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दशरथ भिसे, रणजित आचार्य हे उपस्थित होते.

## बाबा कबीर खानला अटक

**नवी-मुंबई :** काळी जादू आणि तंत्रमंत्र करून प्रियकराला वश करून देतो, असा बहाणा करून वसीम रहीस उर्फ बाबा कबीर खान या बंगाली बाबाने सॉफ्टवेअर इंजिनिअर तरुणीकडून तब्बल ४ लाख ५७ हजार रूपये उकळले. या बाबाला पोलिसांनी अटक केली असून महाराष्ट्र अंनिसच्या मागणीला यश आले आहे.

खारघर येथे राहणारी एक युवती प्रेमभंग आणि प्रियकराने लग्नास नकार दिल्याने डिप्रेशनमध्ये गेली होती. सदर युवतीने ट्रेनने प्रवास करताना 'प्रेमसंबंधातील अडचणींवर उपाय' अशी ट्रेनमध्ये चिटकवलेली जाहिरात वाचली. त्या तरुणीने जाहिरातीतील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला असता, समोरील इसमाने तो "बाबा कबीर खान बंगाली" असल्याचे, तसेच मेरठ येथील



दर्ग्यामध्ये सदर युवतीचा प्रियकर पुन्हा लग्नास तयार होण्यासाठी व त्याचे ठरलेले लग्न मोडण्यासाठी काळी जादु करावी लागेल, असे सांगितले. या विधीसाठी घुबड, बकरी अशा प्राण्यांचा बळी द्यावा लागेल असे सांगून, बाबाने वेळोवेळी सदर युवतीकडुन पैसे उकळले. इतका खर्च करुनही काहीच फरक पडत नसल्याने, तरुणीला अजून नैराश्य आले व तिने बाबा कबीर खान बंगाली यास दिलेले पैसे परत मागितले व पोलीसांकडे तक्रार देईन, असे सांगितले. त्यावर बाबा बंगाली याने तक्रार देण्यासाठी पोलिसांकडे गेल्यास काळी जादू करुन अपघात घडवून आणेन व तुला नष्ट करेन, असे त्या युवतीला धमकावले. युवतीने खारघर पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान संहिता, जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवला. गुन्हा दाखल झाल्यानंतर या फसवणुकीतून तरुणीची मुक्तता व्हावी, यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्य पदाधिकारी ॲड. तृप्ती पाटील (डोंबिवली) यांच्या मार्गदर्शनानुसार नवी-मुंबई महा. अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष अशोक निकम (नवी मुंबई) यांनी खारघर पोलीस स्टेशनचे संबंधित तपास अधिकारी यांना भेटून तक्रारीची माहिती घेतली. सदर तक्रार जादूटोणाविरोधी कायद्याअंतर्गत येत असल्याने; संबंधित तक्रारीबाबत संघटनेच्यामार्फत सहकार्य केले जाईल, असे आश्वासन तपास अधिकाऱ्यांना दिले.

पोलीसांनी आरोपीचे वेगवेगळे गुगुल पे क्रमांक, बँक अकाउंट क्रमांक व केवाईसीची माहिती मिळविली. तसेच मोबाईल क्रमांक प्राप्त करुन सी.डी.आर. विश्लेषण केले. गोविंदनगर, मिरा रोड, ठाणे येथे बाबा कबीर खान येणार असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. त्वरित सदर ठिकाणी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गिरीधर गोरे, पोलीस उपनिरीक्षक वैभव रोंगे, रूपेश पाटील, इंद्रजीत कानू, दीपक डोंगरे, आदिनाथ फुंदे यांनी जाऊन वसिम रईस खान उर्फ बाबा कबीर खान बंगाली (वय ३३ वर्षे) याला अटक केली. बाबा कबीर खान हा मुळ उत्तर प्रदेशातील मेरठ सिटी येथील आहे. या बाबाला पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली, तसेच त्याच्या गुगल पे अकाउंटवर पिडीत मुलीने पाठविलेल्या पैशांच्या एंट्रीदेखील सापडल्या. या बाबाने अनेक लोकांना फसवले असून आणखीन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. या बाबाने कोणास फसविले असल्यास त्यांनी महाराष्ट्र अंनिसच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

■ ■ ■

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे

# विवेक जागर प्रकाशन

## २२७० रुपयांची पुस्तके २५ % सवलतीत १७०० रुपयांत मिळवा



### अंधश्रद्धा निर्मूलन विषयाशी संबधित विवेक जागर प्रकाशन आणि अन्य प्रकाशनाची पुस्तके

| क्र. | पुस्तकाचे नाव | लेखक | मूळ किंमत |
|---|---|---|---|
| १. | पृथ्वी मोलाचा माणुस | संपा. अरविंद पाखले, राजेंद्र कांकरिया | ३०० |
| २. | जादुई वास्तव - रिचर्ड डॉकिन्स | अनुवाद : डॉ. शंतनू अभ्यंकर | २५० |
| ३. | सफर विश्वाची | डॉ. नितीन शिंदे | २०० |
| ४. | असाही विचार करायला काय हरकत आहे... | डॉ. नितीन शिंदे | १२० |
| ५. | यात असे आहे तरी काय ? | डॉ. नितीन शिंदे | १२० |
| ६. | मला बरं का वाटतं ? | मच्छिन्द्रनाथ मुंडे | ११० |
| ७. | अंतराळ समजून घेताना... | डॉ. नितीन शिंदे | ११० |
| ८. | पत्रिका जुळवताना... | डॉ. नितीन शिंदे | ५० |
| ९. | दोस्ती ग्रह ताऱ्यांशी | डॉ. नितीन शिंदे | ५० |
| १०. | वैज्ञानिक दृष्टीकोन | प्रा. प्रमोदिनी मंडपे, कुमार मंडपे | २५ |
| ११. | भारतीय संविधानाचे अंतरंग | ॲड. निर्मलकुमार सूर्यवंशी | ५० |
| १२. | सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा | संपादन | ३० |
| १३. | फलज्योतिष एक भ्रम | प्रकाश घाटपांडे | २५ |
| १४. | डॉ. नरेंद्र दाभोळकर | रंगीत फोटो | १० |
| १५. | प्रयोग चमत्काराचे | मच्छिन्द्रनाथ मुंडे | २५ |
| १६. | आत्मा पुनर्जन्म प्लँचेट | प्रा. प. रा. आर्डे | २५ |
| १७. | गाणी प्रबोधनाची | संपा. योगेश कुदळे | २५ |
| १८. | शोध मनोविकारांचा | डॉ. प्रदीप पाटकर | २० |
| १९. | अंधश्रद्धेची दुनिया चमत्काराची किमया | मुंडे, मंडपे, निपाणीकर | ८० |
| २०. | दुनिया अंधश्रद्धाओं की, कीमियागीरी चमत्कारों की (हिंदी) | मुंडे, मंडपे, निपाणीकर | ९० |
| २१. | सर्पविज्ञान | उल्हास ठाकूर, प्रकाश शहा | २५ |
| २२. | अंधश्रद्धा उन्मूलन : आचार (हिंदी) | डॉ. नरेंद्र दाभोलकर | १५० |
| २३. | अंधश्रद्धा उन्मूलन : विचार (हिंदी) | डॉ. नरेंद्र दाभोलकर | १५० |
| २४. | अंधश्रद्धा उन्मूलन : सिद्धांत (हिंदी) | डॉ. नरेंद्र दाभोलकर | १५० |
| २५. | अलौकीक शक्ती और पाखंड (हिंदी) | मच्छिन्द्रनाथ मुंडे | ३० |
| २६. | Friendship with Stars and Planets | Pramod Ganganmale | ५० |

**२५% सवलत**

**५७० रुपये सुट**

**बुकिंग करा**
**9969473702**
**7276559318**

**सूचना :** १) २५% सवलतीचा लाभ घेण्यासाठी किमान १ हजार रुपये किंमतीची पुस्तके घेणे अनिवार्य आहे. २) पैसे ऑनलाईन स्वीकारले जातील. ३) पुस्तकांच्या वजनानुसार पोस्टेज खर्च २०० रुपयांपेक्षा कमी – जास्त घेतला जाईल. ४) पुस्तकांची सवलत योजना ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत चालू राहील. ४) अधिक माहितीसाठी संपर्क : मो9657449328 विशाल विमल, मो. 9969473702 मच्छिंद्रनाथ मुंडे

**कार्यालय :** विवेक जागर प्रकाशन, अविनाश पाटील, कार्याध्यक्ष महाराष्ट्र अंनिस, भास्कर ६८, कालिकादेवी नगर, संगमा चौक, धुळे, ४२४००१

- सदरचा अंक महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसाठी विवेक जागर ट्रस्टच्यावतीने प्रकाशित करण्यात आला आहे.
- अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिकेसाठी लेखन साहित्य युनिकोड फॉंटमध्ये टाईप केलेले किंवा सुवाच्च अक्षरात कागदाच्या एकाच बाजूस लिहिलेले असावे.
- लेखकाने स्वतःचे नाव, मोबाईल नंबर व इमेल बिनचूक नमूद करावा.
- लेखन साहित्यासोबत लेखातील आशयाला समर्पक दोन फोटो आणि स्वतःचा फोटो पाठवावा.
- समताधिष्ठित समाजरचनेला पोषक भूमिका मांडणाऱ्या दर्जेदार साहित्याचे स्वागत आहे.
- लेखकांनी आपले लेखन शक्यतो प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पाठवावे.
- अंकासाठी साहित्य ९९२०१ २८६२८ या व्हाटस् ॲप नंबरवर अथवा manspatrika@gmail.com या इमेलवर पाठवावे.
- तूर्त अंक ऑनलाईन पाठवण्यात येईल.
- ऑनलाइन अंक निशुल्क असेल. छापील अंकाच्या वर्गणीचे स्वरुप यथावकाश कळविण्यात येईल.
- छापील स्वरुपातील अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्यांनी ७२७६५५९३१८ या व्हाटस् ॲप नंबरवर पूर्वनोंदणी करावी.

**संपादकीय पत्ता**

संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरु', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, जि. सांगली, ४१५४०९

www.mans.org.in
/pg/MaharashtraANiS /MahaANIS_MANS /t.me/mahaANIS

बुक पोस्ट

प्रति,

..............................

..............................

..............................

**प्रेषक**

कार्याध्यक्ष, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, भास्कर-६८, कालिकादेवीनगर,
संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१